सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २८१ । पाने १२ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com










## महत्वाचे...



## पॉक्सो, ड्रग्स व रॅगिंगविरोधी कायद्याबाबत 'सिंहगड'मध्ये जनजागृती

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर आणि सिंहगड इन्स्टिट्यूट्स यांच्या संयुक्त विद्यमाने एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ॲड. श्रेया सापटनेकर यांनी पॉक्सो कायद्याच्या विविध तरतुदी, बालकांच्या संरक्षणाचे महत्त्व, लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये उपलब्ध असलेले कायदेशीर संरक्षण आणि अशा घटनांची तक्रार करण्याची प्रक्रिया याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सारथी यूथ फाउंडेशनचे संस्थापक सचिव रामचंद्र वाघमारे यांनी 'ड्रग अवेअरनेस अँड वेलनेस नेव्हिगेशन' या उपक्रमांतर्गत अमली पदार्थांचे व्यसन, त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम, विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर होणारे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्तीसाठी उपलब्ध मार्ग याबाबत माहिती दिली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोलकुमार ए. देशपांडे यांनी रॅगिंगविरोधी कायद्याची माहिती देताना रॅगिंग ही केवळ महाविद्यालयीन शिस्तभंगाची बाब नसून त्याचे गंभीर सामाजिक व कायदेशीर परिणाम होऊ शकतात, असे स्पष्ट केले. अध्यक्षस्थानी सिंहगड इन्स्टिट्यूट्सचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी न्यायाधीश अमोलकुमार ए. देशपांडे यांच्या हस्ते कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ॲड. बसवराज सलगर, ॲड. सुजय एस. सापटनेकर, ॲड. श्रेया सापटनेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. यशपाल खेडकर यांनी केले. प्रियांका गायकवाड यांनी आभार मानले.



## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा वर्धापन दिन साजरा

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा वर्धापन दिन बिजली भवन, जुनी मिल आवार, मुरारजी पेठ येथे साजरा करण्यात आला. संघटनेचे ज्येष्ठ सभासद लक्ष्मीपुत्र बिराजदार यांच्या हस्ते वार्ता फलकाचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार व संघटनेचे माजी केंद्रीय अध्यक्ष दिवंगत संतोष घाडगे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. संघटनेचे पुणे प्रादेशिक संघटक सुनिल काळे, बारामती परिमंडळ अध्यक्ष उत्तरेश्वर स्वामी, ज्येष्ठ सभासद रविंद्र तुळजापूरकर, शुकुर शेख आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी पुणे प्रादेशिक संघटक सुनिल काळे, बारामती परिमंडळ अध्यक्ष उत्तरेश्वर स्वामी, सोलापूर मंडल उपाध्यक्ष अनिलकुमार बनसोडे, सचिव अजीम चौधरी, श्रीराम सलवदे, मयुर गवते, बालाजी वराडे, रामास्वामी कुंभार, अशोक निंबर्गी, संजय बसरगी, जनार्दन काकी, एम. एम. करजगीकर, मनोज कलशेट्टी, प्रशांत बामणे, दत्तात्रय पवार, रविंद्र तुळजापूरकर, कृष्णा कासगुंडे, संजय फताटे, लक्ष्मीपुत्र बिराजदार, शुकुर शेख, निलेश गावडे, गुंडाप्पा बनसोडे, दत्ता कंबळे उपस्थित होते.



## सुसंवाद माजी विद्यार्थी संघटना कार्यकारी मंडळाची निवड

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

मास कम्युनिकेशन विभागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या सुसंवाद माझी विद्यार्थी संघटनाच्या कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी सोमनाथ पवार, उपाध्यक्षपदी विजयकुमार पारसेकर, सचिवपदी दशरथ कुंभार, सहसचिवपदी आनंदराव बिराजदार, खजिनदारपदी डॉ. येवसेप जगताप तर प्रमुख संघटकपदी डॉ. अंबादास भासके यांची निवड करण्यात आली. संघटनेच्या मार्गदर्शक मंडळात डॉ. रवींद्र चिंचोलकर, सिद्धाराम पाटील, डॉ. समीर इनामदार, समाधान वाघमोडे, नाना शिंदे आणि अजित बिराजदार यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच कार्यकारी मंडळात डॉ. तेजस्विनी कांबळे, ऋषिकेश मंडलिक, डॉ. मधुकर जक्कन, विठ्ठल एडके यांच्यासह प्रत्येक बॅचमधील एका विद्यार्थ्याचा समावेश करण्यात आला आहे. या बैठकीस डॉ. रवींद्र चिंचोलकर, डॉ. अंबादास भासके आदी उपस्थित होते.

## घरगुती वादातून तरुणास कोयत्याने मारहाण

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

पंढरपूर येथील पद्मावती झोपडपट्टीत घरगुती वादातून कोयता आणि लाथाबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत संतोष दगडू धोत्रे (वय २५) हा तरुण जखमी झाला. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. रविवारी रात्री घरगुती वादातून त्याला गणेश रामचंद्र भोसले, नितीन भोसले आणि त्याच्या साथीदाराने मिळून मारहाण केली. त्याला उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## विवाहितेने प्राशन केले फवारणीचे औषध

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

आजारास कंटाळून कोळेकरवाडी (ता.अक्कलकोट) येथे माहेरी आलेल्या साधना आनंद वाघमोडे (वय २६) हिने विषारी द्रव पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला . ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. रविवार रात्री तिने आजारास कंटाळून तिने पिकावर फवारणीचे विषारी द्रव प्राशन केली. तिला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून भगवान खरात (काका ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पहाटे दाखल केले.

# गाळे सील करण्याच्या आदेशाला केराची टोपली; मनपाच्या ८ अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशीचा बडगा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

महापालिकेच्या थकीत भाडेवसुली मोहिमेत गाळे सील करण्याचे आदेश पाळण्यात कुचराई केल्याप्रकरणी आठ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येणार आहे. यापूर्वी संबंधितांवर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही कामकाजात अपेक्षित सुधारणा न झाल्याने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आता विभागीय चौकशीचा बडगा उगारला आहे. या कारवाईमुळे महापालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे.



महापालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागांतर्गत मिनी गाळे, मेजर गाळे आणि खुल्या जागांचे कोट्यवधी रुपयांचे भाडे थकीत आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिकेने ६ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत अभय योजना जाहीर केली होती. थकबाकीदारांना व्याजात १०० टक्के माफी देऊन थकबाकी भरण्याचे आवाहन करण्यात आले होते.

थकबाकी वसुलीला गती देण्यासाठी आठ अधिकारी-कर्मचाऱ्यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. १६ जुलै रोजी आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी आढावा बैठक घेऊन थकबाकीवरील १०० टक्के व्याजमाफीची मुदत २४ ऑगस्टपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला. सप्टेंबर २०२६ पर्यंत थकीत रकमेची प्रभावी वसुली करावी, अन्यथा थकबाकीदारांचे गाळे सील करावेत, असे स्पष्ट आदेश देण्यात आले होते. प्रत्येक पथक प्रमुख आणि संबंधित लिपिकाने दररोज किमान पाच गाळे सील करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र १८ ऑगस्ट रोजी झालेल्या आढाव्यात एकाही पथकाने निर्धारित उद्दिष्ट पूर्ण केले नसल्याचे समोर आले. आयुक्तांच्या आदेशानुसार अपेक्षित कारवाई न झाल्याने महसूल वसुलीवर परिणाम झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. ही बाब गंभीर स्वरूपाची असून कर्तव्यात कसूर व शिस्तभंग झाल्याचे मानण्यात आले. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (१) मधील तरतुदींचा भंग झाल्याचे नमूद करीत संबंधित आठ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली. त्यानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने आयुक्तांनी कठोर भूमिका घेतली आहे. केवळ आर्थिक दंडावर न थांबता संबंधित सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुद्ध गैरवर्तनाच्या आरोपावरून विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाहीला वेग देण्यात आला आहे.आयुक्तांच्या या कारवाईमुळे महापालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे.

**असे आहेत ते ८ अधिकारी-कर्मचारी**

राजू शिवशिंपी (कार्यालय अधीक्षक, आरोग्य), कैलास करपे (भूमापक, नगर रचना), ए. व्ही. क्षीरसागर (वरिष्ठ श्रेणी लिपिक, विभागीय कार्यालय क्र. ६), श्रीकांत यादव (कनिष्ठ श्रेणी लिपिक, भूमी व मालमत्ता), सचिन गडदे (कनिष्ठ श्रेणी लिपिक, भूमी व मालमत्ता), नितीन परदेशी (कार्यालय अधीक्षक, मालमत्ता कर), भारत रोडगे (भूमापक, विभागीय कार्यालय क्र. ५) आणि डी. एम. बनसोडे (कनिष्ठ श्रेणी लिपिक, भूमी व मालमत्ता).

## ठोकळ प्रशालेतील विद्यार्थ्यांची मुख्य हेड पोस्ट ऑफिसला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**



श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेतील इयत्ता नववी स्काऊट व गाईड युनिट मधील विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच शिक्षकांनी 'ऐतिहासिक वारसा लाभलेल्या इमारतीस भेट' या उपक्रमांतर्गत सोलापूर येथील मुख्य हेड पोस्ट ऑफिस येथे भेट दिली.

याप्रसंगी तज्ञ मार्गदर्शक म्हणून सोलापूर भारतीय मुख्य. डाक विभागाचे वरिष्ठ पोस्ट मास्तर सोमनाथ काळे यांच्या नेतृत्वाखाली सीनियर क्लर्क एस.एस.पवार, काशिनाथ माळी तसेच IPPB बँकेचे व्यवस्थापक विनायक यांनी विद्यार्थ्यांना विविध खात्यांचे प्रकार विविध, प्रकारच्या ठेवी, विविध ठेव योजना, रखमा काढणे व जमा करणे यासाठी लागणाऱ्या विविध फॉर्म, विविध खात्यावर व ठेवीवर मिळणारे व्याज व सुविधा, भारतीय डाक विभागाचे बँक व एटीएम सुविधा इत्यादी विषयी मार्गदर्शन केले.

तसेच सोलापूर भारतीय मुख्य डाक विभागातील जीडीएस व शाळेतील माजी विद्यार्थिनी राजनंदिनी पाटील व साजीद शेख यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी पोस्ट व्यवहारासंबंधी आपले प्रश्न विचारून शंकांचे समाधान करून घेतले. संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका शिल्पा ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे यांनी विद्यार्थी तसेच शिक्षकांचे कौतुक केले. तसेच या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सहशिक्षक अर्जुन सुरवसे व युसुफ शेख यांनी परिश्रम घेतले.

## मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा; मोडनिंबमध्ये कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ७ सप्टेंबर-**

मोडनिंब (ता.माढा) येथे मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने सोमवार (दि. ७) रोजी मोडनिंब शहर बंदची हाक देण्यात आली होती.

या आवाहनाला व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दिला. बंद बाबतच्या आवाहनानुसार शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी, दुकानदारांनी आपापली दुकाने व व्यवसाय पूर्णपणे बंद ठेवत सहभाग नोंदविला. दवाखाने आणि मेडिकल यांसारख्या अत्यावश्यक सेवा मात्र सुरू ठेवण्यात आल्या. अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण मोडनिंब शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. बंदमुळे नेहमी गजबजलेली बाजारपेठ आणि मुख्य रस्ते दिवसभर शांत दिसत होते.

## १ हजार ४८३ कोटींच्या पाणी पुरवठा योजना आराखड्याचे आज सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

शहराला नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेने तयार केलेल्या १ हजार ४८३ कोटी रुपयांच्या जलवितरण आराखड्यात राज्याच्या मुख्य सचिवांनी काही त्रुटी काढल्या असून त्याची पूर्तता करून हा आराखडा आज मंगळवारी पुन्हा सादर करण्यात येणार आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासमोर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी गुरुवारी सादरीकरण केले होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे तसेच प्रकल्पाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते. सादरीकरणावेळी प्रकल्पाची आवश्यकता, शहरातील सध्याची जलवितरण व्यवस्था आणि प्रस्तावित आराखड्यामुळे नागरिकांना होणारे फायदे याबाबत माहिती देण्यात आली.यावेळी मुख्य सचिवांनी काही महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. शहरांची लोकसंख्या, सध्याची पाणी योजना, वितरण व्यवस्था, नव्या योजनेनंतर होणारा पाणीपुरवठा यावर प्रश्नोत्तरे झाली होती.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या माध्यमातून शहरातील जुन्या जलवाहिन्यांचे जाळे सक्षम करण्याबरोबरच वाढत्या शहराची भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन जलवितरण व्यवस्था सुधारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विविध परिसरातील जलवितरण व्यवस्था सक्षम करण्याचा आराखड्यात समावेश आहे. हा प्रकल्प निकडीचा व सार्वजनिक महत्त्वाचा प्रकल्प म्हणून राबविण्यास राज्य मंत्रिमंडळाने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. या आराखड्याचे सविस्तर सादरीकरण राज्याच्या नगरविकास विभागाचे मुख्य सचिव गोविंदराज यांच्यासमोर करण्यात आले होते. त्यावेळी आराखड्याची माहिती, निविदा प्रक्रिया, प्रकल्पाची अंमलबजावणी तसेच महापालिकेच्या निधीची उभारणी याबाबत चर्चा झाली होती. त्यानंतर गुरुवारी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासमोर प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले होते. मुख्य सचिवांकडून या प्रकल्पाला अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर महिनाभरात १ हजार ४८३ कोटी रुपयांच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे अशी माहिती वेंकटेश चौबे यांनी दिली.

# 'युनिक'च्या विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धेत झळाळती कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

**वि. गु. शिवदारे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आंतरशालेय स्पर्धेत ३०२ विद्यार्थ्यांचा सहभाग**



युनिक इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वि.गु. शिवदारे अण्णा यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आविष्कार साकारला. विविध रंगसंगती आणि कल्पनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी कॅनव्हासवर साकारलेल्या कलाकृतींनी उपस्थितांची दाद मिळवली.

ही चित्रकला स्पर्धा १६ ऑगस्ट रोजी घेण्यात आली होती. स्पर्धेत सोलापूर शहरातील तब्बल ३९ शाळांमधील ३०२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय चित्रकार डॉ. सचिन खरात यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व आकाशात फुगे सोडून करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रकाश वाले, बाळासाहेब मुस्तारे आणि निलेश ठोकडे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. सचिन खरात होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चित्रकला ही केवळ रंगांची मांडणी नसून कल्पकता, निरीक्षणशक्ती आणि संवेदनशीलतेला अभिव्यक्त करणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. स्पर्धेच्या लहान गटात समर्थ रेवणसिद्ध कोळी याने प्रथम, रियांश रविकुमार कौनपिली याने द्वितीय तर नेत्रा अजिंक्य हंगलगिरकर हिने तृतीय क्रमांक पटकावला. मोठ्या गटात राधा सोमनाथ कलशेट्टी हिने प्रथम, रुमाना फिरोज शिकलगार हिने द्वितीय तर शवरसिद्ध शंकर कोळी याने तृतीय क्रमांक मिळविला. कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक राजशेखर शिवदारे, संस्थेचे विश्वस्त भीमाशंकर शेटे, सोलापूर सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, शाळेच्या शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी, व्यवस्थापन समिती सदस्या डॉ. शुभदा उपासे व श्रुती गायकवाड तसेच मुख्याध्यापिका पूजा बाजपेयी उपस्थित होत्या. शाळेच्या चित्रकला शिक्षिका अनुश्री कोळी यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी मार्गदर्शन केले.



## शिक्षणामुळे जीवनप्रणालीत निश्चितच बदल होतो : राजेंद्र मायनाळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षणक्षेत्रात आमुलाग्र बदल झाले आहे. पण ज्ञान सुसंस्कार मार्गदर्शन आणि जीवनाला योग्य दिशा दाखविण्याचे कार्य शिक्षकच करतात, असे विचार वीरशैव ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना राजेंद्र मायनाळ यांनी व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर सर्वश्री संस्थाध्यक्ष निलकंठप्पा कोनापूरे सचिव बाबासाहेब कुलकर्णी महिला आघाडीच्या ताराबाई कोनापूरे सहसचिव शेखर लक्ष्मेश्वर आदी मान्यवर उपस्थित होते. कोनापूरे यांनी माजी राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णनब यांच्या प्रतिमेची पूजा करून दीप प्रज्वलन करून अभिवादन केले. यावेळी ३० हून अधिक माजी मुख्याध्यापक मुख्याध्यापिका शिक्षक शिक्षिकांना सर्वश्री कोनापूरे मायनाळ, ताराबाई कोनापूरे यांच्या हस्ते प्रवासी बैग देऊन गौरविण्यात आले. सत्काराला उत्तर शांताबाई मरगूर प्रकाश खेडेकर शांतय्या स्वामी भिमाशंकर सरसंबी यांनी दिले. सूत्रसंचालन पुष्पा गुंगे यांनी केले आभार बाबासाहेब कुलकर्णी यांनी तर यादी वाचन नागनाथ लिगाडे यांनी केले. समारंभास मल्लिनाथ बिलगुंदी कलाशिक्षक आप्पासाहेब कनाळे (९४ वयाचे शिक्षक) एस ओ संख प्रमिला नांदगावकर सुभाष कुलकर्णी, स्काऊट गाईड शिक्षक नागेश कुंभार, गायक शांतय्या स्वामी, अमृत कोनापूरे उपस्थित होते.



## सोलापूर विद्यापीठ, उद्यम फॉंडेशन आणि जीतो सोलापूर यांच्यात सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायजेशन, सोलापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू कर्नल प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यम आणि जीतो हे एकत्रितपणे विशेषतः युवा पिढीमध्ये उद्योजकतेची भावना विकसित करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम, मार्गदर्शन, संवाद व विविध उपक्रम आयोजित करणार आहेत. गुजराती भवन येथे झालेल्या जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायजेशन, सोलापूर शाखेच्या उदघाटन कार्यक्रमात ह्या सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या. यावेळी विद्यापीठातर्फे नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्यचे संचालक प्रा. डॉ. गणेश काकांडीकर, उद्यमचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेश गुराणी तर जीतो तर्फे विजय भंडारी अध्यक्ष, जीतो अपेक्स, राजेंद्र जैन अध्यक्ष, आरओएम झोन, राजेंद्रकुमार सांकला संचालक, जीतो अपेक्स, अजय मेहता उपाध्यक्ष, जीतो पुणे आणि सोलापूर जीतोचे अमित जैन उपस्थित होते. या उपक्रमासाठी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा आणि प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांचे मार्गदर्शन लाभले.



## अणणप्पा काडादी हायस्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

अणणप्पा काडादी हायस्कूल येथे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. सर्वप्रथम प्रमुख अतिथी प्रशालेचे माजी विद्यार्थी व रयत संस्थेतील निवृत्त मुख्याध्यापक श्रीशैल टेंगळे, स्थानिक नियामक मंडळ अध्यक्षा सिंधु काडादी, सदस्य मल्लिनाथ विभुते, विजयकुमार काडादी, विद्या नागानुर, के.एल.ई. संस्थेचे मेंबर सेक्रेटरी शांतप्पा कलबुर्गी, प्रभारी मुख्याध्यापक दत्तात्रय पाटील, प्राथमिक मुख्याध्यापक सचिन पाटील यांनी आपल्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक दत्तात्रय पाटील यांनी केले. विद्या नागानुर यांनी बसववचन गायले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी सन्वि जाधव, ज्ञानेश्वरी बिराजदार यांनी तर आभार स्नेहा सावंत हिने मानले.

## सांगोला-दापोली बस सेवा पुन:श्च सुरु करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.७ सप्टेंबर-**

जिथे अधिक प्रवाशी तिथे अधिक गाड्या या धर्तीवर सांगोला-दापोली बस सेवा पुनःश्च सुरु करावी अशा मागणीचे निवेदन सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना देण्यात आले. सांगोला आगारातून उन्हाळा हंगामामध्ये सांगोला-दापोली ही बस सेवा नाझरे, आटपाडी, खानापूर, विटा, कराड, खेड, चिपळूण मार्गे दापोली सांगोला येथून स. ८ वा सुरु करण्यात आली होती. परंतु काही महिन्यातच शाळा सुरु झाल्याने बस संख्या अपुरी असल्याकारणाने सदरची सेवा पूर्णतः बंद करण्यात आली. प्रवाशांच्या मागणीची व डायरेक्ट सोय नसल्याने प्रवाशांची गैरसोय याचा विचार करून सांगोला आगारातून सांगोला-दापोली बस पूर्ववत सुरु करण्याची मागणी संघटनेने केली आहे. या निवेदनाच्या प्रती माजी आ.शहाजीबापू पाटील, महाव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई सेंट्रल, विभाग नियंत्रक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सोलापूर विभाग यांनाही देण्यात आले आहे. सांगोला आगाराकडे बसेस उपलब्ध नसतील तर प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी जिथे अधिक प्रवाशी तिथे अधिक गाड्या या नवीन धोरणानुसार चिपळूण, दापोली, खेड व इतर आगाराकडून ही बस सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागणी केल्याचे संघटनेचे अध्यक्ष निलकंठ शिंदे यांनी सांगितले.

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६
▮ dainiktarunbharat.com
▮ epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



**‘प्रभो शक्तिमन! हिन्दुराष्ट्रांगभूता:’**

वास्तविक, ईश्वर ज्ञानमय, शक्तिमय, सौंदर्यमय आणि आनंदमय आहे. परंतु आम्ही केवळ ईश्वराच्या शक्तिमय स्वरूपाचेच आवाहन केले आहे. हे स्वाभाविक आहे.

**स्व. बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# कुणबी नोंदींचा मार्ग मोकळा

## मराठा आंदोलकांच्या वारसांनाही दिलासा; नोकरीची प्रक्रिया सुरू

**मुंबई, ७ सप्टेंबर**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारने प्रशासकीय पातळीवर हालचालींना वेग दिला आहे. निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. मराठवाड्यातील जिल्हाधिकाऱ्यांसह प्रांताधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांनी कुणबी नोंदी, जात पडताळणी प्रमाणपत्रे आणि प्रलंबित अर्जांचा आढावा घेतला. प्रत्येक जिल्ह्यात १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरे घेऊन पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांची पूर्तता करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

परभणी जिल्ह्यात सापडलेल्या कुणबी नोंदी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या असून, इतर जिल्ह्यांनीही त्याच धर्तीवर नोंदी जाहीर कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कायद्याच्या चौकटीतच प्रमाणपत्रे देणार असल्याचे स्पष्ट करताना विखे पाटील यांनी वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे काटेकोर पालन केले जाईल, असेही ते म्हणाले. मराठवाड्यात आतापर्यंत साडेतीन लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याचेही त्यांनी नमूद केले. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्याचा निर्णय प्रशासनाच्या हालचालींना नवा वेग देणारा ठरणार आहे.

◂ (तभा वृत्तसेवा)

### विदेशात शिक्षण घेणाऱ्यांना दिलासा

**‘सारथी’च्या परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती धोरणात सुधारणा करण्यात आली असून, परदेशातील विद्यापीठांची शिक्षण फी थेट संबंधित विद्यापीठाला अदा केली जाणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीच्या लाभावर असलेली कमाल आर्थिक मर्यादा हटवण्यात आली आहे. याशिवाय ब्रिटनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी १,१०० जीबीपी, तर इतर देशांतील विद्यार्थ्यांना १,५०० अमेरिकन डॉलर अतिरिक्त निर्वाह अथवा आकस्मिक भत्ता देण्याची तरतूद करण्यात आली आहे.** ■

### अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण मोफत

शिक्षणासोबतच मराठा-कुणबी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठीही पाऊल उचलण्यात आले आहे. ‘सारथी’ने आयडीटीआरएससोबत केलेल्या करारानुसार १,४४० मराठा-कुणबी तरुणांना हलके आणि अवजड वाहन चालविण्याचे तसेच वाहकाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार आहे. ■

### आंदोलकांचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही

मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान बलिदान दिलेल्या आंदोलकांच्या कुटुंबीयांसाठीही सरकारने निर्णय घेतला आहे. संबंधित कुटुंबातील एका पात्र सदस्याला एमआयडीसीमध्ये अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बीड जिल्हा प्रशासनाने मृत आंदोलकांच्या वारसांची प्राथमिक पडताळणी आणि कागदपत्रांची छाननी पूर्ण केली असून, पात्र वारसांची यादी जाहीर करण्यात आली आहे. ■

### मराठा विद्यार्थ्यांना ओबीसीप्रमाणे शैक्षणिक सवलती

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून तंत्रशिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यांप्रमाणे विविध शैक्षणिक सवलती आणि सुविधांचा लाभ देण्याचे निर्देश तंत्रशिक्षण संचालनालयाने दिले आहेत. याचबरोबर ईबीसी, ईडब्ल्यूएस आणि एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी तब्बल २०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ■

# रसायन-जैविक युद्धासाठी सज्जता

## १.१० लाख कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदीस मंजुरी

**नवी दिल्ली, ७ सप्टेंबर**

सैन्याची रसायन ते जैविक युद्धासाठी सज्जता वाढवण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने सोमवारी तिन्ही दलांसाठी विविध उपकरणांसह रडार, प्रगत हलकी हेलिकॉप्टर्स आणि यांत्रिकरीत्या सुरुंग पेरण्यासारख्या लष्करी सामग्री १.१० लाख कोटी रुपयांच्या अंदाजे खर्चाच्या खरेदीस मंजुरी दिली. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखालील ‘संरक्षण खरेदी परिषदे’ने खरेदीचे प्रस्ताव मंजूर केले.

संरक्षण दलांच्या विविध खरेदी प्रस्तावांना तत्त्वतः प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून, या प्रस्तावांचा अंदाजे खर्च सुमारे १,१०,००० कोटी रुपये इतका आहे, असे मंत्रालयाने सांगितले. भारतीय लष्करासाठी रासायनिक, जैविक, किरणोत्सर्गी आणि आण्विक रेकी (सीबीआरएन) वाहने, उच्च गतिशीलता असलेली वाहने, स्वयंचलित सुरुंग पेरणारी यंत्रणा, प्रगत हलके हेलिकॉप्टर्स (एएलएच), ट्रॉल टँक्स आणि ‘सर्वत्र’ ब्रिज प्रणाली यांच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली, असे त्यात म्हटले आहे.

सीबीआरएन घटकांमुळे दूषित झालेल्या क्षेत्रांचा शोध घेण्यास, त्यांची ओळख पटवण्यास, त्यांचे निरीक्षण करण्यास आणि त्या क्षेत्रांना चिन्हांकित करण्यास सीबीआरएन वाहने सक्षम असतील, असे संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले.

प्रगत हलक्या हेलिकॉप्टर्समुळे भारतीय लष्कर आणि भारतीय वायुदलाला सर्व प्रकारच्या भूप्रदेशांवर आणि विविध कार्यकारी परिस्थितींमध्ये गुंतागुंतीच्या मोहिमा पार पाडणे शक्य होईल. विविध भूप्रदेशांमधील मोहिमांदरम्यान लढाऊ तुकड्यांना संयुक्त मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी ‘ट्रॉल टँक्स’ आणि ‘ब्रिज सिस्टिम’चा वापर केला जाईल, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

◂ (वृत्तसंस्था)

### नौदलासाठी ‘अरुध्रा’ रडार



भारतीय नौदलासाठी ‘अरुध्रा’ रडार्सच्या खरेदीला तसेच मरीन गॅस टर्बाइन्सच्या डिझाईन, विकास आणि त्यानंतरच्या खरेदीला आवश्यकतेची मान्यता देण्यात आली. विविध नौदल हवाई तळांवरील सध्याच्या हवाई मार्ग निगराणी रडारच्या जागी ‘अरुध्रा’ रडार बसवले जाईल आणि युद्धनौकेची प्रणोदन प्रणाली असलेल्या एमजीटीमुळे विदेशी विक्रेत्यांवरील अवलंबित्व कमी होण्याची अपेक्षा आहे. ■

### वायुदलाला मिळणार ‘जीबीएमपीजे’



भारतीय हवाई दलासाठी, लढाऊ विमाने, मालवाहू विमाने आणि हेलिकॉप्टर्सची युद्धक्षमता वाढवण्याबाबतच्या विविध प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. ‘ग्राऊंड-बेस्ड मल्टी-पर्पज जॅमर’ (जीबीएमपीजे) खरेदी करण्यास आणि ‘डिफेन्स फोर्सेस सिक्युअर ॲक्सेस कार्ड’ प्रणाली बसवण्यास मंजुरी देण्यात आली. जीबीएमपीजे हे शत्रूच्या रडार यंत्रणांविरुद्ध प्रभावी अडथळा निर्माण करण्याची क्षमता प्रदान करेल, असे एका निवेदनात म्हटले आहे. मंजूर करण्यात आलेल्या एकूण आवश्यक मान्यतांपैकी सुमारे ९८ टक्के खरेदी भारतीय उद्योगांकडून केली जाईल, असेही त्यात नमूद करण्यात आले आहे. ■

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात पुन्हा घसरण

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारातील शुक्रवाची सुधारणा टिकून राहू शकली नाही आणि सोमवारी बाजार घसरणीसह बंद झाला. आरोग्यसेवा क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रांमध्ये विक्रीचा दबाव दिसून आल्याने निफ्टी २३,८०० च्या खाली गेला. मिश्र जागतिक संकेतांमुळे बाजाराची सुरुवात घसरणीने झाली. सत्रादरम्यान विक्रीचा जोर वाढल्याने निफ्टी २३,७५० च्या खाली तर सेन्सेक्स ७६,००० च्या खाली घसरला. मध्य पूर्वेतील युद्धाबाबतची अनिश्चितता आणि क्रूड ऑईलच्या वाढत्या किंमतींमुळे गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम झाला, ज्यामुळे बाजारावर सतत दबाव राहिला. बाजार बंद होताना सेन्सेक्स ३८२.६२ अंकांनी घसरून ७६,१३२.८१ वर तर निफ्टी ११८.५५ अंकांनी घसरून २३,७७९.१५ वर पोहोचला.

### केतन हत्याकांडात रितेश हंगेला अटक

**पुणे :** केतन अग्रवाल याची हत्या करण्यापूर्वी आरोपी चेतन चौधरी, रितेश हंगे आणि सिया गोयल यांनी त्याला कशाप्रकारे संपवायचे, याबाबत चर्चा केली होती. सुरुवातीला केतनची हत्या करण्यासाठी बाहेरील व्यक्तीची मदत घेण्याचा विचारही करण्यात आला होता. मात्र, नंतर कोणाला सहभागी करून घेण्याऐवजी आपणच केतनला संपवायचे, असा निर्णय घेण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. या कटाच्या नियोजनात रितेश हंगे याचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे, अशी माहिती पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक गिल यांनी दिली. रितेश याचा गुन्ह्यातील सक्रिय सहभाग स्पष्ट झाल्याने त्याला अटक करण्यात आली असून १२ सप्टेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ■

### नागा बंडखोराची शिक्षा स्थगित

**नवी दिल्ली:** फेब्रुवारी २००९ मध्ये मणिपूरच्या उखरुल जिल्ह्यात तीन सरकारी अधिकाऱ्यांचे अपहरण आणि हत्या केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या एनससीएन (एम)चा स्वयंघोषित ‘लेफ्टनंट’ होपसन निंगशेन याची शिक्षा सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्थगित केली. निंगशेन १७ वर्षांहून अधिक काळ तुरुंगात आहे. त्यामुळे, विशेषतः त्याचे अपील प्रलंबित असताना, तो केवळ शिक्षा स्थगितीच्या मुद्द्यावर अवलंबून आहे. आम्ही काही अटींवर शिक्षा स्थगित करत आहोत, असे न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या खंडपीठाने नमूद केले. अर्जदाराने दिल्लीच्या हद्दीतच राहावे आणि अपील निकाली निघेपर्यंत ती सोडू नये, असे खंडपीठाने म्हटले. मणिपूर सरकारच्या वकिलांनी या अर्जाला विरोध केला. हत्येचे प्रकरण संवेदनशील असल्याने राज्य सरकारने ते सीबीआयकडे सोपवले.

# कोसळलेल्या इमारतीच्या मालकास अटक

**पत्नी, मुलगाही जेरबंद**

**नवी दिल्ली, ७ सप्टेंबर**

दिल्लीमध्ये कोसळलेली सत्य निकेतन या इमारतीचा मालक हरिराम गुप्ता, त्याची पत्नी उर्मिला गुप्ता आणि मुलगा महेश गुप्ताला सोमवारी अटक करण्यात आली. ही संपत्ती उर्मिला गुप्ताच्या नावावर असल्याचे तपासात स्पष्ट झाले.

सत्य निकेतनमध्ये मुलांचे वसतिगृह हरिराम गुप्ता आणि त्याचा मुलगा महेश गुप्ता चालवायचे. हरिरामच्या नावावर इमारतीची वीजजोडणी असल्याची माहिती तपासात समोर आली. हरिराम गुप्ता भारतीय वायुदलाचा सेवानिवृत्त सार्जंट आहे. महेशचे हार्डवेअर आणि पेंटचे दुकान आहे. त्याला दोन मुले असून, या तिघांनाही भिवाडी येथून अटक करण्यात आली. पोलिस वसतिगृहाच्या ऑपरेटर्स आणि ठेकेदारांचा शोध घेत आहेत. या प्रकरणी त्यांच्या भूमिकेची तपासणीही केली जाईल आणि त्यानुसार कारवाई केली जाणार आहे.

दरम्यान, येथील बचावमोहीम थांबवण्यात आली असून, एकूण १२ जणांची मलब्याखालून सुटका करण्यात आली. यातील सात जणांचा मृत्यू झाला. यात पाच विद्यार्थी आहेत. मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना मृतदेह सोपवण्यात आले. तळमजल्यावर दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यामुळे ही इमारत कोसळली, अशी माहिती आरोपींनी दिली. बचावमोहीम रविवारी दुपारी दीड वाजता सुरू करण्यात आली होती. ती सोमवारी सायंकाळी पाच वाजता संपवण्यात आली. एकूण २७ तास बचावकार्य करण्यात आले.



**दिल्ली उच्च न्यायालयाचा चौकशीचा आदेश**

सत्य निकेतन येथे इमारत कोसळून सात जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी एमसीडीच्या उच्चस्तरीय चौकशीचा आदेश दिला आणि सरकार आपली जबाबदारी झटकू शकत नाही, असे स्पष्ट केले.

उच्च न्यायालयाने ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचे स्पष्ट केले. दिल्ली महानगरपालिका आणि इतर संबंधित प्राधिकरणांनी केलेल्या अपुऱ्या उपाययोजनांमुळेच अशा शोकांतिका घडतात, असे निरीक्षण नोंदवले तसेच जीव वाचवण्यासाठी बचावकार्य वाढवण्याचा निर्देशही दिला. ही घटना केवळ दुर्दैवीच नाही. यामध्ये दिल्ली विद्यापीठ किंवा सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहांसह इतर निवास व्यवस्थांमधील अपुऱ्या सुविधा, विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि ‘पीजी’ निवास व्यवस्थांचे नियमन करण्यासाठी इतर प्राधिकरणांनी केलेल्या अपुऱ्या उपाययोजना यासारख्या मुद्द्यांचा समावेश आहे, असे मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्या. तेजस कारिया यांच्या खंडपीठाने म्हटले. ◂ (वृत्तसंस्था)

# एफडीएची ८८० औषध आस्थापनांवर कारवाई

## ११ कोटी रुपयांचा माल जप्त, ६७७ कंपनी, दुकानांचे परवाने निलंबित

**मुंबई, ७ सप्टेंबर**

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) जून ते ऑगस्ट या कालावधीत ८८० औषध उत्पादन आणि विक्री आस्थापनांवर कारवाई केली असून ११.४१ कोटी रुपयांची अवैध औषधी आणि सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केला आहेत. विभागाने सोमवारी जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकातून ही माहिती दिली आहे.

एफडीएने तीन महिन्यांच्या कालावधीत ६०७ उत्पादन आस्थापना आणि २,२९५ विक्री आस्थापनांची तपासणी केली. नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यावर ६७७ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आणि २०३ परवाने रद्द करण्यात आले. अवैध औषधी व सौंदर्य प्रसाधनांशी संबंधित प्रकरणांमध्ये २० एफआयआर नोंदवले आहे. एफडीएने या कालावधीत १०४ शोध आणि जप्ती मोहिमा राबवून ११.४१ कोटी रुपयांची अवैध साठा जप्त केला आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत तक्रारींमध्ये ५५७ टक्के, तक्रारींच्या तपासात ३७८ टक्के, शोध आणि जप्तीच्या प्रकरणांमध्ये २१७ टक्के आणि जप्त केलेल्या मालाच्या किमतीत २३४ टक्के वाढ झाली आहे. एफडीएने प्रिस्क्रिप्शनशिवाय अनुसूचित औषधांची विक्री, मुदत संपलेल्या औषधांची अयोग्य हाताळणी आणि इन्सुलिन व लसींसारख्या तापमान-संवेदनशील औषधांची अयोग्य साठवणूक या बाबीही उघडकीस आणल्या.

◂ (वृत्तसंस्था)

### मुंबईत लाखोंचे बनावट चलन जप्त

**मुंबई :** मुंबई गुन्हे शाखेने ५०० रुपयांच्या २,१२८ बनावट भारतीय चलनी नोटा बाळगल्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीला अटक केली, अशी माहिती एका अधिकाऱ्याने सोमवारी दिली. नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील रहिवासी असलेल्या दानिश खान याला, बनावट नोटा चलनात आणण्यासाठी दक्षिण मुंबईतील मेट्रो सिनेमाजवळ आला असताना ताब्यात घेण्यात आले, असे अधिकाऱ्याने सांगितले. या रॅकेटच्या संदर्भात ५५ वर्षीय महिलेला ताब्यात घेण्यात आले होते. कायदेशीर तरतुदींनुसार नोटीस बजावल्यानंतर तिला नंतर सोडून देण्यात आले, असे अधिकाऱ्याने सांगितले. ■

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत

## ‘ग्लोबल फिनटेक फेस्ट’चे उद्घाटन



**मुंबई, ७ सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, मंगळवारी (दि. ८) मुंबई दौऱ्यावर येत असून, त्यांच्या हस्ते ‘ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६’चे उद्घाटन होणार आहे. सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता हा कार्यक्रम होणार असून पंतप्रधान उपस्थितांना संबोधित करतील. मुंबईत ८ ते ११ सप्टेंबरदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ग्लोबल फिनटेक फेस्टची ही सातवी आवृत्ती आहे.

वित्तीय तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील जगातील प्रमुख परिषदांपैकी एक म्हणून या फेस्टकडे पाहिले जाते. धोरणकर्ते, नियामक संस्था, केंद्रीय बँका, वित्तीय संस्था, फिनटेक कंपन्या, तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या, गुंतवणूकदार आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ या परिषदेत सहभागी होत आहेत. एजंटिक एआय, टोकनायझेशन, क्वांटम तंत्रज्ञान, डिजिटल पेमेंट आणि वित्तीय समावेशन यामुळे भविष्यातील अर्थव्यवस्थेत होणाऱ्या बदलांवर या परिषदेत चर्चा होणार आहे.

◂ (वृत्तसंस्था)



अकोला शहरात सोमवारी रोजी संपूर्ण विदर्भात प्रसिद्ध असा कावड यात्रा महोत्सव संपन्न झाला. येथे दरवर्षी विविध कावड व शिवभक्त जवळपास २५० कलश बांधलेल्या व यापेक्षाही मोठ्या कावडीतून गांधीग्राम येथून पूर्णेचे जल आणून महादेवाला अभिषेक करतात. सोमवारी निघालेली अशीच एक मोठी कावड.

# ठाकरे गटात पुन्हा मोठी फूट?

## ‘ऑपरेशन टायगर-४’ च्या चर्चेने खळबळ; १४ आमदार शिंदेंच्या गळाला!

**मुंबई, ७ सप्टेंबर**

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा एका मोठ्या राजकीय भूकंपाची शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार मुरजी पटेल यांनी केलेल्या एका खळबळजनक दाव्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे आहेत. राज्यात लवकरच ‘ऑपरेशन टायगर-४’ राबवले जाणार असून, ठाकरे गटाचे तब्बल १४ आमदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचा मोठा गौप्यस्फोट पटेल यांनी केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून ठाकरे गटातील काही नेत्यांच्या संभाव्य पक्षांतराच्या वावड्या उठत आहेत. त्यातच आता पटेल यांच्या दाव्याने या चर्चांना उधाण आले आहे. केवळ आमदारच नाही, तर आगामी काळात ठाकरे गटाचे अनेक नगरसेवकही शिंदे सेनेची वाट धरतील, असा दावा त्यांनी केला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ठाकरे गटातील काही आमदारांनी अलीकडेच महाविकास आघाडीच्या महत्त्वपूर्ण बैठकीला दांडी मारली होती, तसेच काही आमदारांनी अज्ञात स्थळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गुप्त भेट घेतल्याचीही जोरदार चर्चा आहे. अद्याप या संभाव्य पक्षांतराबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. मात्र, मुरजी पटेल यांच्या दाव्यात तथ्य निघाल्यास ठाकरे गटासाठी हा सर्वात मोठा धक्का ठरेल. आता खरोखरच ‘ऑपरेशन टायगर-४’ यशस्वी होणार का आणि १४ आमदारांचा आकडा खरा ठरणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

◂ (तभा वृत्तसेवा)



**मुरजी पटेल**

### १४ या आकड्याचे गणित काय?

**या संभाव्य राजकीय उलथापालथीत ‘१४’ हा आकडा अत्यंत कळीचा मानला जात आहे. सध्या विधानसभेत ठाकरे गटाचे २० आमदार आहेत. जर १४ आमदारांनी एकत्रितपणे पक्ष सोडला, तर तो दोन-तृतीयांश बहुमताचा आकडा ठरतो. असे झाल्यास पक्षांतरबंदी कायद्याच्या कचाट्यातून हे आमदार सहज बचावू शकतात आणि कायदेशीर कारवाईचा धोका टळतो. त्यामुळे या दाव्याला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.** ■

# इराणवर हल्ला झाल्यास आखातात विध्वंस

## मोहम्मद गालिबाफ यांचा अमेरिकेला इशारा



**तेहरान, ७ सप्टेंबर**

इराणवर यापुढे झाल्यास आखाती देशांनी विध्वंसासाठी तयार राहावे. तेथील तेल प्रकल्प, ऊर्जा केंद्र आमच्या लक्ष्यावर आहे आणि यासाठी अमेरिका जबाबदार राहील असा इशारा इराणचे संसद अध्यक्ष मोहम्मद बाकिर गालिबाफ यांनी दिला आहे. देशावर भविष्यात होणाऱ्या कोणत्याही हल्ल्याला जलद, शक्तिशाली आणि अधिक वेदनादायक प्रत्युत्तर दिले जाईल. अमेरिकन सैन्याने अलिकडेच इराणी तेलवाहू जहाजांना लक्ष्य करत हल्ले चढवले होते. यावर गालिबाफ यांनी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला.

संसदीय अधिवेशनादरम्यान गालिबाफ म्हणाले की, इराण आता हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्याच्या पलीकडे गेला आहे. अमेरिकेच्या लष्करी तळांवर इराणने केलेले अलिकडील हल्ले हे प्रत्युत्तराच्या दिशेने टाकलेले केवळ पहिले पाऊल आहे. त्यांनी अमेरिकेवर युद्धाचे खोटे चित्र निर्माण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला. लष्करी पराभव पत्करल्यानंतरही अमेरिकेचे नेते खोटा प्रचार आणि मानसिक डावपेचांचा अवलंब करत आहेत. अमेरिकेने इराणी हितसंबंधांवर किंवा सुरक्षेवर यापुढे कोणताही हल्ला केल्यास त्याला अधिक वेगवान, तीव्र आणि वेदनादायी प्रत्युत्तर दिले जाईल, आमचा हल्ला भीषण असेल. इराणवरील हल्ल्याची किंमत आखाती देशांना मोजावी लागेल.

**जगाचा तेलपुरवठा रोखणार**

होर्मुझची सामुद्रधुनीवर इराणचे नियंत्रण असून, हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून आखाती देशातून जगाला होणारा तेल आणि वायू पुरवठा रोखला जाईल. संघर्ष वाढल्यास आखाती भागातील सुरक्षा, तेलवाहतूक आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम होईल. त्यामुळे अमेरिका आणि आखाती देशांना शांतता हवी आहे की, संघर्ष याचा विचार करावा. देशाच्या सुरक्षेसाठी आम्ही कोणत्याही थराला जाण्यास तयार असल्याचे गालिबाफ यांनी म्हटले आहे.

◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# पुनर्विकासासह नियमांची पुनर्रचनाही हवी

रविवारी दुपारी दिल्ली विद्यापीठाच्या परिसरातील सत्य निकेतनमध्ये विद्यार्थ्यांचे वसतिगृह म्हणून वापरली जाणारी एक जुनी इमारत कोसळली. एकूण पाच मजले असलेल्या या इमारतीच्या तळमजल्यावर दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यादरम्यान एका कॉलमला धक्का लागल्याने ही संपूर्ण इमारत कोसळल्याचे पोलिसांनी सांगितले. या इमारतीत एकूण पंधरा खोल्या होत्या आणि तिथे प्रत्येकी दोन ते तीन याप्रमाणे जवळपास पन्नास विद्यार्थी राहत होते. रविवारची सुटी असल्याने बहुतांश विद्यार्थी खोल्यांमध्येच होते. अशातच ही दुर्घटना घडली आणि त्यात पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अनेक जण जखमी झाले. पोलिसांनी या इमारतीच्या मालकावर गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. लवकरच तो त्यांच्या हाती लागेलही. पण, जवळपास पन्नास वर्षे जुन्या असलेल्या या इमारतीच्या कोसळण्याने अनेक प्रश्न नव्याने उभे राहिले आहेत. मुळातच सत्य निकेतनमधील ही इमारत इतकी जुनी असतानाही तिचा निवासी स्वरूपाचा वापर कसा काय सुरू होता, हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. या इमारतीत पाच मजले होते, पण बांधकामाची परवानगी केवळ तळमजला आणि एकाच मजल्यासाठी होती, अशी माहिती दिल्ली महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. याचा अर्थ, एवढ्या जुन्या इमारतीमध्ये वरचे तीन मजले बेकायदा असल्याचे एक तर पालिकेच्या अधिकाऱ्यांना, विशेषतः या प्रभागातील कर्मचाऱ्यांना इतके दिवस समजले नाही किंवा त्याकडे सहेतुक दुर्लक्ष करण्यात आले. कारण काहीही असले, तरी यामध्ये ज्या मुलांचा बळी गेला, त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी पाहिलेली स्वप्ने मात्र काही क्षणांत दगड-विटांच्या ढिगाऱ्याखाली कायमची चिरडली गेली. ही दुर्दैवी घटना दिवसाउजेडी घडल्याने किमान लगेच लक्षात आली आणि तिथे वेळेत मदत पोहोचू शकली. ती रात्री घडली असती, तर कदाचित तिची भीषणता आणखी वाढली असती. ही दुर्घटना जिथे घडली, त्या परिसरात अनेक अरुंद गल्ल्या आहेत. त्यामुळे तिथे पोहोचताना मदत आणि बचाव पथकांनाही अडथळ्यांचा सामना करावा लागला. ढिगाऱ्याखाली दबलेले विद्यार्थी मोबाईलवरून इतरांकडे मदतीची याचना करीत होते. त्यापैकी आदित्य नावाच्या कॉमर्सच्या विद्यार्थ्याने ढिगाऱ्याखालून केलेल्या व्हिडीओ कॉलची क्लिप समाजमाध्यमांवर व्हायरलही झाली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने ग्रामीण तसेच निमशहरी भागातील तरुणांचा शहरांकडे ओघ वाढला आहे. तिथे उच्च शिक्षणासोबत नोकरीच्या संधीही मिळत असल्याने साहजिकच मिळेल त्या ठिकाणी आणि अल्प सुविधा असूनही कमीत कमी खर्चात वास्तव्याला प्राधान्य दिले जाते. काही वर्षांचाच काळ काढायचा असल्याने शहरांमध्ये येणारे विद्यार्थी वा नोकरीसाठी स्थलांतरित होणारी कुटुंबे जिथे जागा मिळेल, तिथे बिऱ्हाड थाटतात. पण, अनेकदा त्यांच्या निकडीचा गैरफायदा घेऊन धोकादायक स्थितीतील इमारतींमध्ये जागा दिली जाते. कुटुंब किंवा विद्यार्थी भाडेकरू म्हणून ठेवताना, दुकानांना गाळे भाड्याने देताना संबंधित जागामालक रहिवाशांच्या सुरक्षिततेपेक्षा केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्याचा विचार करताना दिसतात. महानगरात अशा इमारतींमध्ये राहणारे विद्यार्थी अथवा कुटुंब दोन-तीन वर्षांनी जागा बदलतात. त्यामुळे आपली इमारत किती जुनी वा जीर्ण आहे, याची फारशी माहिती कुणी घेत नाही. बहुतांश मोठ्या शहरांमध्ये कमी-अधिक फरकाने हीच स्थिती असते. संबंधित यंत्रणांना न जुमानता आणि बऱ्याचदा त्यांच्या 'अर्थ'पूर्ण दुर्लक्षाने जुन्या, दाट लोकवस्तीच्या भागातील जीर्ण इमारतींचा रहिवासी वापर सुरू राहतो. वास्तविक धोकादायक इमारतींमध्ये कोणत्याही प्रकारे वास्तव्याला प्रतिबंधच असायला हवा. महापालिका अथवा नगरपालिकांकडून संबंधित मालकाला अनेकदा नोटिसा देण्यात येतात. पण, बहुतांश वेळा या सोपस्कारापलीकडे कोणतीही कठोर वा दंडात्मक कारवाई होत नसल्याने त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. परिणामी अशा धोकादायक इमारतींचा वर्षानुवर्षे बिनदिक्कत वापर होत राहतो. पालिका, वीज वितरण कंपनी, वाहतूक पोलिस आणि अन्य यंत्रणांमधील संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रसंगी 'लक्ष्मीदर्शन' घडवून कारवाईची टांगती तलवार आपल्या शिरावर पडणार नाही, याची खबरदारी घेतली जाते. खरे तर, तीन-चार किंवा त्याहून अधिक दशके जुन्या असलेल्या इमारतींचा रहिवासी वापर, त्यातून निर्माण झालेले धोके आणि अशा इमारतींचा पुनर्विकास हा वेगाने नागरीकरण होत असलेल्या सर्वच शहरांसमोरचा मोठा प्रश्न आहे. सर्व इमारतींची अवस्था वाईट नसली तरी बहुतेक जुन्या इमारतींमध्ये सरत्या वर्षागणिक धोक्यांची भर पडतेच. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या महानगरांत गेल्या काही वर्षांमध्ये जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला गती मिळाली आहे. मुंबईत बीडीडी चाळीसारख्या जुन्या इमारतींमधील रहिवाशांना नव्या, भक्कम प्रकल्पांमध्ये हक्काच्या सदनिका देण्यात येत आहेत. तथापि, आजही, विशेषतः पावसाळ्यात एखादी इमारत दुर्घटना तेथे घडते, हे वास्तव आहे. पालिका आणि महापालिका क्षेत्रातील तीस वर्षांपेक्षा जुन्या असलेल्या सर्वच इमारतींचे नियमित स्ट्रक्चरल ऑडिटही व्हायला हवे. या ऑडिटच्या अहवालानुसारच संबंधित इमारत निवासायोग्य आहे की नाही, हे निश्चित केले जावे.

सर्वच मोठ्या शहरांतील अनेक दशकांपूर्वीच्या बहुतांश इमारती त्या काळातील बांधकामाच्या पद्धती आणि दर्जामुळे आता जीर्ण झालेल्या असणे स्वाभाविक आहे. त्यातच अशा अनेक इमारतींच्या आजूबाजूला नव्याने उत्तुंग टॉवर, महाकाय प्रकल्प उभे राहतात. परिणामी या इमारती अंतर्बाह्य धोक्याने वेढलेल्या असतात. भूमिगत जलवाहिन्या आणि गटारी, भुयारी रस्ते, विविध प्रकारच्या केबल्ससाठी लागणारे डक्ट अशा सगळ्या कामांकरिता जमिनीखाली मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जाते. हे करताना खोदकामाच्या ठिकाणापासून विशिष्ट अंतरावरील इमारती, बांधकामांना होणाऱ्या संभाव्य धोक्याचा विचार केला जातो. परंतु, अशा इमारतींचे आयुर्मान विचारात घेऊन त्यांच्या पायापासून ते शेवटच्या मजल्यापर्यंत संपूर्ण स्ट्रक्चरल ऑडिट केले जात नाही. भूमिगत कामे करणारी यंत्रणा आणि संबंधित पालिका केवळ जमिनीवर साकारणाऱ्या प्रकल्पाचा भविष्याच्या दृष्टीने विचार करून त्याप्रमाणे नियोजन करतात. उदाहरणच घ्यायचे, तर तीस वर्षानंतरच्या लोकसंख्येचा विचार करून भूमिगत मार्ग किंवा मेट्रोची उभारणी होत असेल, तर त्या कालावधीपर्यंत संबंधित मार्गालगत असलेल्या इमारती त्यांच्या पाया तेवढाच मजबूत राहील काय, असा दीर्घकालीन विचार होताना दिसत नाही. जुन्या इमारतींचे उभारणीपासूनचे साधारण आयुर्मान, नंतर झालेले अतिरिक्त बांधकाम आणि लगतच्या भागात होणारी जमिनीखालची तसेच भूमिगत कामे यामुळे त्या इमारती नेमक्या कोणत्या स्थितीत आहेत, याचा नगररचना व वास्तुतज्ज्ञांकडून समग्र अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. त्या आधारे संबंधित राज्य शासनाने पालिका क्षेत्रासाठी नवी नियमावली तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. असे झाल्यास संबंधित पालिका आणि यंत्रणांना भविष्यातील धोक्याची माहिती मिळून नव्या बांधकामाच्या किंवा प्रकल्पाच्या आराखड्यातच तशी प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येईल. जुन्या, जीर्ण इमारतींच्या अतिरिक्त, अतिक्रमित बांधकामांवर वेळीच कारवाई आणि त्यांच्या रहिवासी वापराला कठोरपणे प्रतिबंध व्हावा. त्याचप्रमाणे जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासोबतच त्यांच्या वापराबाबत असलेल्या नियमांचीही काळजीपूर्वक पुनर्रचना केल्यास भविष्यात दिल्लीसारख्या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही. ■

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# दहशतवादाचे नवे समुद्री समीकरण

सोमालियामधील जिब्रिल 'वन-आर्म्ड' याह्या अली या व्यक्तीने येमेनमधून लष्करी दर्जाची शस्त्रे मिळवून 'अल-शबाब' या सोमालिअयन अतिरेकी संघटनेपर्यंत पोहोचवली. या व्यवहारात येमेनमधील शस्त्र व्यापाऱ्यांच्या माध्यमातून हुतींकडून शस्त्रे मिळवली गेल्याचा दावा करण्यात आला आहे. ही माहिती बारीक तपशिलानिशी पडताळली जाणे आवश्यक असले, तरी अशा नेटवर्कची शक्यता नाकारता येत नाही. कारण येमेन आणि सोमालिया यांच्यातील समुद्री भौगोलिक जवळीक, अस्थिर राजकीय परिस्थिती आणि दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेली तस्करीची मार्गव्यवस्था यामुळे अशा हालचालींसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. या घटनेतील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दहशतवादाच्या जगात वैचारिक शत्रुत्वापेक्षा व्यावहारिक हितसंबंध वरचढ ठरत आहेत का, हा प्रश्न. हुती हे इराणशी जवळीक असलेले शिया झैदी बंडखोर आहेत, तर 'अल-शबाब' ही सुन्नी कट्टरतावादी आणि 'अल-कायदा'शी संबंधित संघटना आहे. दोन्ही संघटनांच्या विचारसरणीत आणि प्रादेशिक उद्दिष्टांमध्ये मूलभूत फरक आहे. यापूर्वी 'अल-कायदा' आणि हुती यांच्यात संघर्षही झाला आहे. त्यामुळे या दोन्हींचे संबंध एखाद्या औपचारिक दहशतवादी आघाडीच्या स्वरूपात आहेत, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल; मात्र दहशतवादी संघटनांना कायमस्वरूपी मित्र नसतात. त्यांचे व्यवहार प्रामुख्याने हितसंबंधांवर आधारित असतात. शस्त्रांची गरज असलेल्या संघटनेला शस्त्रे मिळत असतील आणि शस्त्रपुरवठा करणाऱ्या घटकाला त्यातून पैसा, प्रभाव किंवा नवीन भौगोलिक संपर्क मिळत असेल, तर वैचारिक मतभेद तात्पुरते बाजूला ठेवले जाऊ शकतात. याच कारणामुळे 'हुती-अल-शबाब' संपर्काची शक्यता गंभीरपणे तपासण्याची गरज आहे.

'अल-शबाब'कडे मनुष्यबळ, आर्थिक स्रोत आणि सोमालियातील काही भागांमध्ये प्रभाव आहे; परंतु आधुनिक लष्करी तंत्रज्ञान, अचूक लक्ष्यभेदी क्षमता, ड्रोनविरोधी साधने, प्रगत संप्रेषण व्यवस्था आणि आधुनिक शस्त्रास्त्रे यांची त्याला सातत्याने गरज भासते. दुसरीकडे, हुतींनी गेल्या काही वर्षांमध्ये क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि इतर आधुनिक लष्करी साधनांचा वापर करून आपली क्षमता लक्षणीयरीत्या वाढवली आहे. येमेनमधील संघर्षामुळे तयार झालेल्या शस्त्रांच्या बाजारपेठा, तस्करीचे मार्ग आणि मध्यस्थांचे जाळे या परिस्थितीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

अशा परिस्थितीत एखादा मध्यस्थ दोन्ही बाजूंच्या गरजा जोडत असेल, तर त्यातून निर्माण होणारे नेटवर्क एखाद्या औपचारिक संघटनेपेक्षा अधिक धोकादायक ठरू शकते. कारण त्याला एका ठरावीक कराराची किंवा संयुक्त नेतृत्वाची आवश्यकता नसते.

पैसा, शस्त्रे आणि माहिती यांची देवाणघेवाण करणारे छोटे-छोटे घटक स्वतंत्रपणे काम करू शकतात. हीच बाब सुरक्षा यंत्रणांसाठी आव्हानात्मक आहे. दहशतवादी नेटवर्कची पारंपरिक कल्पना म्हणजे एका संघटनेचे नेतृत्व, त्याखालील सदस्य आणि त्यांच्यातील स्पष्ट आदेशसाखळी; परंतु आधुनिक काळातील दहशतवाद अधिक विकेंद्रित होत आहे. शस्त्रतस्कर, स्थानिक गुन्हेगारी टोळ्या, बनावट कंपन्या, समुद्री तस्करीचे मार्ग आणि डिजिटल आर्थिक व्यवहार यांचा वापर करून विविध संघटना एकमेकांशी जोडल्या जाऊ शकतात. या प्रकरणाचे गांभीर्य समजून घेण्यासाठी लाल समुद्र आणि एडनच्या आखाताचे सामरिक महत्त्व लक्षात घ्यावे लागेल.

युरोप आणि आशियामधील समुद्री व्यापारासाठी हा प्रदेश अत्यंत महत्त्वाचा आहे. सुएझ कालवा, बाब-अल-मंदेब सामुद्रधुनी आणि एडनचे आखात हे जागतिक व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे मार्ग आहेत. येमेनच्या किनाऱ्यावर हुतींचा प्रभाव आणि सोमालियाच्या किनाऱ्यावर 'अल-शबाब'ची उपस्थिती यामुळे या संपूर्ण समुद्री पट्ट्यात अस्थिरतेची अनेक केंद्रे आधीपासून अस्तित्वात आहेत.

त्यात शस्त्रतस्करी, दहशतवादी संपर्क आणि समुद्री नेटवर्क यांची भर पडली, तर परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होऊ शकते. याचा परिणाम केवळ स्थानिक सुरक्षेवर होणार नाही. व्यापारी जहाजांना वाढता धोका निर्माण झाल्यास विमा खर्च वाढतो, जहाजांना पर्यायी मार्ग स्वीकारावे लागतात आणि वाहतूक खर्च वाढतो. परिणामी, जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे लाल समुद्रातील दहशतवादी अस्थिरता ही शेवटी जागतिक अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचणारी समस्या आहे. येमेन आणि सोमालिया यांच्यामधील समुद्री परिसराचा वापर तस्करीसाठी होण्याची शक्यता नवी नाही. या भागात शस्त्रे, अमली पदार्थ, मानवी तस्करी आणि इतर बेकायदेशीर व्यापाराचे मार्ग पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. दहशतवादी संघटनांना या मार्गांचा उपयोग मिळाला, तर केवळ शस्त्रेच नव्हे, तर पैसा, माहिती आणि मनुष्यबळाची वाहतूक करण्याचीही संधी मिळू शकते. यामुळे समुद्री सुरक्षेचा प्रश्न अधिक व्यापकपणे पाहण्याची गरज आहे.

या प्रश्नावर उत्तर शोधताना केवळ युद्धनौका तैनात करून समस्या सुटणार नाही. बंदरांवर देखरेख, संशयास्पद आर्थिक व्यवहारांचे परीक्षण, जहाजांच्या हालचालींचे निरीक्षण, किनारपट्टीवरील स्थानिक यंत्रणांशी समन्वय आणि आंतरराष्ट्रीय गुप्तचर सहकार्य यांना समान महत्त्व द्यावे लागेल.

या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची सावधगिरी आवश्यक आहे. हुती आणि 'अल-कायदा' यांच्यातील संबंधांकडे पाहताना त्यांच्यातील वैचारिक संघर्ष दुर्लक्षित करता कामा नये. केवळ काही शस्त्रव्यवहार किंवा मध्यस्थांमधील संपर्क आढळला म्हणून दोन्ही संघटनांनी औपचारिक युती केली आहे, असे म्हणणे अचूक ठरणार नाही; परंतु याउलट होणारी चूकही टाळली पाहिजे. वैचारिक मतभेद आहेत म्हणून कोणतेही व्यवहार्य सहकार्य होणारच नाही, असे मानणेही धोकादायक आहे. दहशतवादी संघटना आपल्या अस्तित्वासाठी आणि क्षमतेसाठी आवश्यक असलेले संसाधन मिळवताना अनेकदा तात्कालिक तडजोडी करतात. त्यामुळे प्रश्न 'युती झाली आहे का?' एवढाच नसून 'कोणत्या पातळीवर, कोणत्या माध्यमातून आणि कोणत्या उद्देशाने संपर्क होत आहे?' हा असायला हवा. लाल समुद्र आणि एडनचे आखात भारतासाठी विशेष महत्त्वाचे आहेत. भारताचा मोठा परदेशी व्यापार समुद्री मार्गांवर अवलंबून आहे. पश्चिम आशिया, आफ्रिका आणि युरोपशी जोडणाऱ्या समुद्री मार्गांमध्ये या प्रदेशाचे स्थान महत्त्वाचे आहे. भारतीय जहाजवाहतूक, ऊर्जा आयात, निर्यातदार आणि परदेशात काम करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही या परिसरातील स्थैर्य आवश्यक आहे.

या पृष्ठभूमीवर भारताने या घडामोडीकडे केवळ पश्चिम आशियातील संघर्षाच्या चौकटीत न पाहता हिंद महासागराच्या व्यापक सुरक्षेच्या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. समुद्री गुप्तचर व्यवस्था अधिक सक्षम करणे, मित्रदेशांशी माहितीची देवाणघेवाण वाढवणे आणि पूर्व आफ्रिका-लाल समुद्र क्षेत्रातील सुरक्षा सहकार्य मजबूत करणे ही काळाची गरज आहे. विशेषतः दहशतवादी नेटवर्क आणि समुद्री गुन्हेगारी नेटवर्क यांच्यातील संभाव्य संबंधांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेली शस्त्रांची उपलब्धता आणि संस्थात्मक पोकळी दहशतवादी नेटवर्कसाठी पोषक वातावरण तयार करते. त्यामुळे संघर्षाचे राजकीय समाधान आणि प्रादेशिक स्थैर्य हे दहशतवादविरोधी धोरणाचा अविभाज्य भाग असले पाहिजे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# पेपरफुटीने विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात

महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही राज्यातील अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे. राज्य प्रशासनासाठी अधिकारी निवडण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून होते. त्यामुळे या परीक्षेची विश्वासार्हता म्हणजे केवळ एका संस्थेची प्रतिष्ठा नव्हे ती राज्याच्या प्रशासनाच्या गुणवत्तेशी जोडलेली बाब आहे. औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीच्या आरोपानंतर पुण्यात व कोल्हापुरात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलन केले. महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात विविध भरती व पात्रता परीक्षांमध्ये झालेले गैरप्रकार, पेपरफुटीचे आरोप, परीक्षांतील त्रुटी आणि त्यानंतर विद्यार्थी आंदोलने यामुळे एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. परीक्षा यंत्रणा विद्यार्थ्यांची परीक्षा घेत आहे की काय, हा खरा प्रश्न आहे. आज एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीने राज्याला धक्का बसला आहे. या प्रकरणात तपास पुढे जात असून अटकसत्रही झाले आहे. काही संशयितांमध्ये आयोगाशी संबंधित व्यक्तींचाही समावेश असल्याचे तपासातून समोर आले आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ बाहेरच्या दलालांचा आहे की परीक्षा व्यवस्थेच्या आतील काही दुवेही त्यात सहभागी आहेत हा प्रश्न तपास यंत्रणांनी शेवटापर्यंत नेणे आवश्यक आहे.

प्रश्नपत्रिका छपाईपासून ती परीक्षार्थींच्या हातात पोहोचेपर्यंत अनेक टप्पे असतात. प्रश्ननिर्मिती, प्रश्नपत्रिकेची निवड, छपाई, पॅकिंग, वाहतूक, सुरक्षित साठवण, परीक्षा केंद्रांवर वितरण आणि परीक्षा सुरू होईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर गोपनीयता आणि सुरक्षा अत्यावश्यक आहे. यापैकी एका टप्प्यावरही गैरप्रकार झाला तर संपूर्ण परीक्षा धोक्यात येऊ शकते. प्रश्नपत्रिका फुटते तेव्हा केवळ एक परीक्षा रद्द होत नाही तर एका पिढीच्या कष्टांवरील विश्वासाला तडा जातो. स्पर्धा परीक्षा म्हणजे लाखो तरुणांच्या आयुष्याचे प्रवेशद्वार असते. एखाद्या सरकारी नोकरीसाठी एखादा तरुण दोन-तीन वर्षे अभ्यास करतो. गावाकडच्या छोट्याशा घरात राहून, शेतमजुरी किंवा छोटी-मोठी कामे करून, आई-वडिलांच्या कष्टाच्या पैशातून पुस्तके घेतो, शिकवणी वर्ग लावतो, ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शहरात येऊन खोली भाड्याने घेतो. अभ्यासिकेमध्ये पैसे भरून दहा-बारा तास अभ्यास करतो. काही जण तर नोकरी, संसार आणि जबाबदाऱ्या सांभाळून स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. त्यांच्या या कष्टाचे अंतिम मूल्यमापन काही तासांच्या परीक्षेत होते. मात्र त्या परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका काहींच्या हातात पोहोचली तर मग परीक्षागृहात बसलेला प्रामाणिक विद्यार्थी आणि प्रश्नपत्रिका आधीच मिळवून बसलेला विद्यार्थी यांच्यात स्पर्धा कशी राहणार? ही स्पर्धा राहत नाही. हा शिक्षण व्यवस्थेचा पराभव असतो. प्रश्नपत्रिका फुटणे म्हणजे मेहनती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर केलेला संघटित हल्ला असतो. 'नीट'च्या पेपरफूट प्रकरणात एका शिकवणी वर्गाच्या प्रमुखाचा मुलगा परीक्षा देत असल्याने हा पेपर परीक्षेपूर्वीच लाखो रुपये देऊन विकत घेणाऱ्यांच्या हातात पडला. परिणामी परीक्षा रद्द झाली. मेहनत करून जिद्द, चिकाटीने स्वाभिमान जागृत ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. या घटनेनंतर पुन्हा एकदा राज्यभरातील एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या संतापाचा आक्रोश झाला आहे. आज हा आक्रोश पुण्यापासून कोल्हापूरपर्यंत दिसून येत आहे. पुण्यामध्ये हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. हजारो विद्यार्थ्यांनी एकत्र येत ११ मागण्या सरकारसमोर ठेवल्या आहेत. स्पर्धा परीक्षा अतिशय पारदर्शी पद्धतीने पार पाडण्यासाठी सरकार सातत्याने काम करते आहे. ही प्रक्रिया अधिक कशी मजबूत करता येईल यासाठी राज्यस्तरावर एक उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. पेपरफुटीविरोधातील आंदोलनांमध्ये अनेक संघटना सहभागी झाल्या आहेत. त्यांनी त्याविरुद्ध आवाज उठवला आहे. कोणती संघटना कोणत्या विचारसरणीची आहे, यापेक्षा तिने उपस्थित केलेल्या प्रश्नाची सत्यता काय आहे, हे तपासणे महत्त्वाचे आहे. पेपरफुटीने अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जात आहे. पेपरफुटीच्या घटनांना वेळी आळा घालणे आणि परीक्षार्थींचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास दृढ करणे आवश्यक आहे. ■



९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# लघुउद्योगांची चौकट विस्तारताना

नुकत्याच संपलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सुरुवातीपासून अगदी अधिवेशन संपेपर्यंत विरोधी पक्षांनी गोंधळ घातला. त्यामुळे याच गोंधळाच्या पृष्ठभूमीवर, काही पारित झालेल्या विधेयकांकडे दुर्लक्ष झाले. यापैकी एक म्हणजेच एमएसएमई (विकास) विधेयक २०२६ होय!

विरोधकांच्या गोंधळाचा फटका या पारित झालेल्या महत्त्वपूर्ण विधेयकालाही बसला आणि त्याकडे स्वाभाविकपणेच दुर्लक्ष झाले. २००६ मध्ये पारित झालेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास कायद्याच्या अंमलबजावणीला यंदा २० वर्षे पूर्ण झालीत. या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारच्या पुढाकाराने, पारित झालेल्या एमएसएमई कायद्यातील नव्या तरतुदींचे महत्त्व अधिकच वाढते.

या साऱ्या वैधानिक प्रक्रियेची व्यावसायिक पृष्ठभूमी म्हणजे, गेल्या दोन दशकांमध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग आणि उद्योजकांमध्ये मोठे बदल घडून आले आहेत. त्याचाच प्रत्यय आज सर्वदूर येत आहे. एमएसएमई क्षेत्रात आजवरच्या बदलांचे परिणाम म्हणजे, एप्रिल २०२३ मध्ये उद्यम नोंदणीअंतर्गत एमएसएमई उद्योगांची संख्या १.६५ कोटींवरून, एप्रिल २०२६ मध्ये ९.१६ कोटींवर गेली. या लघु उद्योगांच्या माध्यमातूनच, देशात सुमारे ४० कोटी रोजगार उपलब्ध झाले असून, त्याचे प्रमाण सातत्याने वाढतेच आहे. याचेच सकारात्मक परिणामही एकूणच अर्थव्यवस्थेवर दिसून येत आहेत. या बदलत्या पृष्ठभूमीवर सरकारने एमएसएमई क्षेत्रातील लघुउद्योगांच्या कार्यप्रणालीत सुधारणांसाठी आणि सुलभीकरणासाठी, यावेळी खालील सुधारणा केल्या आहेत :

**व्यावसायिक परिस्थितीनुसार लघुउद्योगांना चालना देणे :** नव्या नियमानुसार एमएसएमई क्षेत्रातील उद्योग-व्यवसायाचे वर्गीकरण आता, कारखान्यातील मशिनरीसाठीची गुंतवणूक व उलाढाल या निकषांवर करण्यावर भर असणार आहे. याशिवाय, उद्यम प्रणालीअंतर्गत एमएसएमईची संगणकीय नोंदणीही ऐच्छिक व निःशुल्क राहणार आहे.

**एमएसएमईची देयके व रक्कम वेळेत मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा व पद्धती :** या नव्या प्रणालीअंतर्गत, एमएसएमई उद्योगांना, त्यांच्या देयकासंबंधीचे वाद संगणकीय पद्धतीने सोडवून घेण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे लघुउद्योजकांच्या वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. याशिवाय, देयकाच्या रकमेशी संबंधित विवाद सहा महिन्यांहून अधिक काळासाठी प्रलंबित असल्यास, विवादित रकमेच्या अर्धी रक्कम संबंधित न्यायासन देऊ शकेल, अशी तरतूदही करण्यात आली आहे.

**प्रलंबित विवादित देयकांची प्रकरणे तातडीने निकाली काढणे :** सार्वजनिक क्षेत्रातील सर्व आस्थापनांना, त्यांच्या देयक प्रक्रियेसाठी एमएसएमई उद्योगांसाठी ट्रेड रिसिव्हेबल्स डिस्काउंटिंग सिस्टम प्लॅटफॉर्म (ट्रेड्स) पद्धतीचा वापर अनिवार्य करण्यात आला. राज्य सरकारांनीही याचाच वापर राज्यस्तरीय सार्वजनिक उद्योगांसाठी तरतूद नव्या कायद्यात आहे. उपलब्ध माहितीनुसार, एमएसएमई क्षेत्रात ट्रेड्सद्वारा, २०२२-२३ मध्ये ४० हजार कोटी रुपयांची देयके देण्यात आली. ही उलाढाल २०२५-२६ मध्ये ३.४७ लाख कोटींवर पोहोचली आहे.

**राज्यस्तरावर एमएसएमई समन्वय मंडळांची निर्मिती करणे :** कायद्यातील नवीन तरतुदींनुसार, नव्याने लवचीक व व्यवसायपूरक अशा एमएसएमई क्षेत्रातील उद्योगांत समन्वय साधण्याचे काम करण्यासाठी, मायक्रो अॅण्ड स्मॉल एंटरप्राईज फॅलिसिटेशन सेंटर (एमएसईएफसी)ची स्थापना करण्यासाठी राज्यांनी पुढाकार घ्यावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. यामुळे एमएसएमई क्षेत्रातील उद्योग व उद्योजकांचे प्रश्न जलद मार्गी लागतील अशी अपेक्षा आहे. या समन्वय केंद्राच्या कार्यकक्षेत एमएसएमई उद्योगांची प्रलंबित देयके व त्याच्याशी संबंधित मुद्यांचाही समावेश आहे. नव्या कायद्यातील राज्यस्तरीय तरतुदी अधिक उपयुक्त, परिणामकारक व एमएसएमई क्षेत्राला पूरक ठराव्यात, यासाठी राज्य सरकारांना प्रशासनिक व वैधानिक स्वायत्तताही प्रदान करण्यात आली आहे.

**एमएसएमईसाठी सुलभ आणि व्यावसायिक विश्वासाचे वातावरण प्रदान करणे :** नव्या तरतुदींनुसार, विशिष्ट तरतुदींचे पालन न झाल्यास घेण्यात येणारी कठोर भूमिका व त्यानुसार करण्यात येणाऱ्या कारवाईला सौम्य स्वरूप देण्याची भूमिका महत्त्वाची. यापूर्वी, कायदेशीर तरतुदींची पूर्तता न झाल्यास दंड व दिवाणी शिक्षेची तरतूद होती. यासंदर्भात अपेक्षित नोंदणी न होणे अथवा संबंधित माहिती विशिष्ट कालावधीत न भरण्यासारख्या प्रकारांसाठीही एमएसएमई कायद्यात दुहेरी दंडात्मक तरतुदी होत्या. यावर नव्या सुधारणांमध्ये दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

नवीन तरतुदीनुसार, एमएसएमई व लघुउद्योजकांच्या संदर्भात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ अपूर्ण वा चुकीची माहिती वा तपशील सादर केल्यास, अशा प्रकरणी पहिल्या वेळेस संबंधित लघुउद्योजकाला समज देऊन सुधारण्याची संधी दिली जाणार आहे. त्यानंतर असाच प्रकार पुन्हा आढळल्यास, अशा लघुउद्योजकावर दंडात्मक कारवाईचा बडगा उचलला जाण्याची तरतूदही करण्यात आली आहे. अशाच प्रकारच्या तरतुदींचा अवलंब लघुउद्योजकांना देय असणाऱ्या देयकांची बाकी रक्कम व त्यावरील देय व्याजाचे तपशील, आपल्या वार्षिक व्यवसाय विवरणपत्रात नमूद न करणाऱ्या व्यावसायिकाला आधी समज व नंतर दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. याचाही सकारात्मक परिणाम एमएसएमईच्या आर्थिक उलाढालीवर होणे अपेक्षित आहे. या संदर्भातल्या नव्या कायदेशीर तरतुदी व धोरणात्मक निर्णयांमुळे, एमएसएमई क्षेत्रात विश्वासाची भावना वाढीस लागेल. तसेच, लघुउद्योग क्षेत्रातील वाढता व्यवसाय लक्षात घेता, या उद्योग क्षेत्राशी संबंधित सर्व उद्योगांमध्ये परस्पर सहकार्यही वाढण्याचा विश्वास यानिमित्ताने सरकारतर्फे व्यक्तकरण्यात आला आहे. ■

९८२२८४७८८६

(लेखक एचआर व्यवस्थापक आणि सल्लागार आहेत.)

## वाचक पत्रे

### सहजीवनाची आवश्यकता

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सर्वसमावेशक आणि लवचीक आहे. भेदविरहित, एकसंध व चारित्र्यसंपन्न समाजरचना तयार करणे हे संघाचे ध्येय आहे. त्यासाठीच संघाने मुस्लिम राष्ट्रीय मंच यासह विविध आयाम दिले आहेत. संघ शाखेवर रोज एकात्मता स्तोत्र आणि मंत्र म्हटला जातो. त्यात जैन, बुद्ध, शीख, शैव, शिव आणि वैष्णव या सर्वांना नमन केले जाते. समरसतेशिवाय समता निर्माण होऊ शकणार नाही आणि दोन्ही नसेल तर आपण राष्ट्रीयतेची कल्पना करू शकणार नाही. कोणत्याही व्यक्तीचा परिचय झाल्यावर आपल्या मनात तो कोणत्या जाती, धर्माचा आणि वर्गाचा आहे असा विचार येणे हे खुजेपणाचे लक्षण आहे. माणसाने माणसाकडे माणूस म्हणूनच पाहिले पाहिजे.

मात्र, यातले वास्तव असे की, फक्त हिंदू समाजाला सांगून भाईचारा निर्माण होणार नाही. तर इतर सर्व समुदायांना सोबत यावे लागेल. गेल्या दोन-तीन दशकांत मतांसाठी तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे मुख्यतः समाजा-समाजात दरी निर्माण झाली आहे. सर्व प्रकारचा जिहाद सुरू आहे. शत्रुता, कटुता, अविश्वास वाढला आहे. आज खऱ्या अर्थाने 'हिंदू मुस्लिम शीख इसाई, हम सब भाई भाई' या भावनेसह सहजीवनाची आवश्यकता आहे.

राष्ट्रवादी मताचे मुसलमान आणि ख्रिश्चन यांना स्वयंसेवक आनंदाने स्वीकारतील. फक्त एका अटीवर की, त्यांनी हिंदूंचे धर्मांतरण आणि लव्ह जिहाद किंवा कोणत्याही प्रकारचा जिहाद करू नये. घर वापसीला विरोध करू नये. हे शक्य आहे की नाही हे त्यांच्या प्रतिसादावर अवलंबून आहे. सकारात्मक प्रतिसाद मिळण्यासाठी आशावादी राहून त्यांच्याशी मैत्रीपूर्ण व्यवहार ठेवून प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने कार्य करणे आवश्यक आहे.

**प्रदीप गडकरी**/९८२२४७३२२१

■■

### दहीहंडी : एक साहसी व कलात्मक उत्सव

दहीहंडी उत्सव म्हणजे एकत्र जमणाऱ्या सर्व गोविंदांचा एक सामाजिक, साहसी व कलात्मक उत्सव होय. महाराष्ट्र शासनाने दहीहंडी उत्सव शासनाच्या साहसी खेळामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय यातच या उत्सवाचे महत्त्व दिसून येते. भगवान श्रीकृष्ण यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ही सर्व गोविंदा मंडळी समाजात विधायक, रचनात्मक व श्रद्धेचा पाया रचून न्याय कार्यासाठी आपली कला, कौशल्य व साहसाचे प्रात्यक्षिक दाखवून समाजाला योग्य व सकारात्मक दिशा दर्शविण्याचे उपक्रम राबविते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या दहीहंडी उत्सवातून समाजातील विविध थरातील युवक एकत्र येतात, हे सामाजिक ऐक्याचे प्रतीक आहे. वेगवेगळ्या विचार व संप्रदायांचे युवक एकत्र येणे म्हणजे सामाजिक ऐक्याचे दर्शन होय. सामाजिक संघटितपणा दहीहंडी उपक्रमातून दिसून येतो. या दहीहंडी उपक्रमातून

गोविंदांच्या कला, कौशल्य, संयम, सहकार्य व समन्वयाचे दर्शन घडते. दहीहंडीचे मनोरे सामाजिक ऐक्याचे



प्रतीक होय. गोविंदांचा प्रचंड आत्मविश्वास बळावणारा हा उत्सव होय. अत्यंत संयमाने गोविंदा मनोरे उभारतात. एकावर एक उभे राहून हंडीपर्यंत गोविंदा पोहचतो व हंडी फोडतो. हे प्रचंड साहस व आत्मविश्वासाचे लक्षण आहे.

''एकमेका साहाय्य करू-अवघे धरू सुपंथ'' असा संदेश देणारा हा उत्सव होय. दहीहंडीतून साहस, धाडस, धीरोदात्तपणा व विश्वास यासारखे गुण जोपासले जातात. हा उपक्रम भगवान श्रीकृष्ण यांच्या सर्वगुणसंपन्नतेचा आदर व सन्मान करणारा उत्सव होय. गोविंदांनी दहीहंडी उत्सव साजरा करीत असताना आपली सर्वांची काळजी घेणे गरजेचे आहे. प्रेक्षकांनी शांतता व संयम बाळगावा. सहभागी गोविंदांनी उत्सवास साजेशी भूमिका पार पाडल्यास दहीहंडीचा आनंद द्विगुणित होतो.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

■■

### बडनेरा-नाशिक मेमू रद्द करू नये

जळगाव आणि शिरसोली दरम्यान रुळांच्या दुरुस्तीमुळे, भुसावळ रेल्वे विभागाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी होणारी ६११२९/६११३० बडनेरा-नाशिक रोड-बडनेरा मेमू ट्रेन रद्द केली आहे. प्रवाशांना होणारा त्रास टाळण्यासाठी, ही मेमू ट्रेन पूर्णपणे रद्द करण्याऐवजी थोड्या अंतरावरच थांबवावी, अशी रेल्वे प्रवाशांची मागणी आहे. रेल्वे विभाग या मागणीकडे लक्ष देईल, अशी आशा आहे. ■

**राजेश कारिया**/अकोला

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## डॉ. भाग्यश्री राठोड यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

शिक्षक दिनानिमित्त ड्रीम फाऊंडेशन, डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र व श्री सिद्धेश्वर कृषी पर्यटन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात डॉ. भाग्यश्री शाम राठोड यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार डॉ. अशोक नगरकर (वरिष्ठ वैज्ञानिक, DRDO) व श्री राम रुई (उद्योजक, बालाजी उद्योग समूह) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन काशिनाथ भतगुणकी यांनी केले.

# आपत्ती व्यवस्थापनात सोलापूर जिल्ह्याचे उत्कृष्ट कार्य

### मुंबईतील सोहळ्यात ६ राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आणि बचावकार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अधिकारी, व्यक्ती व संस्थांचा मुंबई येथे आयोजित सहाव्या 'सेफ-टेक पुरस्कार, परिषद व प्रदर्शन २०२६' मध्ये गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात सोलापूर जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या उत्कृष्ट कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत जिल्ह्याला एकूण सहा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

किंग्ज एक्सप्लो मीडिया यांच्या वतीने ३ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबईतील हॉटेल ताज येथे 'सहावा सेफ-टेक पुरस्कार, परिषद व प्रदर्शन २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन,अग्निशमन आणि बचावकार्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १३५ अधिकारी, व्यक्ती व संस्थांचा या वेळी गौरव करण्यात आला. या सहा पुरस्कारांमुळे सोलापूर जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कार्यक्षमतेसह अधिकारी आणि बचाव पथकाच्या सेवाभावी कार्याला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, हा सन्मान जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरला आहे.




**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान**

सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांना 'बेस्ट ऑफिसर' या विभागात 'बेस्ट फायर फायटर अँड रेस्क्युअर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आपत्तीच्या काळात तत्परतेने कार्यवाही करणे, बचावकार्याचे प्रभावी नियोजन आणि विविध आपत्कालीन परिस्थितींमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**डीआरएफच्या जवानांचाही राष्ट्रीय स्तरावर गौरव**

सोलापूर जिल्हा आपत्ती प्रतिसाद दलातील (डीआरएफ) बजरंग होटकर, रामचंद्र वाघमारे, सागर धप्पाधुळे, शुभांगी गवते आणि अरुणा राठोड यांना पूरपरिस्थितीतील बचावकार्य, आग प्रतिबंधक उपाययोजना, आपत्कालीन बचावकार्य तसेच गर्दी नियंत्रणामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'फर्स्ट रिस्पॉन्डर अँड रेस्क्युअर' या विभागात 'बेस्ट फायर फायटर अँड रेस्क्युअर ऑफ द इयर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

**निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडून अभिनंदन**

सोलापूर जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला मिळालेल्या या सन्मानाबद्दल निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले तसेच डीआरएफच्या सर्व स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. आपत्तीच्या काळात नागरिकांच्या मदतीसाठी तत्पर राहून केलेल्या कार्याचे कौतुक करून त्यांनी अधिकारी व जवानांना पुढील कार्यासाठी

# शहराच्या दीर्घकालीन विकासाचे नियोजन करण्यावर प्रशिक्षणात भर

### रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत भाजप नगरसेवक प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

लोकप्रतिनिधी म्हणून प्रभावी कामकाज, संघटनात्मक शिस्त आणि जनतेशी सातत्यपूर्ण संवाद यांचे धडे घेत भाजपच्या नगरसेवकांच्या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा मुंबईतील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे उत्साहात समारोप झाला. 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' अंतर्गत सोलापूरसह विविध महानगरपालिकांतील भाजप नगरसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी भाजपचे राष्ट्रीय सह महामंत्री (संगठन) शिवप्रकाश यांनी नगरसेवकांना संघटन, लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी आणि पक्षाच्या विचारधारेनुसार काम करण्याबाबत मार्गदर्शन केले. राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचा समारोप झाला.भाजपचे प्रदेश सरचिटणीस निरंजन डावखरे यांनी जनतेने मोठ्या विश्वासाने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी आश्वासने पूर्ण करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करावे, असे सांगितले. यावेळी आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यासह पदाधिकारी आणि नगरसेवक उपस्थित होते.

आगामी 'व्हिजन २०४७' डोळ्यासमोर ठेवून शहराच्या दीर्घकालीन विकासाचे नियोजन करण्यावर प्रशिक्षणात भर देण्यात आला. विकास आराखड्याच्या आधारे नियोजनबद्ध शहरविकास साधण्याची गरज व्यक्त करण्यात आली.मुंबई महापालिकेचे सभागृह नेते गणेश खामकर यांनी सभागृहातील नगरसेवकांची भूमिका, कामकाजाचे नियम आणि विकासकेंद्री चर्चेचे महत्त्व स्पष्ट केले. दोन दिवसांत महापालिका प्रशासन, सभागृहाचे कामकाज, संघटनात्मक जबाबदारी आणि जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

### प्रशिक्षित नगरसेवकांतून प्रभावी नेतृत्व घडेल : नरेंद्र काळे

दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा नगरसेवकांना आगामी काळात निश्चितच मोठा फायदा होणार आहे. नेतृत्व तयार होत असताना लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्यानंतर पुढील कामकाजासाठी त्यांना प्रशिक्षित असणे गरजेचे आहे. हीच बाब लक्षात घेऊन भाजपने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले. प्रशिक्षणातून मिळालेल्या मार्गदर्शनाचा उपयोग नगरसेवकांच्या प्रत्यक्ष कामातून निश्चितच दिसून येईल. जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करताना या प्रशिक्षणाचा सकारात्मक परिणाम जाणवेल, असा विश्वास सोलापूर महापालिका सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी व्यक्त केला.

## पाणी भरताना विद्युत मोटारीचा शॉक लागून ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

घरामध्ये विद्युत मोटारीने नळाचे पाणी भरत असताना अचानक इलेक्ट्रिक शॉक बसल्याने एका ५५ वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना जुना विडी घरकुल परिसरातील सोनिया नगरात आज सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. सिद्राम चंद्रप्पा बुडूर (वय ५५ वर्ष, रा.सोनिया नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर) असे मयताचे नाव आहे. सोमवारी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास नळाला पाणी आले होते. विद्युत मोटारीने पाणी भरत असताना अचानक शॉक बसल्याने ते खाली कोसळून बेशुद्ध झाले . त्यामुळे त्यांना उपचाराकरिता मुलगा किरण यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सिद्राम बुडूर यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले एक मुलगी असा परिवार आहे.





## बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यानात बालगोपालांची दहिहंडी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ७ सप्टेंबर -**

मैंदर्गी रस्ता समर्थ पार्क येथील बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यान येथे नव चैतन्य बाल मंडळाच्या वतीने 'गोविंदा आला रे'च्या जयघोषात दहिहंडी बाल गोपालांनी फोडली.

आदल्या रात्री श्रीकृष्ण जन्माष्ठमी निमित्त भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सव पाळणा कार्यक्रम झाला. महिलांनी पाळणा गायला आणि बाल गोपालांनी दहिहंडी फोडली. मेजर संदिप सलगरे, हिराकांत जामदार, 'विश्वनाथ सुतार, मनोज जाधव, गोपाळ गंवंडी, सुधाकर काशेट्टी, महेश बंदिछोडे, वाय. पी. बिराजदार आदींसह महिला व लहान मुलांची उपस्थिती होती. प्रसाद वाटपाने सांगता झाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी बाळ श्रीकृष्णाची व बाल गोपाळांची वेषभूषा धारण केली होती. एकावर एक मणोरे रचून या बालगोपाळांनी दहिहंडी फोडल्याचे चित्र साक्षात गोकूळ अवतरल्यासारखे वाटत होते.

**विकणे आहे**

महाळुंग ता. माळशिरस जि. सोलापूर हद्दीत प्लॉटिंगसाठी शेत जमीन विकणे आहे. एक मालकी, हायवे लगत आहे.

**संपर्क - तुळसा डांगे, महाळुंग, ता. माळशिरस. जि.सोलापूर.**

**CHANGE IN NAME**

I, hereby declare that, my old name "**Shivraj Chidanand Swami**" (Old Name) has been Changed to new name "**Shivaraj Chidanand Swami**" (New Name)

**Affidavit No. 114/2026 Dt. 07/09/2026**

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project

**TENDER NOTICE**

**1. Cold Room Transit 15 MT (conventional refrigerant )**
**2.Dock leveller System 2m *2m**
**3. crates 20kg hand pallet trunk**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Farm Heritage Farmers Producer Company Limited, Pandarpur, Solapur** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **www.smart-mh.org** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **18/09/2026 up to 02:00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project Dist. Solapur**

रजि नं. SUR/NSR/RSR/ (R) 470 / 2000 Dt. 25-8-2000

**श्री शिवलीला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**
१०२ सी ९३, नीलकंठेश्वर मंदिर, भवानी पेठ, सोलापूर

**सव्वीसावा वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**
(फक्त सभासदांकरिता)

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो, आपल्या पतसंस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेची **सव्वीसावा वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७/०९/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता १०२ सी ९३ श्री नीलकंठेश्वर देवस्थान, भवानी पेठ, सोलापूर** येथे बोलविण्यात येत आहे. सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील सभा दि. २८/०९/२०२५ रोजीची वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२६ सालाचे अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व नफ्याची वाटणी मंजूर करणे.
३) सन २०२५-२६ सालाचे वैधानिक लेखापरिक्षक अहवालाची माहिती घेणे.
४) सन २०२५-२६ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५) सन २०२४-२५ सालाचे वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालची नोंद घेणे.
६) सन २०२६-२७ सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व वेतन ठरविणे.
७) सन २०२६-२७ सालाकरिता शासकीय नामतालिकेतून (पॅनल) वैधानिक लेखा परिक्षकाची याची नेमणूक करणे व वेतन ठरविणे.
८) सन २०२६-२७ सालाकरिता शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
९) माननीय अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीने येणारे आयत्या वेळचे विषयांचा विचार करणे.

दि.०१/०९/२०२६
सोलापूर

मा.संचालक मंडळाच्या आज्ञेनुसार
श्री. देविदास राजय्या ईराबत्ती- व्हा. चेअरमन • श्री. संदिप लिंगराज वल्याळ -चेअरमन

विशेष सुचना
१) गणपुर्ती (कोरम) अभावी सभा तहकुब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज नियुक्त ठिकाणीच नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने सुरु होईल. सदर सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) संस्थेचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक सभासदाकरिता संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.
३) ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाविषयी, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकासंबंधी काही माहिती, प्रश्न वा सुचना मांडावयाचे असतील त्यांनी दि.२५/९/२०२६ रोजी पर्यंत लेखी निवेदन कार्यालयीन वेळेत (सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत) आणून द्यावेत. नंतर आलेल्या निवेदनाचा विचार केला जाणार नाही.
४) सर्व सभासदांनी आपआपले भाग दाखले घेऊन जावेत तसेच वारस नोंदल्याची खात्री करून घ्यावी. सभासदांनी त्यांचा सध्याचा पत्ता संस्थेस कळवावा.
५) ज्या सभासदांना मागील वर्षाचे डिव्हिडंड अद्याप नेले नसतील त्यांनी संस्थेत समक्ष येऊन घेऊन जावे.

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या तारणावर (गहाणखत) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तीचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित नोटीसनुसार दिली आहे, आणि सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 112502679 | मालमत्तेवर कर्ज | १. योगेश विष्णू वाघमोडे<br>२. विष्णू हरिश्चंद्र वाघमोडे | 24/06/2026 | INR 4,90,044.97/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत नंबर ३५४, क्षेत्रफळ १६०० स्क्वेअर फूट आणि बांधकाम क्षेत्रफळ १००० स्क्वेअर फूट, मौजे : बादलेवाडी, ग्रामपंचायत निमगाव (टे) बादलेवाडी, तालुका : माढा, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१० ही सर्व जागा व तुकडा. चतु:सीमा :- पूर्व : देविदास वाघमोडे, पश्चिम : अंकुश सरक, उत्तर : भीमराव सरक, दक्षिण : रस्ता.

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

दिनांक : 08/09/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)

**हरवले आहे**

कु. प्रतिक्षा दत्तात्रय काटे, रा. संगेवाडी ता. सांगोला, जि. सोलापूर यांचे नावे असलेले MAG/SR/754/2015 (MAHAR3C-37) या क्रमांकाचे जात पडताळणी प्रमाणपत्र दि. ०१/०९/२०२६ रोजी संगेवाडी ते सांगोला प्रवासादरम्यान पडून गहाळ झाले आहे, असे लेखी अर्ज दिल्याने सांगोला पोलीस ठाण्यात गहाळ रजिस्टर - ७८५/२०२६ प्रमाणे नोंद केली आहे. तरी कोणास जात पडताळणी प्रमाणपत्र सापडल्यास खालील मो. क्रमांकवर संपर्क साधावा.

**संपर्क :- प्रतिक्षा दत्तात्रय काटे - ०८९२८७०३००५**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No. 7000041426 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 24/ 2026-27, Particulars:** Work of providing & fixing of breather with silica gel at various substation under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 18,15,003/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs. 18,150/- **Tender cost** in Rs. 500.00 + GST, **Sale period:** 05.09.2026 to 16.09.2026 **Last Date of Submission:** 16.09.2026 up to 20:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 17.09.2026 at 12:30 Hrs. (If possible).
**Contact person:** Executive Engineer - 8554995014 For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**
**Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal please visit.**
**1) https://srmetender.mahatransco.in.**
**2) https://mahatransco.in**
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle Solapur**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे कुंभारी, तालुका दक्षिण सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसेने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन - डि व सब डि सोलापूर तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी येथील ग्रामपंचायत हद्दीतील जिराईत शेतजमीन गट नं.६४८/२ब/१ब/२ब/२/१/ब यांसी सर्व्हे नं.२६२/२, २९८/१ब याचे एकूण क्षेत्र १ हेक्टर ९८ आर. आकारणी १ रु. ९५ पैसे. यापैकी मध्य भागातील उत्तरेकडील बाजूची त्याचे क्षेत्र ०० हे. ५७ आर आकार ०० रु. ५६ पै. यांसी चतु:सिमा :- पूर्वेस - सदर नंबर मधील राहिलेली शेतजमीन, त्या पलीकडे दक्षिणोत्तर चालीचा गाडीवार रस्ता, दक्षिणेस - पूर्वपश्चिम चालीचा २० फुट कायम रस्ता व त्या पलीकडे गट नंबर ६४७ ची शेतजमीन, पश्चिमेस - सदर नंबर मधील आमचे मालकीची राहिलेली शेतजमीन, उत्तरेस - गट नं.६५१ ही शेतजमीन. येणेप्रमाणे वर नमूद चतु:सिमेतील शेतजमीन ही १) रमेश राम कलबुर्गी, २) नंदकुमार बाबुराव चितापुरे, ३) उदयसिंह हरिश्चंद्र दवेवाले, यांनी दि.२२/१२/१९९४ रोजी रजिस्टर दस्त क्रमांक २२६३/१९९४ अन्वये श्री आमसिध्द जेटप्पा जमादार राहणार - जमादार वस्ती, कुंभारी तसेच मान्यता देणार - १) ज्ञानेश्वर आमसिध्द जमादार, २) अशोक आमसिध्द जमादार यांचेकडून खरेदी घेतलेली आहे. त्यापैकी रमेश राम कलबुर्गी व नंदकुमार बाबुराव चितापुरे यांच्या हिश्याची प्रत्येकी १८.५ आर असे एकूण ३७ आर इतकी शेतजमीन.

सदरची मिळकत ही श्री. रमेश राम कलबुर्गी व श्री नंदकुमार बाबुराव चितापुरे यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची आहे. सदर मिळकतीची विक्री करण्यासाठी त्यांनी आमचे अशिलाबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार ठरवून त्यांनी आमचे अशिलांकडून व्यवहारापोटी काही रक्कम स्विकारुन रितसर इसारापावती लिहून दिलेली आहे. सदर मिळकत मालकांनी आमचे अशिलास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी दिलेली आहे.

सदर वर वर्णन केलेल्या शेतजमिनीबाबत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत, हक्क, हितसंबंध, दावा, लीज, टच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार वाटणी हक्क, खरेदी-विक्री वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबंध, वाद असल्यास त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमूद शेतजमिनीचा आमचे अशिल पुढील रजिस्टर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर मात्र कोणाचीही कसल्याही तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर व शेतजमिनीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवगत होऊ नये म्हणून सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली आहे. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली तारीख ०७/०९/२०२६.

सही/-
**श्री.रामपुरे इ.एम.** (बी.एससी., एलएल.बी.)
**श्री.रामपुरे एस.इ.** (बी.ए., एलएल.एम.)
**ॲडव्होकेटस्**
पत्ता - हॉटेल प्रियंका बिल्डींग, सिध्देश्वर पेठ
सोलापूर, मो.नं. ८६००९५७७८६
अशिल - श्री हरिदास शंकर बत्तुल
तर्फे ॲडव्होकेट

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या तारणावर (गहाणखत) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तीचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित नोटीसनुसार दिली आहे, आणि सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 108093942 | मालमत्तेवर कर्ज | १. ज्ञानेश्वर बबन बंडगर<br>२. अर्चना ज्ञानेश्वर बंडगर | 17/07/2026 | INR 8,42,448.96/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ७२४ मधील सर्व तो तुकडा आणि भाग, एकूण मोजमाप क्षेत्र ९०० चौ. फूट, मौजे/गाव : कवठे, ग्रामपंचायत कवठेच्या हद्दीत, तालुका : उत्तर सोलापूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३००२. चतु:सीमा :- पूर्व : रस्ता, पश्चिम : रस्ता, उत्तर : किसनसिंग लक्ष्मणसिंग रजपूत, दक्षिण : रस्ता.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 115834032 | मालमत्तेवर कर्ज | १. समीर इनुस काझी<br>२. युनूस बाबा काझी | 06/05/2026 | INR 6,36,911.82/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३३ मधील मालमत्तेचा सर्व भाग व तुकडा, अंदाजे क्षेत्रफळ ७२० चौ. फूट, बांधकाम क्षेत्र ७२० चौ.फूट, मु. रुई, ता. माढा, जि. सोलापूर, महाराष्ट्र. चतु:सीमा :- पूर्व : मल्हारी हरी पवार, पश्चिम : जैनुद्दीन नुरमहंमद काझी, उत्तर : मोतीराम खाशाबा कोळेकर, दक्षिण : रुबाबी रसूल शेख.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 134876651 | मालमत्तेवर कर्ज | १. दत्तात्रय शिरिष धांगे<br>२. चंदव्वा शिरिष धांगे | 26/08/2026 | INR 7,25,142.60/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक २ मधील सर्व तो तुकडा आणि भाग, एकूण मोजमाप क्षेत्र १८०० चौ. फूट, मौजे/गाव : अंदेवाडी खुर्द, ग्रामपंचायत आंदेवाडी खुर्दच्या हद्दीत, तालुका : अक्कलकोट, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१६. चतु:सीमा :- पूर्व : रस्ता, पश्चिम : श्रीमंत रामचंद्र कामठी, उत्तर : रस्ता, दक्षिण : इरण्णा चंद्रकांत कामठी.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 141018588 | मालमत्तेवर कर्ज | १. दत्तात्रय बलाभीम गाडेकर<br>२. अर्चना दत्तात्रय गाडेकर | 09/09/2026 | INR 6,15,142.90/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५७० मधील सर्व तो तुकडा आणि भाग, एकूण मोजमाप क्षेत्र ९०० चौ. फूट, मौजे/गाव : कवठे, ग्रामपंचायत कवठेच्या हद्दीत, तालुका : उत्तर सोलापूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३००२. चतु:सीमा :- पूर्व : सिद्राम लक्ष्मण गायकवाड, पश्चिम : ग्रामपंचायत रस्ता, उत्तर : पांडुरंग शंकर पवार आणि संजय शंकर पवार, दक्षिण : सागर मारुती जाधव.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 5 | 143560316 | मालमत्तेवर कर्ज | १. कल्याण शिवाजी डोंगरे<br>२. अनिता कल्याण डोंगरे | 27/06/2026 | INR 7,70,534.22/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५५१ मधील सर्व तो तुकडा आणि भाग, एकूण मोजमाप क्षेत्र १६०० चौ. फूट, मौजे/गाव : आढेगाव, ग्रामपंचायत आढेगावच्या हद्दीत, तालुका : मोहळ, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३२४८. चतु:सीमा :- पूर्व : पोपट सौदागर डोंगरे, पश्चिम : सामाईक रस्ता, उत्तर : वैजीनाथ दगडू डोंगरे, दक्षिण : स्वत:चा गट नंबर.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 6 | 148770350 | मालमत्तेवर कर्ज | १. निळकंठ चन्नबसप्पा मस्के<br>२. अनिता निळकंठ मस्के | 30/07/2026 | INR 8,17,342.64/- |

**मालमत्तेचा पत्ता** : सी.टी.एस. क्रमांक १३८अ मधील मालमत्तेचा सर्व भाग व तुकडा, २५५.८ चौ. मीटर पैकी एकूण मोजमाप क्षेत्र ४७.४१ चौ. मीटर (पश्चिम-उत्तर कोपरा), नगरपरिषद अक्कलकोटच्या हद्दीत, तालुका : अक्कलकोट, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१६. चतु:सीमा :- पूर्व : सी.टी.एस. नंबर १३८/ए पैकी, पश्चिम : गल्ली, उत्तर : सी.टी.एस. नंबर १३८ ब आणि ए गल्ली, दक्षिण : सी.टी.एस. नंबर १३८/ए ची मोकळी जागा.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 150505809 | गृहकर्ज | १. सागर मुत्यप्पा कोळी<br>२. मुत्यप्पा आणेप्पा कोळी | 22/07/2026 | INR 10,72,933.95/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १७० मधील सर्व तो तुकडा आणि भाग, एकूण मोजमाप क्षेत्र १५१२ चौ. फूट, मौजे/गाव : शेगाव, ग्रामपंचायत शेगावच्या हद्दीत, तालुका : अक्कलकोट, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१९. चतु:सीमा :- पूर्व : रामचंद्र आणेप्पा कोळी (घर), पश्चिम : रस्ता, उत्तर : दशरथ कलाप्पा कोळी (घर), दक्षिण : महादेव भीमशा कोळी (घर).

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 153287566 | मालमत्तेवर कर्ज | १. हेमा सुभाष कामाटी<br>२. सुभाष फकिरप्पा कामाटी | 01/07/2026 | INR 7,59,878.68/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १५१ मधील सर्व तो तुकडा आणि भाग, एकूण मोजमाप क्षेत्र ७०० चौ. फूट, मौजे/गाव : शेगाव, ग्रामपंचायत शेगावच्या हद्दीत, तालुका : अक्कलकोट, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१९. चतु:सीमा :- पूर्व : दयानंद फकिरप्पा कामाटी यांचे घर, पश्चिम : रस्ता, उत्तर : पुतळाबाई महादेव कोळी यांचे घर, दक्षिण : लक्ष्मण दाळप्पा कामाटी यांचे घर.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 9 | 159640137 | मालमत्तेवर कर्ज | १. कृष्णा यल्लप्पा बनसोडे<br>२. आरती कृष्णा बनसोडे | 26/08/2026 | INR 7,36,863.24/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ४३८ मधील सर्व तो तुकडा आणि भाग, एकूण मोजमाप क्षेत्र १८०० चौ. फूट, मौजे/गाव : चिंचपूर, ग्रामपंचायत चिंचपूरच्या हद्दीत, तालुका : दक्षिण सोलापूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३००२. चतु:सीमा :- पूर्व : रस्ता, पश्चिम : यल्लप्पा कृष्णा बनसोडे, उत्तर : रस्ता, दक्षिण : चन्नप्पा शिवण्णा बनसोडे.

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

दिनांक : 08/09/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### पेस एआयटीएची निवडणूक लढणार

**नवी दिल्ली :** भारतीय टेनिसमधील दिग्गज खेळाडू लिएंडर पेस अखिल भारतीय टेनिस संघटनेच्या (एआयटीए) अध्यक्षपदाच्या शर्यतीत उतरण्याच्या तयारीत आहेत. बंगाल टेनिस संघटनेने (बीटीए) सोमवारी पेसच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे डेव्हिस चषकाचा कर्णधार रोहित राजपाल याच्या विरोधात एक अत्यंत चुरशीची आणि हाय-प्रोफाइल लढत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बीटीएने हा निर्णय सोमवारी घेतला असला, तरी अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून उभे राहण्यापूर्वी पेस यांना 'स्पोर्ट्स पर्सन ऑफ आउटस्टँडिंग मेरिट' (एसओएम) या श्रेणीतील आगामी निवडणूक जिंकणे आवश्यक आहे. निवडणुकीचे वेळापत्रक अद्याप निश्चित झालेले नाही. या प्रक्रियेत, मुख्य निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी एआयटीएच्या सर्वसाधारण सभेत चार 'एसओएम' सदस्यांची निवड करणे समाविष्ट आहे. भारतातील क्रीडा क्षेत्रातील सर्वात मोठ्या व्यक्तिमत्त्वांपैकी एक असलेल्या लिएंडर पेसने अखिल भारतीय टेनिस संघटनेचे अध्यक्षपद स्वीकारावे, अशी बंगाल टेनिस संघटनेच्या सदस्य परिषदेची इच्छा आहे, असे बीटीएने एका निवेदनात म्हटले आहे.

### पीटरसन इंग्लंड संघाच्या विशेष मार्गदर्शकपदी

**लंडन :** माजी कर्णधार केविन पीटरसनची सोमवारी आफ्रिकेत पुढील वर्षी होणाऱ्या आयसीसी क्रिकेट विश्वचषकाच्या तयारीसाठी इंग्लंडच्या पांढऱ्या चेंडूंच्या संघांच्या विशेष मार्गदर्शकपदी नियुक्ती करण्यात आली. पीटरसन या महिन्याच्या अखेरीस श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० आणि एकदिवसीय मालिकांसाठी मुख्य प्रशिक्षक ब्रेंडन मॅककुलम यांच्या पांढऱ्या चेंडूच्या संघात सहभागी होईल. या प्रशिक्षण संघात मार्कस ट्रेस्कोथिक, टिम साउथी, जीतन पटेल आणि सारा टेलर यांचाही समावेश असेल. पीटरसन या हिवाळ्यात ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या पांढऱ्या चेंडूच्या दौऱ्यांमध्येही सहभागी होईल. त्यानंतर पुढील उन्हाळ्यात पाकिस्तान व न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या मालिकांसाठी, तसेच विश्वचषकासाठी तो पुन्हा संघात सहभागी होईल. दक्षिण आफ्रिकेत विश्वचषक जिंकण्याच्या प्रवासात या संघाला मदत करण्याची संधी मिळाल्याचा अभिमान वाटतो.

### ईशान प्रतिष्ठित यादीत

**चेन्नई :** दुलीप करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पहिले-वहिले प्रथम श्रेणी द्विशतक झळकावून पूर्व विभागाचा कर्णधार ईशान किशन एका प्रतिष्ठित यादीत सहभागी झाला आहे.दुलिप करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात द्विशतक झळकावणाऱ्या खेळाडूंच्या या विशेष यादीत आता त्याचाही समावेश झाला आहे; या यादीत मन्सूर अली खान पतौडी, अंशुमन गायकवाड, रमन लांबा, चेतेश्वर पुजारा, युसूफ पठाण आणि यशस्वी जैस्वाल यांसारख्या दिग्गजांचा समावेश आहे.

### फातिमा सनाला दंड

**दुबई :** महिला आशिया चषकातील सामन्यादरम्यान भारताची सलामीवीर शेफाली वर्मा हिला बाद केल्यानंतर अपमानजनक हावभाव केल्याबद्दल पाकिस्तान महिला क्रिकेट संघाची कर्णधार फातिमा सना हिला तिच्या सामना शुल्काच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे, असे आयसीसीने सोमवारी जाहीर केले. ही घटना भारताच्या डावातील दुसऱ्या षटकात घडली; शनिवारी शेफालीला बाद केल्यानंतर फातिमाने तंबूच्या दिशेने काही हावभाव केले होते. तिने खेळाडू आणि खेळाडू सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठीच्या आयसीसी आचारसंहितेतील 'लेव्हल १'च्या कलम २.५ चे उल्लंघन केल्याचे आढळून आले. २४ महिन्यांच्या कालावधीतील हा तिचा दुसरा गुन्हा असल्याने, आता एका वर्षाच्या आत तिचे एकूण दोन डिमेरिट पॉईंट्स झाले आहेत. फातिमाला याआधीचा डिमेरिट पॉईंट ६ ऑगस्ट २०२५ रोजी डब्लिन येथे आयर्लंडविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील पहिल्या सामन्यादरम्यान मिळाला होता. फातिमाने आपला गुन्हा मान्य केला.

# पूर्व विभागाचा ७०८ धावांचा डोंगर

**▪ दुलिप करंडक अंतिम सामना : ईशान किशनचे द्विशतक ▪ कुमार कुशाग्राचे शतक**

**चेन्नई, ७ सप्टेंबर**

येथील एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर सुरू असलेल्या दुलिप करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सोमवारी दुसऱ्या दिवशी कर्णधार ईशान किशनने शानदार २७० धावांची द्विशतकी खेळी केली व कुमार कुशाग्राने (१०१) शतक झळकावले. या दोघांच्या दमदार फलंदाजीच्या बळावर पूर्व विभागाने दक्षिण विभागाविरुद्ध पहिल्या डावात १६३ षटकांत सर्वबाद ७०८ धावांचा प्रचंड डोंगर उभारला.

पूर्व विभागाने ४ बाद ३८५ धावांवरून पुढे खेळताना दुसऱ्या दिवशीही दक्षिण विभागाच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजविले. कालचा नाबाद शतकवीर ईशान किशनने आपल्या शतकाला द्विशतकात, तर कुमार कुशाग्राने अर्धशतकाला शतकामध्ये रूपांतर केले. ईशान किशनने ३३४ चेंडूंत, ३० चौकार व ७ षट्कारांसह २७० धावांची शानदार द्विशतकी खेळी केली. दुलिप करंडक स्पर्धेत आपले पहिले शतक पूर्ण केल्यानंतर काही वेळातच युवा कुमार कुशाग्रा बाद झाला. फिरकी गोलंदाज त्रिपुरना विजयच्या गोलंदाजीवर 'डीप'मध्ये झेलबाद होण्यापूर्वी त्याने १३२ चेंडूंत ८ चौकार व ५ षट्कारांच्या मदतीने १०१ धावांची बहारदार खेळी केली व ईशानसोबत पाचव्या गड्यासाठी २८७ चेंडूंत २३० धावांची भागीदारी केली.

पुढे ईशानने अनुकूल रॉयसोबत सहाव्या गड्यासाठी १४० धावांची भागीदारी केली असताना ईशान जखमी निवृत्त झाला.

यादरम्यान अनुकूल रॉय (४५), मोहम्मद कुनेन कुरशी (४०), मोहम्मद शमीने (२८) संयमाने फलंदाजी करत पूर्व विभागाला सातशे धावांच्या जवळपास आणले.

थकव्यामुळे फलंदाजी सुरू ठेवणे अशक्य झाल्याने पूर्व विभागाचा कर्णधार ईशान २५० धावांवर जखमी निवृत्त होऊन मैदानाबाहेर गेला होता. मात्र, मोहम्मद शमी बाद झाल्यानंतर तो पुन्हा फलंदाजीसाठी मैदानात उतरला. ईशान किशनने ३३४ चेंडूंच्या खेळीत ३० चौकार व ७ षट्कार लगावत स्पर्धेतील आपले पहिले द्विशतक शतक पूर्ण केले आणि पूर्व विभागाला दुलीप करंडक २०२६ जिंकण्याच्या दिशेने भक्कम स्थितीत पोहोचवले. फिरकी गोलंदाज त्रिपुरना विजयच्या गोलंदाजीवर 'लॉन्ग-ऑन'ला स्मरन रविचंद्रनने त्याचा झेल घेतला.

◂ (वृत्तसंस्था)



ईशान किशन : धावा २७०, चेंडू ३३४, चौकार ३०, षट्कार ७


कुमार कुशाग्रा : धावा १०१, चेंडू १३२, चौकार ८, षट्कार ५

# ज्ञानेश्वरीचे 'वैयक्तिक सर्वोत्तम' कामगिरीचे लक्ष्य




**नवी दिल्ली, ७ सप्टेंबर**

या महिन्यात होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत 'वैयक्तिक सर्वोत्तम' कामगिरी सुधारण्याचे लक्ष्य ठेवले, असे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारी भारोत्तोलक ज्ञानेश्वरी यादव म्हणाली.

छत्तीसगडची २३ वर्षीय ज्ञानेश्वरी ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेतील अनुभवाचा फायदा या आशियाई क्रीडा स्पर्धेत घेण्यास उत्सुक आहे. ग्लासगो स्पर्धेत तिने ५३ किलो वजनी गटात 'स्नॅच' व 'क्लीन अँड जर्क' अशा दोन्ही प्रकारांत वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करीत एकूण १९९ किलो (८८ किलो + १११ किलो) वजन उचलले होते व रौप्यपदक पटकावले होते.

मला आशियाई स्पर्धेत माझी वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करायची आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मी १९९ किलोची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी नोंदविली होती व मी त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करेन. आमच्याकडे फारसा वेळ नाही, केवळ एक महिना आहे, असे ज्ञानेश्वरी म्हणाली.

मी 'स्नॅच' प्रकारात सुधारणा करण्याचा प्रयत्न करेन. जरी मी 'स्नॅच' व 'क्लीन अँड जर्क'मध्ये प्रत्येकी १ किलोने सुधारणा करू शकले, तरी ती माझ्यासाठी एक मोठी कामगिरी असेल. एखाद्या खेळाडूसाठी स्वतःची सर्वोत्तम कामगिरी नोंदविणे ही खूप मोठी गोष्ट असते, असेही ती म्हणाली.

आशियाई क्रीडा स्पर्धेत ज्ञानेश्वरीला तगड्या स्पर्धेचा सामना करावा लागेल, कारण तिथे चीन, दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरियासारखे या खेळातील दिग्गज देश पदकासाठी शर्यतीत असतील. आशियाई क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबरपासून जपानमधील आइची-नागोया येथे होणार आहेत.

आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर, ज्ञानेश्वरीला ५३ किलो वजनी गटात वाढीव स्पर्धेचा सामना करावा लागेल. कारण ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती मीराबाई चानू - जी सध्या ४८-४९ किलो गटात खेळते - ती ५३ किलो गटात येणार आहे.

जुलैमध्ये राष्ट्रकुलमध्ये ५८ किलो गटात कांस्यपदक जिंकल्यानंतर मीराबाई ५३ किलो गटात खाली येईल, असे आशियाई स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या बिंद्याराणी देवीनेही सांगितले आहे.

◂ (वृत्तसंस्था)



## रिनाती इंग्लिश स्कूलची मैदानी स्पर्धेत ६ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

कोल्हापूर येथे झालेल्या १३व्या स्टुडंट्स ऑलिंपिक असोसिएशन राज्य मैदानी स्पर्धेत रनिंग, गोळा फेक व थाळी फेक स्पर्धेमध्ये रिनाती इंग्लिश मीडियम स्कूल चपळगांव (अक्कलकोट) येथील विद्यार्थ्यांनी ३ सुवर्ण, ३ कास्य अशी ६ पदकांची चमकदार कामगिरी केली.

यशस्वी विद्यार्थ्यांची ऑक्टोंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक विवेक मिस्कीन व सहशिक्षक अमोल भरमशेट्टी यांचे मार्गदर्शन लाभले. रिनाती स्कूलचे चेअरमन -उमेश पाटील , व्यवस्थापक सुरेश सुरवसे व तसेच मुख्याध्यापिका अनिता मोरे यांनी कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी : १०० मी धावणे :** श्रेया वर्दे (कास्य), वैष्णवी राजगुरू (कास्य), स्वरांजली वरडे (सहभाग).

**थाळी फेक :** प्रणाली माने (सुवर्ण) यश जाधव (सुवर्ण) चैतन्य बिराजदार (सहभाग).

**गोळा फेक :** प्रणाली माने (सुवर्ण) यश जाधव (कास्य).

# डॉ. शुभांगी वाघचवरे सातारा 'मॅरेथॉन'मध्ये ''फाईव्ह स्टार''

### सलग पाच वेळा सातारा हिल मॅरेथॉन पूर्ण करणाऱ्या सोलापुरच्या पहिल्या महिला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर -**

सातारा येथे रविवारी झालेल्या अत्यंत अवघड व जगप्रसिद्ध अशी २१ किलोमीटरची सातारा हिल हाफ मॅरेथॉन डॉ. शुभांगी वाघचवरे यांनी दोन तास ५२ मिनिटात पूर्ण केली.

याचबरोबर त्या सोलापुरातील पहिल्या महिला धावपटू ठरल्या. त्यांनी सलग पाच वेळा म्हणजेच २०१९, २०२३, २०२४, २०२५, २०२६ साली सातारा हिल हाफ मॅरेथॉन पूर्ण केली. यासाठी त्यांना विशेष असे ''फाईव्ह स्टार'' मेडल देऊन गौरविण्यात आले.

यावेळी डॉ. शुभांगी म्हणाल्या, मॅरेथान रनिंगसाठी मला घरातूनच प्रोत्साहन मिळते. ९० की.मी.कॉम्रेड मॅरेथॉन फिनिशर पती डॉ . सत्यजित यांच्याबरोबर सर्व ट्रेनिंग रन मिळूनच केल्या. तर मॅरेथॉन यशस्वीरित्या व ईंजुरी फ्री पूर्ण करण्याकरता आवश्यक असलेला ट्रेनिंग प्लान त्यांच्या नणंद डॉ.स्मिता झांजुर्णे ज्यांनी यांनी बॅक टू बॅक कॉम्रेड मॅरेथॉन फिनिश केली आहे त्यांनी दिला.



या मॅरेथॉनमध्ये त्यांच्याबरोबर त्यांच्या कुटुंबातील तीघे सदस्य म्हणजे त्यांचे पती डॉ. सत्यजित वाघचवरे, आयर्न मॅन व कॉम्रेड फिनिशर असलेले डॉ. अभिजीत वाघचवरे व त्यांच्या पत्नी डॉ.राजश्री वाघचवरे यांनी देखील सहभाग नोंदवून ती मॅरेथॉन यशस्वी रित्या पूर्ण केली.

दरम्यान सातारा मॅरेथॉन एक्सपोमध्ये सातारा मॅरेथॉनचे संस्थापक डॉ. संदीप काटे यांनी गेल्या रविवारी हैदराबाद येथे एकाच दिवशी म्हणजे सकाळी ४२ किमी फुल मॅरेथॉन व सायंकाळी शरीर सौष्ठव स्पर्धेमध्ये भाग घेऊन दोन्हीही ईव्हेंट यशस्वीपणे पुर्ण केल्याबद्दल वाघचवरे कुटुंबीयांनी त्यांचा गौरव केला. याप्रसंगी सत्यवान वाघचवरे, शीला वाघचवरे, डॉ.अजित भोसले, डॉ. परिक्षीता भोसले उपस्थित होते.



## विश्वजीत रोलर स्केटिंग क्लबच्या ७ खेळाडूंची आंतरराराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ७ सप्टेंबर-**

येथील ज्योतिर्लिंग स्पोर्ट्स क्लब संचलित विश्वजीत रोलर स्केटिंग क्लब च्या विश्वजीत रोलर स्केटिंग क्लबच्या ७ खेळाडूंची श्रीलंका येथे होणाऱ्या आंतरराराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली.

रोलर रिले स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्यावतीने गोवा येथे ५ व ६ सप्टेंबर दरम्यान झालेल्या राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेतून त्यांची निवड झाली. या खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव, उपाध्यक्ष व प्रशिक्षक गणेश रोडे, सचिव सविता जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांचे संस्थेचे अतुल जाधव, स्नेहल रोडे, रितेश जानराव, संचिती जाधव, आदित्य माळी, यश नान्नजकर, विश्वजीत जाधव, यशराज रोडे या सर्व प्रशिक्षकांनी पालकांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

**राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरी व निवड़ झालेले खेळाडू**
सुवर्ण : श्लोक उकरंडे, आदित्य बागूल, आरुष जाधव.
रौप्य : अर्णव फल्ले, धैर्य घोलप. ब्राँझ : श्रीराज काळे, आरिज बागवान.

# 'नागपाडा'ला नमवून पुणे विजेता

## गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती ४५व्या राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा







**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ सप्टेंबर -**

मुंबईच्या नागपाडा बास्केटबॉल असोसिएशनला ६०-५५ असे ५ गुणाने नमवित पुण्याच्या संभाजी कदम बास्केटबॉल अकादमीने गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या ४५व्या स्मृती करंडक राष्ट्रीय निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

सांगोला विद्यामंदिर येथील बास्केटबॉलच्या इनडोर कोर्टवर झालेल्या या स्पर्धेत साखळीच्या सामन्यात अतिरिक्त वेळेत नागपाडाकडूनच दोन गुणांनी पराभव पत्करावा लागलेल्या पुण्याने हा विजय मिळवीत आपल्या पराभवाची परतफेड केली.

रविवारी सायंकाळी झालेल्या अंतिम सामन्यात नागपाडाने पहिल्या दहा मिनिटाच्या डावात २४-१२ व दुसऱ्या दहा मिनिटाच्या डावात ३७-२६ अशी पुण्यावर निर्विवाद आघाडी घेतल्याने नागपाडा सहज सामना जिंकेल अशी स्थिती होती. परंतु मध्यंतरानंतर पुण्याच्या खेळाडूंनी सांघिक खेळाचे प्रदर्शन करीत विजय खेचून आणला.

मध्यंतरानंतरच्या तिसऱ्या दहा मिनिटांच्या डावात ४९-४३ अशी सहा गुणांची आघाडी घेत पुण्याने सामन्यावर वर्चस्व मिळविले. त्यानंतर अंतिम दहा मिनिटांच्या डावात सामना डोळ्याचे पारणे फेडणारा ठरला. कधी पुण्याच्या बाजूने तर कधी मुंबईच्या बाजूने सामना झुकत होता. शेवटच्या तीन मिनिटात ५२-५२ अशी बरोबरी झाल्यानंतर सामना कोण जिंकणार याची उत्कंठा शिगेला पोचली होती. अखेर पुण्याने बाजी मारली. पुण्याकडून अभिषेक (१४), करण (१७) बादल (१२ गुण), तनय (१० ) यांनी संघाच्या विजयात महत्त्वाची कामगिरी बजावली. मुंबईकडून मेराज शेख व फैज शेख यांनी प्रत्येकी १७ गुण नोंदविले. परंतु त्यांचे प्रयत्न अपुरे पडले.

**मास्टर्स गटात कोल्हापूरची बाजी**

मास्टर्स गटात मन्सूर शेख (१४ गुण) कासीम शेख (६) व जितू मारणे (४) यांच्या शानदार खेळीमुळे कोल्हापूरने सांगलीवर ३५-१९ अशी मात केली. मध्यंतरासच कोल्हापूरने २५-२ अशी निर्णायक आघाडी घेतली होती. सांगलीकडून उमेश जाधव (९ गुण) व क्रांतीनाथ सोनकपल (७) यांची लढत अपुरी पडली.

**नांदेडची नेक्सस स्पोर्ट्स अकॅडमी तृतीय**

नांदेडच्या नेक्सस स्पोर्ट्स अकॅडमीने बीडच्या जयहिंद स्पोर्ट्स अकादमी कडा संघावर ९८-६५ असा एकतर्फी विजय मिळवीत तृतीय स्थान मिळविले. अमरीतने ३७ व आमरानने १९ गोल नोंदवित संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण वाटा उचलला. अजय पवार (१५ गुण) व साहिल सय्यद (११) यांनी बहारदार खेळी करीत मध्यंतरापर्यंत जय हिंदला ४१-४० अशी निसटती आघाडी मिळवून दिली होती. मध्यंतरानंतर मात्र नांदेडने सांघिक खेळाचे प्रदर्शन करीत सामना निर्विवाद जिंकला.

कार्यक्रमाची सुरुवात कवी सुनील जवंजाळ लिखित विद्यामंदिर गीताच्या सादरीकरणाने झाली. पारितोषिके आंतरराष्ट्रीय लायन्स संघटनेचे प्रांतपाल राजेंद्र शहा-कासवा, त्यांच्या पत्नी रंजना शहा-कासवा, खजिनदार सुरेश जाजू, आंतरराष्ट्रीय खेळाडू राहुलआप्पा भंडारे, संभाजीराव कदम, त्यांच्या अकादमीचे संचालक शरद नागणे, उद्योगपती विलास क्षीरसागर,सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, संस्था कार्यकारिणी सदस्य दिगंबर जगताप, जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव एम. शफी यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आली. विजेत्या संघास ३१ हजार रुपये रोख व करंडक देण्यात आले

उपस्थितांचे स्वागत संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, विश्वेश झपके व शिलाताई झपके यांनी केले. पंच सत्कार निवेदन प्रा. डी. के. पाटील यांनी केले. पारितोषिक वितरणाचे वाचन क्रीडा विभाग प्रमुख सुनील भोरे यांनी केले. या स्पर्धेतील सामन्यांचे धावते समालोचन इर्शाद बागवान यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनाजी चव्हाण यांनी केले. प्राचार्य चारूदत्त जगताप यांनी आभार मानले.




**वैयक्तिक पारितोषिके**
उत्कृष्ट खेळाडू - फय्याज शेख (नागपाडा), बेस्ट शुटर - तनय तट्टे (एसकेबीए, पूणे), उत्कृष्ट उदयोन्मुख खेळाडू - श्रवण बनकर, (सांगोला)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### आदर्श शिक्षक समाजाला दिशा देतात : सातलिंग शटगार

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

आई-वडिलांनंतर आपल्या जीवनावर सर्वाधिक संस्कार करून दिशा देणारे गुरु म्हणजे शिक्षक होत. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना धडे शिकवत नाही, तर समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतो, असे प्रतिपादन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले. पल्लवी दळवी यांच्या स्मरणार्थ विद्या प्रतिष्ठानतर्फे आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी शहरातील शिल्पा देशपांडे, कला चन्नपट्टण गाडी, सतीश मलाव, रंजना उपलांची व खराडे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी पल्लवी दळवी यांच्या आठवणींना उजाळा देताना भावुक होऊन श्रद्धांजली अर्पण केली. सूत्रसंचालन नयना भोसले यांनी केले, तर आभार यादव यांनी मानले. कार्यक्रमास अल्पना सपकाळ, सविता कदम, बाळ दळवी, जयंत दळवी, कपिल दळवी, जहांगीर शेख, विठ्ठल वठारे, राजू जाधव, उपेंद्र ठाकूर, कोंडगुळे, अल्मास शेख, बंडे उपस्थित होते.



### आर्या कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये रक्तदान शिबिर व वृक्षारोपण

**टेंभुर्णी, दि. ७ सप्टेंबर-**

टेंभुर्णी येथील आर्या कॉलेज ऑफ फार्मसी व विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मयोगी आमदार बबनदादा शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे व वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता रणजीतसिंह शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले तसेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे उद्घाटन अमृता विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरासाठी कुर्डूवाडी येथील रक्तपेढीचे सहकार्य लाभले. रक्तदान व वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र कदम, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. धनंजय चव्हाण उपस्थित होते.

### एकता महिला मंचतर्फे गौरी-गणपती सजावट स्पर्धा

**वैराग, दि. ७ सप्टेंबर-**

एकता महिला मंचच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील महिलांसाठी आणि मंचाच्या सर्व सक्रिय सदस्यांसाठी भव्य गौरी-गणपती सजावट स्पर्धा २०२६ चे आयोजन केले आहे. .गौरी-गणपती उत्सवाचे औचित्य साधून १८ व १९ सप्टेंबर रोजी ही स्पर्धा पार पडणार आहे. स्पर्धकांनी घरगुती सजावटीचे फोटो आणि व्हिडिओ पाठवून या स्पर्धेत सहभागी व्हायचे आहे. फोटो आणि व्हिडिओ १८ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर दुपारी २:०० वाजेपर्यंत या वेळेतच स्वीकारले जातील. अधिक माहितीसाठी व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक: ७२१८३३८००९ वर संपर्क साधावा, असे सांगितले आहे.



### झोपेत सर्पदंश झालेल्या वडजी गावच्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

झोपेत असताना सर्पदंश झालेल्या वडजी गावच्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज सोमवारी सकाळी मृत्यू झाला. आदर्श सतीश हक्के (वय १९ रा. वडजी ता.दाक्षिण सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.तो नेहमी प्रमाणे शुक्रवारी रात्री घरात झोपला होता.१० वाजेच्या सुमारास त्याच्या डाव्या हाताच्या बोटाला सापाने दंश केला होता. त्याला वडिलांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान त्याचा आज सोमवारी सकाळी मृत्यू झाला.

## निधन वृत्त...

### सुरेश हांडे



**बार्शी, दि. ७ सप्टेंबर-**

बार्शी पंचायत समितीचे निवृत्त ग्रामविकास अधिकारी सुरेश हांडे (वय ६९ रा. हांडे गल्ली बार्शी) यांचे रविवारी दि. ५ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. बार्शी न्यायालयातील लिपिक सुदर्शन हांडे व अभिजित हांडे यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रविवारी रात्री मंगळवार पेठ येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अनुसया हागरे



**बार्शी, दि. ७ सप्टेंबर-**

येथील नाळे प्लॉटमधील रहिवासी अनुसया हागरे (वय७५) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांनी निजाम जवळा, (ता. परंडा) येथे आरोग्य सेविका म्हणून सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या कराटे प्रशिक्षक प्रदीप हागरे यांच्या मातोश्री होत.

# मोजणी न करताच अधिकारी माघारी

## शक्तीपीठ महामार्गाच्या मोजणीला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

### कृष्णराज बारबोले यांच्या नेतृत्वात लढा तीव्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.७ सप्टेंबर -**

बार्शी तालुक्यातून प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गासाठी जमीन मोजणीस मालेगाव येथे आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला. माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले यांच्या नेतृत्वाखाली बाधित शेतकऱ्यांनी एकजूट दाखवल्याने अधिकाऱ्यांना कोणतीही मोजणी न करताच माघारी जावे लागले.

शक्तीपीठ महामार्गामुळे बार्शी तालुक्यातील बाधित अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. मात्र त्यांना मिळणारा मोबदला हा भविष्यासाठी पुरेसा ठरणार नसल्याने त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होईल. शेतकरी हितासाठी या महामार्गास विरोध कायम राहील, अशी भूमिका बारबोले यांनी व्यक्त केली.



मालेगाव येथे जमीन मोजणीसाठी अधिकारी दाखल झाल्याची माहिती मिळताच परिसरातील बाधित शेतकरी एकत्र आले. त्यांच्या तीव्र विरोधामुळे अधिकाऱ्यांना माघारी परतावे लागले. बार्शी तालुक्यातील इतर गावांमध्येही जमीन मोजणीसाठी अधिकारी आल्यास त्याला विरोध करण्यात येईल, असा इशारा बारबोले यांनी दिला.राजेश निंबाळकर, बालाजी पैकेकर, भारत बाप्पा देशमुख, शिवशंकर ढवण, प्रथमेश गवळी, अनिरुद्ध माने यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# कॉरिडोरच्या व डीपी प्लॅन विरोधात उद्या मोर्चा

### पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समिती देणार नगरपालिकेवर धडक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ सप्टेंबर -**

वादग्रस्त पंढरपूर कॉरिडोरसाठी भूमी संपादनाबाबत पंढरपूर नगर परिषदेच्या सभेमध्ये विषय घेण्यात आला आहे. त्याला विरोध करण्यासाठी बुधवारी (दि. ९) मोर्चाचे आयोजन केल्याचे तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी (इचगावकर) यांनी सांगितले.

आजपर्यंत भूसंपादन न करता शासकीय पडीक जागांवर कॉरिडोर करावा अशी मागणी बचाव समितीची होती. परंतु विश्वासात घेऊन प्रकल्प राबविणार असे म्हणत सरकार आपला अजेंडा पुढे रेटत आहे. तसेच काही मोजक्याच लोकांचा कॉरिडॉरला विरोध आहे असे भासवत आहे. प्रत्यक्षात बहुसंख्य बाधितांचा विरोध आहे हे सिध्द झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हा विरोध जाणून घेतला आहे. तरीही प्रशासन घाई गडबड करीत आहे.

महाराष्ट्र नगर रचना कायद्याचे प्रक्रियेची पूर्ण पायमल्ली करून कॉरिडॉर पुढे रेटला जात आहे. त्यातीलच एक भाग म्हणजे नगरपरिषदेच्या सभेत भूमी संपादनाचा ठराव घेण्यात येणार आहे. याला तीव्र विरोध म्हणून पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या वतीने नगरपालिकेवर मोर्चा काढण्यात येणार आहे. बुधवार दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता श्री संत नामदेव पायरी येथे वंदन करून मोर्चा निघेल.

# 'हाताला काम द्या, पोटाला धान्य द्या'



### वैरागमध्ये ८ हुतात्म्यांच्या बलिदानाला मूक मोर्चाने अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ७ सप्टेंबर -**

महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी ज्यांच्या ऐतिहासिक बलिदानामुळे झाली, त्या वैराग येथील ८ हुतात्म्यांच्या स्मृती जागविण्यासाठी रविवारी (दि. ६ सप्टेंबर) सायंकाळी संपूर्ण वैराग शहर नतमस्तक झाले. तब्बल अडीच किलोमीटरचा भव्य मूक मोर्चा काढून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी पंचायत समिती उपसभापती संतोष निंबाळकर, माजी सभापती मकरंद निंबाळकर, शिवाजी पाटील, अरुण सावंत, मनोज डुरे पाटील आदींसह नागरिक उपस्थित होते. १९७१ मध्ये राज्यात अत्यंत भयानक दुष्काळ पडला होता. वैराग व परिसरातील ग्रामीण भागात उपासमारीची तीव्र लाट आली होती. एकीकडे जनता अन्नासाठी तरसत होती, तर दुसरीकडे येथील शासकीय गोदामात हजारो पोती धान्य पडून होते. या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे (शेकाप) नेते चंद्रकांत निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली बार्शी तहसील कार्यालयावर दोन वेळा मोर्चे काढण्यात आले.

**हुतात्मा ८ वीर**

एकनाथ साळुंके (वैराग), चतुर्भुज ताकभाते (श्रीपतपिंपरी), रघुनाथ माने (रातंजन), उद्धव गोफणे (हळदुगे), इब्राहिम शेख (वैराग), बब्रुवान माळी (मानेगाव), भास्कर वाळके (मानेगाव), सुंदरबाई चव्हाण (वैराग)

त्यानंतर ६ सप्टेंबर १९७१ रोजी 'हाताला काम द्या, नाहीतर पोटाला धान्य द्या!' ही प्रमुख मागणी घेऊन वैराग येथील शासकीय गोदामावर तिसरा भव्य मोर्चा धडकला. या आंदोलनादरम्यान तत्कालीन पोलिस अधीक्षक डेमला यांनी बेधुंद गोळीबाराचे आदेश दिले. या अमानुष गोळीबारात ८ आंदोलक जागीच हुतात्मा झाले, तर ५४ नागरिक गंभीर जखमी झाले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आणि अखेर शासन खडबडून जागे होऊन गोरगरीब कष्टकऱ्यांसाठी ऐतिहासिक 'रोजगार हमी योजना' लागू करण्यात आली.

# कॉपर वायर चोरी प्रकरणातील तिघांना अटक



### सात लाख किंमतीचा मुद्देमाल व वाहन जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ७ सप्टेंबर -**

बार्शी शहरातील परांडा चौक परिसरातील एका बाइंडिंग वर्कशॉपच्या गोदामातून लाखो रुपयांची कॉपर वायर चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा बार्शी शहर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी ३ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली बोलेरो पिकअप गाडी असा एकूण ५ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तक्रारदार पप्पू रगडे (वय ३५, रा. उपळाई, ता. बार्शी) यांचे परांडा चौक, येथे वाइंडिंग वर्कशॉपचे गोदाम आहे. दि. १२ जून ते दि. १३ जून दरम्यान चोरट्यांनी गोदामाचे शटर उपटून आतील १,९३,८००/- रुपये किमतीचे २०५ किलो वजनाचे ५ कॉपर वायरचे बंडल चोरुन नेले होते. याप्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला होता. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे कोल्हापूर परिसरात सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेले आरोपी- सागर आकाराम गोसावी (वय ५१), हणमंत राजाराम सपोनिसी (वय ५०), दुर्गाच्या रामाच्या कल्याणी (वय ५८ सर्व रा. कोल्हापूर). गुन्ह्यातील चौथा साथीदार मंजूनाथ (रा. कोल्हापूर) हा फरार आहे. १,१३,८००/- रुपयांचे ५ कॉपर वायर बंडल, ५ लाख रुपयांची बोलेरो पिकअप गाडी, कटर व इतर साहित्य (अंदाजे रु. ५ हजार) असे जप्त केले. आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

# पावसाअभावी करपलेले सोयाबीन शेळ्यांना चारले

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ७ सप्टेंबर -**

बार्शी तालुक्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. गोरमाळे येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याने पावसाअभावी करपून चाललेले सोयाबीन पीक शेळ्यांना चारले आहे.

गोरमाळे येथील जयदेव शिंदे (वय ६७) यांनी आपल्या शेतातील उभे सोयाबीन पीक शेळ्यांना चारले. शिंदे हे शेतीबरोबरच सुमारे २० शेळ्यांचे पालन करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. यावर्षी त्यांनी २० जूनच्या आसपास सोयाबीनची पेरणी केली होती. पेरणीनंतर सोयाबीनची उगवण चांगली झाली. मात्र, त्यानंतर परिसरात एकही समाधानकारक व मोठा पाऊस झाला नाही. सोयाबीन लागवडीसाठी बी-बियाणे, मशागत, पेरणी, खते आदी मिळून एकरी सुमारे ३५ हजार रुपयांचा खर्च झाल्याचे शिंदे यांनी सांगितले.

# भोगाव येथील ऑर्केस्ट्रा बारवर धाड; २६ जणांवर गुन्हा, २८ लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर -**




सोलापूर : ग्रामीण पोलीस दलाच्या विशेष पथकाने उत्तर सोलापूर तालुक्यातील मौजे भोगाव हद्दीतील सुखसागर ऑर्केस्ट्रा बारवर रविवारी पहाटे सव्वा बाराच्या सुमारास अचानक छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. नियमबाह्य आणि अश्लील पद्धतीने सुरू असलेल्या या ऑर्केस्ट्रा बारमधून २६ गिऱ्हाईक व संबंधित चालक-मालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून घटनास्थळावरून २८ लाख २५ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक गणेश शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने रविवारी पहाटे १२.१५ वाजता छापा टाकला. यावेळी बारमध्ये महिला अश्लील हावभाव करत नृत्य करत असल्याचे आणि ग्राहक त्यांच्यावर नोटा उधळत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या कारवाई दरम्यान घटनास्थळी उपस्थित १५ महिला व ग्राहकांची कसून चौकशी करून त्यांची नावे व पत्ते निष्पन्न करण्यात आले.


# विकासाचा ध्यास घेतलेले दुरदृष्टीचे नेतृत्व म्हणजे मा. आमदार देवेंद्रदादा कोठे

**सोलापूर जिल्हयाच्या राजकारणात कोठे नावाचा एक दबदबा गेल्या चाळीस वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात आहे. स्वर्गीय मा.विष्णूपंत ऊर्फ तात्यासाहेब कोठे तसेच स्वर्गीय मा. महेश अण्णा कोठे यांच्या संस्काराचा, विचाराचा, सेवेचा संयमाचा वारसा घेऊन मा. देवेंद्रदादा यांच्या रुपाने कोठे घराण्याची तिसरी पिढी सोलापूरकरांच्या प्रश्नासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे.**

लहानपणापासून समाजकारण आणि राजकारणाचे धडे दादांना आपले आजोबा स्व. तात्यासाहेबाकडून जवळून पहावयास मिळाले. कोठे घराण्यांनी कायमच ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण केले. त्यांच्यासाठी कायमच कार्यकर्ता श्रेष्ठ राहिला. त्यांनी कार्यकर्त्यांना मोठे केले. पद, प्रतिष्ठा दिली. त्यामुळे कोठे निष्ठ कार्यकर्त्यांचा वावर त्यांच्या भोवती राहिला. या कार्यकर्त्यांच्या व नगरसेवकपदावर असताना प्रभागातील व शहरातील केलेल्या कामामुळेच त्यांना कार्यसम्राट नगरसेवक ते दमदार आमदार अशी पदवी त्यांना जनतेने दिली. त्यांचा मतदार संघातील प्रत्येक घरा-घरात संपर्क आहे. नगरसेवक असताना जनतेच्या प्रश्नासाठी निधी उपलब्ध नसतानाही त्यांनी पाणीपुरवठा, रस्ते, इ. कामे वेळप्रसंगी स्वखर्चातून केली. त्यामुळेच या कामाच्या पाठपुराव्यामुळेच त्यांनी नगरसेवक ते आमदार पदापर्यंत यशस्वी घौडदौड केली आहे.

सोलापूर शहरात कोणतीही व्यक्ती उपाशी झोपू नये. निराधारांना अन्न मिळावे म्हणून मा.दादांनी गोरगरीब जनतेसाठी घरपोच जेवणाचा डबा देणारी ''विष्णूपंत तात्यासाहेब कोठे आत्मतृप्ती योजना'' सुरु केली. संभाजीराव शिंदे विद्यामंदिरच्या माध्यमातून बालवाडी ते ज्यु. कॉलेज व्यवसाय शिक्षण, डी.एड कॉलेज, बी.एड कॉलेज, राज मेमोरियल इंग्लिश स्कुल व विष्णूपंत तात्या कोठे इंग्लिश मिडियम स्कुल या माध्यमातून त्यांचे शैक्षणिक कार्य सुरु आहे. तसेच सामाजिक प्रश्नाची जाणिव होऊन त्यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून स्वयंरोजगार उपलब्ध करण्यासाठी व तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी व्यवसायासाठी मोफत हातगाडी वाटप केले. तसेच मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसादिवशी हजारो रक्तदात्यामार्फत ''रक्तदान हे पवित्रदान'' हे ब्रीदवाक्य घेऊन त्यांनी रक्तदार शिबीर आयोजित करतात. यापूर्वी मा. तात्यासाहेबाच्या पुण्यस्मरणानिमित्त गेली २० वर्षे ते रक्तदान शिबीर आयोजित करुन हजारो रक्तदान करण्याचा विक्रम त्यांनी केला आहे. तसेच आरोग्य शिबीर, मोफत रक्ततपासणी, नेत्रतपासणी, आधारकार्ड नुतनीकरण, ईश्रमकार्ड, आयुष्यमान कार्ड, इ. सेवा देण्याचे शिबीर आयोजित करुन जनतेची व रुग्णाची सेवा केली आहे. तसेच मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा दिवशी दरवर्षी हजारो विद्यार्थ्यांना मोफत वही वाटप केले आहे.



सोलापूर शहरमध्यची आमदारकीची शपथ घेतल्यानंतर जनतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी ते त्यांच्या संपर्क कार्यालयामार्फत देवयज्ञ आयोजित करुन जनता दरबार आयोजित करतात व त्यांच्या प्रश्नाची त्वरीत सोडवणूक केली जाते. व आपले प्रश्न सुटल्याचे आनंद व समाधान जनतेच्या चेहऱ्यावर दिसतो. आमदार झाल्यानंतर सर्व प्रथम त्यांनी सोलापूरकरांच्या जिव्हाळयाचा पाणीप्रश्न विधानसभेत उपस्थित करुन सोलापूरकरांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी १४५३ कोटीची पाणीपुरवठा योजना मंजूर करुन आणली. सोलापूर शहरातील आजपर्यंतचे आमदार व मुख्यमंत्री झालेले व्यक्ती जे करु शकले नाहीत. ते दादांनी एक महिन्यात पूर्ण केले व सोलापूर शहरातील लाखो लाडक्या बहिणीना नियमित पाणीपुरवठ्याची ओवाळणी दिली. आमदारकीची शपथ घेताच नियमित पाणीपुरवठा देण्याची शपथ त्यांनी घेतली होती. सोलापूर शहरातील अपघात रोखण्यासाठी उडाणपुलाचा प्रश्न मार्गी लावला. सोलापूर शहरातील विस्थापित होणाऱ्या तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी आयटी पार्क उभारले जात आहे. होटगी रोड येथे विमानतळ सुरु केले. बोरामणी येथे विस्तारीत विमानतळाच्या कामाचा पाठपुरावा सुरु करण्याचा मानस आहे. तसेच आपण ज्या चाळीमध्ये जन्मलो त्या गोरगरीब कष्टकरी कामगारांना हक्काची घरे मिळवून देण्याचे वचन त्यांनी दिले होते. त्यासाठी बी-२ चाळीचा पुर्नवसन प्रकल्पाचा पाठपुरावा करुन हा प्रश्न सोडविला. व मा. तात्यासाहेबांचे स्वप्न पूर्ण केले. असे विकासाचे व दूरदृष्टीचे नेतृत्व सोलापूर शहरालाच नव्हे तर सोलापूर जिल्हयाला लाभले आहे. विकासाच्या तसेच कामाच्या झंझावतामुळे जनतेमध्ये त्यांची ओळख पाणीदार आमदार तसेच दमदार आमदार अशी झाली आहे.

**खुदी को करे बुलंद इतना की**
**हर तकदीर से पहले खुदा बंदे से**
**खुद पुछे बता तेरी रजा क्या है ?**

या म्हणी प्रमाणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या आमदार देवेंद्र दादांना विचारत असतील तुमच्या सोलापूरसाठी काय पाहिजे? आय.टी. पार्क, पाणीपुरवठा योजना, विमानतळ सर्व काही देवेंद्र दादांनी आणले. ते ही दिवसरात्र काम करुन असा आमदार आपल्या सोलापूर करांना लाभला याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

दादा, आपणांस वाढदिवसाच्या समस्त सोलापूरकरांकडून शुभेच्छा ! आपली कारर्किदीत अशीच बहरत जावो. ही विठ्ठल रुक्मिणी चरणी प्रार्थना.

**- प्रा. देविदास गोपाळ उत्पात,**
**मो.नं. ९९२२१११७६९**

# सोलापूर जिल्ह्यातील ९८ हजारांहून अधिक लोकसंख्या 'पाणी टंचाई'च्या छायेत

## पावसाने दडी मारताच 'टँकर'वर भिस्त

## पाणीटंचाई निवारणाचे प्रशासनासमोर आव्हान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

पावसाने पुन्हा ओढ दिल्याने जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पाणीटंचाईचे संकट कायम असल्याचे चित्र आहे. जिल्हा प्रशासनाच्या ७ सप्टेंबरच्या दैनंदिन अहवालानुसार, टंचाई निवारणासाठी विविध गाव-वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असून, सुमारे ९८ हजार १५२ नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. पावसाळा सुरु असतानाही अनेक भागांतील नागरिकांची पाण्यासाठीची धावपळ अद्याप थांबलेली नाही.



जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पाणीपुरवठ्याची परिस्थिती असमान आहे. काही ठिकाणी पावसामुळे परिस्थितीत सुधारणा झाली असली, तरी काही गावांमध्ये विहिरी, बोअरवेल आणि अन्य स्थानिक जलस्रोतांमध्ये अपेक्षित पाणीसाठा निर्माण झालेला नाही. परिणामी प्रशासनाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवावा लागत आहे. अहवालातील आकडेवारीनुसार माळिशरस तालुक्यात २७ हजार ४२९, माढा तालुक्यात २० हजार २४२, बार्शी तालुक्यात १६ हजार ९११, करमाळा तालुक्यात १५ हजार ९९५, तर सांगोला तालुक्यात १४ हजार १७ नागरिक पाणीटंचाईने प्रभावित आहेत. याशिवाय मंगळवेढा, मोहोळ, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट आणि पंढरपूर तालुक्यांमध्येही टंचाई निवारणासाठी उपाययोजना सुरु आहेत.

पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये केवळ टँकर सुरू करणे हा तात्पुरता उपाय ठरत आहे. शासकीयसह खासगी विहिरींचे अधिग्रहण, बंद पडलेल्या जलस्रोतांची दुरुस्ती, विहिरींची खोली वाढविणे आणि पाणी उपलब्ध असलेल्या स्रोतांचे योग्य नियोजन करण्यावर प्रशासनाने भर देणे गरजेचे आहे.

गेल्या काही दिवसांत जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे झाले नसल्याने भूजलपातळीवरही त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे टँकरची मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने टँकरची संख्या, फेऱ्या आणि पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक यांचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक आहे. गावागावांत नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळतोय की नाही, याची प्रत्यक्ष पाहणी करण्याची गरजही निर्माण झाली आहे.

दरम्यान, पावसाचा जोर वाढल्यास परिस्थितीत सुधारणा होऊ शकते. मात्र तोपर्यंत टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी टँकर पुरवठ्याबरोबरच कायमस्वरूपी जलस्रोत सक्षम करण्याच्या उपाययोजनांना गती देणे हीच प्रशासनासमोरील प्रमुख गरज आहे.

### पाण्यासाठी वणवण करावी लागू नये

प्रशासनाने टँकरच्या फेऱ्यांचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. केवळ टँकरवर अवलंबून न राहता उपलब्ध विहिरींचे अधिग्रहण, जलस्रोतांची दुरुस्ती आणि कायमस्वरुपी पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांना प्राधान्य दिले पाहिजे. नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तातडीने कार्यवाही करावी, असे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी सांगितले.

## महत्वाचे...



### कंत्राटदारांच्या प्रलंबित देयकांसाठी सोलापूरसह राज्यभरात आंदोलन

**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

सोलापूरसह राज्यातील कंत्राटदारांची प्रलंबित देयके व इतर गंभीर विषय व प्रश्नांबाबत सरकार विरोधात राज्यातील सर्वच ३२ जिल्ह्यांत प्रचंड रोष व्यक्त करण्यात आला. याच धर्तीवर सोलापुरातही स्थानिक कंत्राटदाराने त्यांच्या विविध देयकांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले आणि याबाबतचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांच्याकडे सादर केले. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार या आंदोलनात सहभागी झाले होते. राज्यातील कंत्राटदाराच्या झालेल्या आत्महत्येस जबाबदार असलेल्या अधिकारी यांचे वर कडक कारवाई करावी व यासाठी चौकशी समिती नेमावी,आत्महत्याग्रस्त कुटुंबास आर्थिक मदत सरकारने करावी, राज्यातील सर्व विभागाकडील गेल्या अनेक वर्षांपासून ८६ हजार कोटीं रुपयांची प्रलंबित देयके तातडीने वितरीत करावी, छोट्या छोट्या कामांचे एकत्रीकरण करून मोठ्या निविदा काढू नयेत, बिलांच्या अगोदरच जीएसटी भरण्याचा ब्रिटीश जुलमी कायदा रद्द करावा यासह विविध मागण्यांचा समावेश या निवेदनात आहे. या आंदोलनात महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनांचे राज्य अध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले, राज्य अभियंता महासचिव राजेश देशमुख, विभागीय अध्यक्ष मंगेश आवळे, प्रकाश पालरेचा, प्रकाश पाडंव, सुरेश कडु पाटील, अनिल पाटील, महाराष्ट्र पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे कार्याध्यक्ष आनंद तोडकरी, शरद पाटील, पी. बी. तिडके पाटील, वीरेंद्र जाधव, रघुवीर नाईक, अभियंता संघटनेचे दिपेश कोलुरवार, सिकंदर डांगे, कांतीलाल डुबल, अश्विन पवार, अन्वर अली, राजेश आसेगावकर, उमेश नलगे, अतुल घरत, समीर शेख, उज्वल पांडे, अक्षय नाईक, इरफान शेख,मोईन खान, निलेश भगवती, विजय डोली, विवेक राठोड, कैलास लांडे, उदय पाटील, कौस्तुभ राणे सहभागी झाले होते.



### 'कर्जाची परतफेड वेळेत केल्यामुळे एनपीए शून्यावर'

**मोहोळ, दि.७ सप्टेंबर-**

कर्जदारांनी वेळेत परतफेड केल्यामुळे एनपीए शून्यावर येऊन सर्वांची प्रगती झाली. संस्थेची अशीच प्रगती व्हावी, 'लोकमंगल'चे नांव महाराष्ट्रभर व्हावे अशी अपेक्षा डॉ.जयंत गोळवलकर यांनी व्यक्त केली. लोकमंगल पतसंस्थेच्या मोहोळ शाखेचे स्व-मालकीच्या जागेत स्थलांतर सोहळ्यात ते बोलत होते. पतसंस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली हे अध्यक्षस्थानी होते. व्यासपाठीवर व्हाईस चेअरमन निर्मला कुंभार, संचालक युवराज गायकवाड, डॉ.प्रमोद पाटील, डॉ.डी.पी. कदम, पद्माकर देशमुख, नगरसेवक सतीश काळे, जनार्दन कोळेकर आदी उपस्थित होते. युवराज गायकवाड यांनी पतसंस्थेविषयीची माहिती दिली. डॉ.प्रमोद पाटील, जनार्दन कोळेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी महेश सोवनी, रमेश बारसकर, दत्तात्रय काकडे, छगन आष्टूळ, संजय आठवले, महेश माने, बाबुराव ढाणके, इसाक हरणमारे यांच्यासह खातेदार, सभासद, ठेवीदार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखाधिकारी संतोष कदम, अक्षय आनंदकर, अविनाश कोकरे, नयन काकडे, महादेव जाधव, अनिता टिंगरे, प्रियंका देशमुख, वर्षा गायकवाड, वर्षा पाटील, स्वप्निल आंबरे, वैभव शिवपुजे यांनी परिश्रम घेतले.



### श्री नीलकंठेश्वर महाराज की जय...!

शेवटचे श्रावणी सोमवारनिमित्त श्रीमद् वीरशैव कुरुहिनशेट्टी (जांड्रा) समाजाच्या वतीने पूर्वविभागातील प्रमुख मार्गावरुन कुलदैवत श्रीनीलकंठेश्वर रथोत्सव मिरवणूक काढण्यात आली. यावेळी 'श्रीनीलकंठेश्वर महाराज की जय'चा घोष करण्यात आला. या मिरवणुकीत लेझीमसह विविध पथके सामील झाले होते.

(छायाचित्र-केवल तिवारी)

## इको फ्रेंडली बाप्पांसोबत मिळणार सीड बॉल!

### पत्रकार भवनात मातीच्या गणेश मूर्तींचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

आपले सर्व सण-उत्सव पर्यावरणपूरक साजरे व्हावेत यासाठी प्रयत्नशील असलेल्या इको फ्रेंडली क्लबच्यावतीने मातीच्या गणेशमूर्तींचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. मातीच्या गणेशमुर्तीसोबत सीड बॉल दिले जाणार आहे. विजापूर रोडवरील पत्रकार भवन येथे या मुर्तींचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे, असे अजित कोकणे यांनी सांगितले.

श्रीगणेशोत्सव पर्यावरणपूरक पध्दतीने साजरा व्हावा यासाठी सोलापूरचे मूर्तिकार विष्णू सगर, आशिष माशाळे, किरण सगर यांच्याकडून शाडू आणि लाल मातीच्या सुंदर इको फ्रेंडली गणेशमूर्ती बनवून घेतल्या आहेत. यात दगडूशेठ, लालबागचा राजा, चिंतामणी, शेठजी गणपती, लंबोदर यांसह विविध प्रकारचे मॉडेल्स उपलब्ध आहेत.



पीओपी अर्थात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनवलेल्या गणेशमूर्ती पाण्यामध्ये विरघळत नाहीत. नदी, तलाव येथील पाणी प्रदूषित होत आहे. जलचरांनाही धोका निर्माण झाला-होत आहे. याउलट मातीच्या गणेशमुर्ती पर्यावरणपूरक ठरणार आहेत, असे पर्यावरणस्नेही शिवानी राठोड यांनी सांगितले. जलस्रोत प्रदूषित होत आहेत, त्यामुळे आपले सण-उत्सव पर्यावरणपूरकच साजरे केले पाहिजे. आपला बाप्पा मातीचा असावा आणि विसर्जन घरीच स्वच्छ पाण्यात करावे. इको फ्रेंडली बाप्पाचा उपक्रम खरंच स्वागत करण्यासारखा आहे. आम्ही अनेक वर्षापासून या विचाराला प्रोत्साहन देत आहोत, असे पर्यावरणस्नेही गजानन समुद्र यांनी सांगितले.

## चारा छावण्या सुरु करण्याबाबत घालण्यात आले साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

अत्यल्प पावसामुळे सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता, सोलापूर दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून जाहीर करावा. चारा छावण्या सुरु करण्यात यावेत, असे साकडे 'संभाजी ब्रिगेड'ने जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे घातले. पावसाअभावी खरीप पिकांची वाढ खुंटली आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी, बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला. मात्र पुरेसा पाऊस न झाल्याने हा खर्च वाया जाण्याची आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्रचे श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनल दास, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोंगरे, जिल्हा कार्याध्यक्षद्वय शेखर भोसले, मनीषा कोई यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




# कृषी आणि पशुसंवर्धन विभागाच्या योजना वाढीव निधीच्या प्रतीक्षेत

## कृषी विभागाने मागितले १ कोटी

## विविध योजनांना शेतकऱ्यांकडून प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेमार्फत शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण भागासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांना यंदा वाढीव निधीची प्रतीक्षा आहे. कृषी विभागाच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षातील योजनांसाठी मंजूर तरतूद अपुरी पडत असल्याने काही महत्त्वाच्या योजनांना अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेषतः कृषी अभियांत्रिकी आणि सुधारित औजारे-साहित्य पुरवठा योजनांसाठी निधी वाढविण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद प्रशासनाकडे सादर करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून कृषी विभागासाठी सन २०२५-२६ च्या सुधारित आणि २०२६-२७ च्या मूळ अंदाजपत्रकात सुमारे ३८५.१० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, शेतकऱ्यांकडून विविध योजनांना मिळणारा प्रतिसाद आणि वाढती मागणी लक्षात घेता अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.



सुधारित औजारे-साहित्य पुरवठा योजनेतील स्लरी फिल्टरसाठी २.१५ लाख रुपये, तर कृषी अभियांत्रिकी योजनेतील ट्रॅक्टरचलित औजारे, रोटाव्हेटर, पेरणी यंत्र, पलटी नांगर, रोटरी टिलर तसेच वीडर आदींसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरज आहे. या योजनांसाठी मिळून एक कोटी रुपयांचा वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे यंत्रसामग्रीच्या माध्यमातून शेतीतील मजुरीचा खर्च कमी करून उत्पादनक्षमता वाढविण्याची संधी शेतकऱ्यांना मिळू शकते.

कृषी विभागाच्या अंदाजपत्रकात पीक संरक्षण औजारे, बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप, पॉवर स्प्रे पंप, ब्रश कटर, सोलार इन्सेक्ट ट्रॅप, तुषार सिंचन, कडबाकुट्टी, ताडपत्री, मधुमक्षिका पेट्या, स्लरी फिल्टर आदी योजनांचाही समावेश आहे. तसेच पीक विविधीकरण, सेंद्रिय शेती, महिला शेतकरी गट आणि कृषिनिष्ठ शेतकरी पुरस्कार यांसारख्या योजनांसाठीही तरतूद प्रस्तावित आहे. पशुसंवर्धन विभागाच्या अंदाजपत्रकात लसीकरण, जंतनाशक व गोचीडनाशक औषधांचा पुरवठा, पशुवैद्यकीय दवाखान्यांना औषधे, दुग्धोत्पादन वाढीसाठी वंश सुधारणा, पशुपालकांना कडबाकुट्टी व मिल्किंग मशीन, मुरघास निर्मितीसाठी प्रोत्साहन, स्तनदाह निर्मूलन तसेच नैसर्गिक आपत्तीत मृत जनावरांसाठी नुकसानभरपाई अशा विविध योजनांचा समावेश आहे.

### ग्रामीण भागाचे लागले लक्ष

निधी वाढल्यास योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकरी व पशुपालकांपर्यंत पोहोचू शकणार आहे. त्यामुळे प्रस्तावित वाढीव निधीला मंजुरी कधी मिळते? याकडे ग्रामीण भागाचे लक्ष लागले आहे.

### उपलब्ध निधी ठरत आहे अपुरा

अनेक योजनांसाठी उपलब्ध असलेला निधी अपुरा ठरत असून, वाढीव निधीची मागणी करण्यात आली आहे. कृषी अवजारे, आधुनिक यंत्रसामग्री, पीक संरक्षण साधने, दुग्धोत्पादनात वाढ, पशुधन आरोग्य आणि पशुपालकांसाठीच्या योजनांना प्राधान्य देणे आवश्यक आहे, असे कृषी व पशुसंवर्धन, दुग्धविकास समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



## महत्वाचे...

### विद्यार्थिनीचा विनयभंग; आरोपीस ३ महिन्यांची शिक्षा व दंड

**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

एका महाविद्यालयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी सौरभ संजय पाताळे (वय-२१, रा.घर क्र.५४६, उत्तर कसबा, सोलापूर) यास न्यायाधीश जे.जे.मोहिते यांनी ३ महिन्यांची साधी कैद व १ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त १५ दिवसांची कैद भोगावी लागणार आहे. दि.१४ मार्च २०२० रोजी १७ वर्षे ८ महिने वयाची ती महाविद्यालयीन विद्यार्थिनी शहरातील एका प्रसिध्द महाविद्याल येथे अकाउंट या विषयाचा पेपर देण्यासाठी गेली होती. पेपर संपल्यानंतर ती घरी परत न आल्याने तिच्या आई-वडिलांनी नातेवाईक, मैत्रिणींकडे तिचा शोध घेतला. दरम्यान, सौरभ पाताळे याने त्या मुलीशी महाविद्यालयात ओळख वाढवून तिच्याशी जवळीक साधत असल्याचे तसेच तिचा पाठलाग करुन तिला त्रास देत असल्याचे निष्पन्न झाले. याबाबत तिच्या पालकांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सपोनि चानकोटी यांनी याचा तपास केला. या तपासादरम्यान संबंधित साक्षीदारांचे जबाब, उपलब्ध कागदपत्रे व इतर पुरावे संकलित करुन तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. प्रकरणातील जबाब व तपास कागदपत्रांमध्ये असलेल्या तथ्यांच्या आधारे ही शिक्षा सुनावण्यात आली. यात सरकारी पक्षाच्या वतीने ॲड.कविता बागल यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलिस हवालदार प्यारन नदाफ यांनी काम पाहिले. दोषसिध्दी कक्षाकडील सपोनि राजेश डाकेवाड, फौजदार रामु मुद्दे, हवालदार मैंदाड यांनी कामकाज पाहिले.

### बसस्थानकावर प्रवाशांचे दागिने चोरणारा रिक्षाचालक जेरबंद

**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

बसस्थानक येथे बसमध्ये चढताना व उतरताना होणाऱ्या गर्दीचा गैरफायदा घेऊन प्रवाशांकडील दागिने व मोबाईल चोरी करणाऱ्या एका रिक्षाचालकास पोलिसांनी जेरबंद केले. उमेर अफसर शेख (वय-२७, रा.नवीन विडी घरकुल, कुंभारी, ता.दक्षिण सोलापूर) असे त्या रिक्षाचालकाचे नाव आहे. सोलापूर शहरातील दोन नंबर एस.टी. स्टँडसमोरील मोकळ्या मैदानात एक इसम विना पावतीचे सोन्याचे गंठण विक्री करण्यासाठी थांबला असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार शहर गुन्हे शाखेचे पथक तिकडे धाव घेत आरोपीकडून १३ ग्रॅम वजनाचे ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मिनी गंठण हस्तगत केले. दरम्यान, सन २०२४ मध्ये सोलापूर एस.टी. स्टँड येथे बसमध्ये चढत असलेल्या एका महिलेच्या पर्समधील सोन्याचे मिनी गंठण चोरी केल्याची कबुली त्याने दिली.

### घरगुती भांडणात तरुणाने पिले फवारणीचे औषध

**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

मोहोळ तालुक्यातील हिवरे येथील सुमित दिगंबर रणदिवे (वय-२५) या तरुणाने घरगुती भांडणात पिकावर फवारणीचे विषारी द्रव पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. मोहोळ येथे प्राथमिक उपचार करुन त्याचे मामा प्रकाश यांनी त्यास पुढील उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# राजकीय मंडळी येताहेत जगद्गुरुंच्या सानिध्यात; श्रीपंचमुखी परमेश्वर मंदिराला आले विशेष महत्व

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

श्रावणमासाचे औचित्य साधून सोलापूर शहर-जिल्ह्यातील विविध पक्षातील राजकीय मंडळी जगद्गुरुंच्या सानिध्यात येत आहेत. त्यामुळे अक्कलकोट रस्त्यावरील होटगी मठाच्या श्रीपंचमुखी परमेश्वर मंदिराला विशेष महत्व प्राप्त झाल्याचे पहावयास मिळत आहे. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे या पिता-पुत्रीने एका श्रावणी सोमवारी याठिकाणी येऊन पूजाविधी केली आणि जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामी यांचे आशीर्वाद घेतले. शिंदे पिता-पुत्रीचे हा फोटो सोशल मिडीयावर प्रचंड व्हायरल होत आहे.

दरम्यान, एकाच पक्षसंघटनेत असूनही राजकीय मतभेद असलेले आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.सचिन कल्याणशेट्टी हे तीन आमदार जगद्गुरुंच्या आशीर्वादासाठी आले होते. यावेळी शिवसेनेच्या खासदार डॉ.प्रा.ज्योती वाघमारे ह्याही उपस्थित होत्या. 'भाजपा'चे तीन आमदार, शिवसेनेच्या खासदार एकाचवेळी मंदिरात आल्याविषयी जाणून घेतले असता असे समजले की,



जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामी यांनी या सर्व नेतेमंडळींना रविवारी रात्री अचानकपणे निरोप देत देत मंदिरात पाचारण केल्याचे सांगण्यात आले. आ.विजयकुमार देशमुख यांच्यासोबत त्यांचे चिरंजीव तथा नगरसेवक डॉ.किरण देशमुख, व स्नुषा आले होते. आमदार सुभाष देशमुख एकटेच पाहायला मिळाले. आ.सचिन कल्याणशेट्टी आपल्या पत्नी तथा जि.प.सदस्या शांभवी कल्याणशेट्टी यांना सोबत घेऊन आले होते.

#### नवीन राजकीय समीकरण?

एकेकाळी आमदार सुभाष देशमुख यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्यासोबतही जुळत नसल्याचे पाहायला मिळत होते. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत आ.सुभाष देशमुख, आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्यात राजकीय कटुता आली. त्यावेळेपासून दोन्ही देशमुख आमदारद्वय एकत्र आले. आता जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामी यांनी या तिघाही आमदारांना एकत्रितपणे बोलावून घेतल्याने नवीन राजकीय समीकरण जुळुन येणार तर नाही ना? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगतदार ठरत आहे.

# पंढरपूर कॉरिडॉर : घराच्या बदल्यात घर, दुकान्यात बदल्यात दुकान

**येत्या १५ दिवसात भूसंपादनाची प्रक्रिया**

**डीपी प्लॅनमधील २२ रस्त्यांचे रुंदीकरण**

**२०१ कोटी रुपयांचे पुर्नवसन धोरण मंजूर**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ सप्टेंबर-**

पंढरपूर कॉरिडॉर या प्रकल्पांतर्गत बाधित होणारे क्षेत्र हे ६४ हजार चौरस मीटर इतके आहे. त्यापैकी शासकीय जागा सोडली तर सुमारे ५० हजार चौरस मीटर म्हणजेच सुमारे ६ एकर इतकी जागा संपादित करावी लागणार आहे. बाधितांना घराच्या बदल्यात घर, दुकानाच्या बदल्यात दुकान तसेच यावसायिक भागिदारांनाही लाभ दिले जाणार आहे, असे प्रकल्पाचे प्रमुख तथा उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून पाहिल्या जाणाऱ्या या महत्वाकांक्षी प्रकल्पाविषयी प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, दरम्यान पंढरपूरच्या धार्मिक आणि पर्यटन विकासाला चालना देतानाच स्थानिक नागरिकांचे हित, बाधितांचे योग्य पुर्नवसन, मंदिराची सुरक्षा आणि येणाऱ्या लाखों भाविकांसाठींच्या सोयी-सुविधा यांचा समतोल साधून 'कॉरिडॉर'ची अंमलबजावणी करण्याचा शासन आणि प्रशासनाचा प्रयत्न आहे.

पंढरपूर कॉरिडॉरची भुसंपादन प्रक्रिया येत्या पंधरा दिवसात सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. डीपी प्लॅननुसार शहरातील विविध २२ रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. रस्ते रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना नगररचना कायद्यानुसार नुकसान भरपाई देण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, 'कॉरिडॉर'ची व्याप्ती, भूसंपादन, बाधित नागरिकांना मिळणारा मोबदला, रस्ते रुंदीकरण तसेच मंदिर परिसरातील प्रस्तावित सुविधांची माहिती देण्यात आली.या प्रकल्पामध्ये ४५० निवासी मालमत्ता, ४०० व्यवसायिक मालमत्ता तसेच २२५ भाडेकरु बाधित होत आहेत. या सर्वांसाठी २०१ कोटी रुपयांचे पुर्नवसन धोरण शासनाकडून मंजूर करण्यात आलेले आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी पंढरपूर उपविभागाचे प्रांताधिकारी सचिन इथापे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निनकर, मुख्याधिकारी महेश रोकडे, तहसीलदार सचिन लंगोटे आदी उपस्थित होते.

**प्रत्येकाला अंदाजे १५ लाख रुपये मोबदला**

शहरात ज्या चार ठिकाणी वाहनतळ बांधण्यात येणार आहे. त्याठिकाणी व्यावसायिक भाडेकरुंना गाळा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुनर्वसन धोरणानुसार प्रत्येकाला अंदाजे १५ लाख रुपये मोबदला मिळू शकणार आहे.

**कॉरिडॉर आराखड्यात या गोष्टींना असणार प्राधान्य**

कॉरिडॉरच्या आराखड्यात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या सुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. मंदिर परिसराची सुरक्षा राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणेच्या धर्तीवर अधिक सक्षम करण्याचे प्रस्तावित आहे. भाविकांची सुरक्षितता, सोयीसुविधा याबरोबरच वाढती गर्दी, वाहतूक नियोजन आणि मंदिर परिसरातील व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात आला.




#### दोन्ही बाजूला प्रत्येकी ६५ मीटर रुंदी

विठ्ठल मंदिराच्या दोन्ही बाजूला म्हणजे चौफाळा ते महाद्वार घाट या मार्गावर प्रस्तावित असलेल्या कॉरिडॉरची रुंदी प्रत्येकी ६५ मीटर राहणार असून, प्रकल्पाचा अंदाजे खर्च ३ हजार ९९३ कोटी रुपये असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

#### असे असणार आहेत दर

'कॉरिडॉर'मध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांच्या निवासी मालमत्तांना २० हजार रुपये स्केअरफूट तर व्यवसायिक मालमत्ताधारकांना ४० हजार रुपये स्केअरफूट याप्रमाणे दर देण्यात येणार आहे.

#### असे राहणार निकष

इमारत किती मजली याऐवजी मुळ जागा किती स्केअर फुट आहे त्यानुसार दर दिला जाणार आहे. इमारतीचे बांधकाम कोणत्या पध्दतीचे आहे त्याचा विचार करुन नियमानुसार बांधकामासाठी आलेला खर्च देखील दिला जाणार आहे.

#### मंदिर परिसरात ६०० गाळ्यांचे नियोजन

प्रस्तावित कॉरिडॉरमध्ये मंदिर परिसरात माहिती केंद्र, मंदिर समिती सुरक्षा विभाग, दर्शन मंडप, मंदिर पुरोहित (सेवक केंद्र), भजन व कीर्तन मंडप, अन्नछत्र, वारकरीर महामंडळ कार्यालय, संतपीठ, मंदिर समिती कार्यालय, संग्रहालय, प्रतिक्षालय, पोलिस चौकी, वैद्यकीय सुरक्षा केंद्र, स्वच्छता केंद्र, आपत्कालीन सुविधा केंद्र आणि इतर विविध कार्यालये असणार आहेत. या सर्व प्रस्तावित इमारतींच्या खालच्या भागात बाधित झालेल्या व्यावसायिक गाळेधारकांसाठी सुमारे ६०० गाळे निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## खा.ज्योती वाघमारे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत दळणवळणाच्या प्रश्नांविषयी चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.७ सप्टेंबर-**

खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांच्या माढा दौऱ्यादरम्यान प्रवासी वेल्फेअर असोसिएशनसोबत झालेल्या बैठकीत माढा शहर व परिसरातील गावांच्यादळणवळणाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. माढा रेल्वे स्थानकात सोलापूर-पुणे-हुतात्मा एक्स्प्रेस, मुंबई-सोलापूर सिध्देश्वर एक्स्प्रेस या दोन गाड्यांना थांबा देण्यात यावे. माढा बसस्थानक बीओटी तत्त्वावर देऊन स्थानकाची सुधारणा व व्यापारी संकुल उभारण्यात यावे. पंढरपूर-माढा-तुळजापूर, टेंभूर्णी-माढा, अक्कलकोट-माढा-शिर्डी या मार्गांवर बससेवा सुरु करण्यात यावे आदी प्रश्नांकडे खा.वाघमारे यांचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी प्रवासी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष संतोष पंडित, शरद घोलप, संतोष साठे, श्रीनिवास अपराजित, महेश घोलप, वल्लभ कुलकर्णी, राजू साठे, प्रीतम शिंदे, प्रवीण चवरे, सोहम साठे, उदय सोनार, आदेश मेहता, वर्धमान उपाध्ये आदी उपस्थित होते.



## मतदार यादी पुनरिक्षणसंदर्भात आज लोकप्रतिनिधींसोबत बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुणे महसूल विभागातील पाच जिल्ह्यांसाठी विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांची 'मतदार यादी निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी त्या सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. सकाळी १०.४५ ते ११.३० यावेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेणार आहेत. सकाळी ११.३० ते दुपारी १२ यावेळेत जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातील शहर उत्तर, शहर मध्य आणि शहर दक्षिण या मतदारसंघांच्या निवडणूक नोंदणी अधिकारी कार्यालयांची, दुपारी १२ ते १२.३० यावेळेत सिध्देश्वर व सोशल हायस्कूल येथील मतदान केंद्रांची, दुपारी १२.३० ते १२.५० यावेळेत शरदचंद्र पवार प्रशाला व लोकमंगल प्रशाला येथील मतदान केंद्रांची, दुपारी १२.५० ते १.१५ यावेळेत बसवेश्वर नगर व देगाव गावठाण येथील मतदान केंद्रांची पाहणी करणार आहेत. या पाहणीदरम्यान बीएलओ आणि मतदारांशीही त्या संवाद साधणार आहेत.

## अपहरण झालेल्या मुलीसह आरोपीचा अहमदाबादेत लागला शोध

**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

पावणे दोन वर्षांपूर्वी सदर बझार पोलिस ठाण्याच्या हद्दीत अपहरण झालेल्या एका अल्पवयीन मुलीसह आरोपीचा गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे शोध लागला. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षच्या सोलापूर विभागातील पोलिस पथकाने तब्बल २ हजार किलोमीटर अंतर पार करुन ओम संजय साबळे याला ताब्यात घेतले. याप्रकरणी दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर बझार पोलिस ठाण्याच्या तत्कालीन तपासी अंमलदारांनी शोध घेतला. मात्र, ते मिळून न आल्याने पुढील तपासासाठी दि.२१ एप्रिल २०२५ रोजी हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षकडे वर्ग करण्यात आला.




## ऊस बिलासाठी शेतकरी चढले चक्क झाडावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

थकबाकी असलेल्या ऊस बिलाच्या रक्कमेसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा संताप आता टोकाला पोहोचला आहे. गोकुळ शुगरकडून थकीत बिले मिळत नसल्याचा आरोप करत हवालदील झालेल्या काही शेतकऱ्यांनी सोलापुरात झाडावर चढून आगळेवेगळे आंदोलन सुरू केले. दरम्यान, बील मिळेपर्यंत खाली उतरणार नाही, अशी रोखठोक आक्रमक भूमिकाही या शेतकऱ्यांनी घेतली होती.

सन २०२३ ते २०२५ या दोन वर्षातील २७० शेतकऱ्याचे १ कोटी ९७ लाख या कारखान्याकडे थकीत बिले आहेत. यासंदर्भात साखर आयुक्तालय आणि जिल्हा प्रशासनाकडे वारंवार दाद मागूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. केवळ आश्वासने पदरात पडत असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी अखेर आंदोलनाचा हा टोकाचा मार्ग अवलंबला.

कारखान्याने आमचा ऊस नेला, साखर विकली, पण घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांचे पैसे मात्र वर्षानुवर्षे अडकवून ठेवले आहेत. बँकांची कर्जे, मुलांचे शिक्षण आणि संसाराचा गाडा हाकणे मुश्कील झाले आहे. दरम्यान, संबंधितांवर तत्काळ कायदेशीर कारवाई करून शेतकऱ्यांचे पैसे खात्यावर जमा करावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी दिला.



# विद्यापीठाच्या अधिसभेपासून सदस्यांना दूर ठेवण्याचा डाव?


### थेट प्रश्नोत्तरांवरुन पळ काढण्याचा प्रयत्न

### खर्चात काटकसरीचे कारण; बहिष्कार टाकण्याची तयारी

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची ३८वी अधिसभा (सिनेट) मंगळवार, दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन पध्दतीने घेण्यासंदर्भातचे परिपत्रक विद्यापीठाचे प्र.कुलसचिव अतुल लकडे काढले आहे. परंतु या बैठकीस बहुतांश सिनेट सदस्यांनी विरोध दर्शविला आहे. हे सदस्य या बैठकीवर बहिष्कार टाकण्याच्या तयारीत आहेत. वर्षातून केवळ दोनदा होणाऱ्या या सर्वोच्च सभेपासून अधिसभा सदस्यांना दूर ठेवण्याचा व थेट प्रश्नोत्तरांवरुन पळ काढण्याचा हा विद्यापीठाचा डाव असल्याचा आरोप अधिसभा सदस्यांकडून केला जात आहे.

बैठक प्रत्यक्ष न घेता ऑनलाईन घेण्याच्या विद्यापीठाच्या सोयीस्कर भूमिकेवर सिनेट सदस्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. मागील अधिसभेत सविस्तर उत्तराच्या नावाखाली प्रश्नोत्तरासाठी एकाच प्रश्नाचे 'सविस्तर व समाधानकारक' उत्तर देण्याच्या नावाखाली तब्बल ५० मिनिटांचा कालावधी खर्ची घातला होता. त्यामुळे उर्वरित प्रश्न पटलावर आले नाहीत. आता तर थेट ऑनलाईन सभेचा घाट घालून सदस्यांचा आवाज दाबण्याचा आणि उपप्रश्नांना बगल देण्याचा प्रकार विद्यापीठ प्रशासन करत असल्याचा आरोप अधिसभा सदस्यांचा आहे.




#### जाब विचारण्यासाठी ऑफलाईन बैठक अनिवार्य

विद्यापीठातील २००हून अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांची अचानक नियुक्ती थांबवल्याने निर्माण झालेला बेरोजगारीचा बिकट प्रश्न, स्मारक समितीच्या बैठकीत उडालेला प्रचंड गोंधळ आणि त्यासंदर्भातील चौकशी समिती नेमण्यास होणारी टाळाटाळ, अहिल्यादेवींच्या स्मारकाचे रखडलेले लोकार्पण, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास यासह विद्यार्थ्यांशी निगडित निर्णयांवर प्रशासनाला जाब विचारण्यासाठी ऑफलाइन बैठक अनिवार्य आहे.

**'खर्च कमी करण्यासाठी ऑनलाईन बैठक**

यासंदर्भात कुलगुरु प्रा.डॉ.कर्नल प्रकाश महानवर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, प्रशासकीय खर्चात काटकसर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनास प्रतिसाद देत आम्ही ऑनलाईन बैठक घेत आहोत. यामुळे विद्यापीठाचा या बैठकीसाठी होणारा सात लाख रुपयांचा खर्च वाचणार आहे.

#### अधिकाऱ्यांचा प्रवासखर्च जाहीर करा

कुलगुरुंसह विद्यापीठाच्या संविधानिक अधिकाऱ्यानी अन्य ठिकाणच्या बैठकांना जाताना शासकीय वाहनांऐवजी किती वेळा एस.टी.बस अथवा रेल्वेसारख्या सार्वजनिक वाहनांचा वापर केला? विविध विभागातील द्वितीय श्रेणीच्या अधिकाऱ्यांनी कोणकोणत्या बाबींमध्ये काटकसर करुन विद्यापीठाला आर्थिक लाभ मिळवून दिला, याचा हिशेब आधी जाहीर करावा, असा थेट सवाल सिनेट सदस्यांनी उपस्थित केला आहे.

#### सदस्यांच्या संमतीने बहिष्काराचा निर्णय

ऑनलाईनमध्ये कनेक्टिव्हिटीचा, नेटचा, डिव्हाइसचा प्रॉब्लेम अशा तांत्रिक अडचणी येतात. ऑनलाइन बैठकीचे पूर्ण कंट्रोल विद्यापीठाकडे असल्यामुळे सदस्यांचे म्हणणे सर्वांपर्यंत पोहोचत आहेत का नाही हे लक्षात येत नाही. त्यामुळे ऑफलाइन बैठक घेण्याची मागणी केली आहे. याचा निर्णय झाला नाही तर सर्व सदस्यांच्या संमतीने बहिष्काराचा निर्णय होईल, असे अधिसभा सदस्य प्रा.डॉ.जैनोद्दिन मुल्ला यांनी सांगितले.

**ऑनलाईन बैठकीचा निर्णय कुलगुरुंचा**

व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये आयत्या वेळेच्या विषयामध्ये सिनेटची बैठक ऑनलाईन घेणार असल्याचे कुलगुरू महोदयांनी आम्हाला सांगितले होते. परंतु ही बैठक ऑफलाइन घ्यावी, असे बहुसंख्य सदस्यांनी सुचविले होते. मात्र हा निर्णय कुलगुरूंचा आहे. परंतु अंतिम निर्णय कुलगुरूंनी राज्यपाल महोदयांशी चर्चा करुन घ्यावा, असे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.सचिन गायकवाड यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## श्रीमद् भागवत कथामृत- २५

### अहंकाराच्या वाऱ्याने परमात्मा दूर होतात

श्री भगवंतांनी अनंत अवतार घेतले. पण दुसऱ्या कोणत्याही अवतारात काला नाही. काल्याचा महाप्रसाद आहे तो फक्त श्रीकृष्ण जन्मावतारामध्येच, काल्यावर विस्ताराने भाष्य करताना हभप जयवंत बोधले महाराज म्हणाले, काल्यामध्ये दोन भिन्न वस्तू एकत्र आणून एकजीव एकत्र मिसळाव्या लागतात. अनुभवाला येणं हे महत्त्वाचे आहे. दोन वस्तू एकत्र आल्यानंतर आपापले धर्म सोडतात. म्हणजे आपण आमटी भाकरीचा काला केला असेल तर आमटी आपल्या तिखटपणाचा धर्म सोडते आणि भाकरी आपल्या गोडपणाचा, दहीभाताच्या काल्यात दही आपल्या आंबटपणाचा धर्म सोडते आणि भात आपल्या गोडपणाचा. लौकिक अर्थाने यातील दही प्रपंच आणि आणि भात म्हणजे परमार्थ प्रपंच. प्रपंच त्रास आणि कटकटीने भरलेला वादग्रस्त तर परमार्थ सुख समाधान आनंदाने व्याप्त परिपूर्ण, प्रपंचात राहून परमार्थ करायचा की परमार्थात राहून प्रपंच करायचा याचेच नाव प्रारब्ध आहे. भगवंताबरोबरच गोकुळही अवतरले. यातून निर्माण होणारी स्थितीही कालास्वरुपच. या गोपिका कोण? श्रुती मंत्र म्हणजे गोपी. उपनिषदातील मंत्र मानले जातात. नारद मुनीही श्रीकृष्णाच्या अवतारस्थळी येतात. तेथे शुभ्र वस्त्रधारी स्त्री ध्यानस्थ असलेली पाहतात. माते म्हणून स्तुती करतात आणि तू कोण आहेस म्हणून विचारतात. जग ज्याच्या शोधात असते ती मी परिपूर्ण ब्रह्मविद्या असल्याचे ती सांगते. अध्यात्मविद्या. मी प्रमुख ब्रह्मविद्या आहे. तू का ध्यान करतेस यावर ती शुभ्र वस्त्रधारी स्त्री म्हणते, काही दिवसांनी भगवंत श्रीकृष्ण या ठिकाणी अवताराला येणार आहेत. गोप, गोपिकाबरोबर मला. रासक्रीडा करावयाची आहे. त्यात माझा समावेश व्हावा म्हणून मी ध्यान करीत असल्याचे ती म्हणते. सून, लेक आणि सासू अशा रुपकातून कार्य ज्ञान भक्त फरकच राहत नसल्याचे महाराजांनी लौकिक आणि अलौकिक अर्थाने त्याचे महत्त्व उलगडून दाखवले. यावरील स्पष्टीकरणात सून म्हणजे कायम बंधनात, लेक म्हणजे कधी बंधन, कधी मुक्त आणि सासू मात्र कायम स्वतंत्र असे स्पष्टीकरण करत पाप पुण्य बंध नात बांधून टाकतात. अहंकाराचा वारा जरी शिवला तरी परमात्मा त्यापासून दूर होतात. दुर्दैवाने राधेच्याही मनामध्ये मी श्रेष्ठ, तृप्त झाल्याची भावना म्हणजेच अहंकार निर्माण झाल्याबरोबर भगवान श्रीकृष्ण लुप्त झाल्याबरोबर राधा खाली पडली. दरम्यान गोप गोपिकेबरोबर राधा ही हाका मारु लागली, श्रीकृष्णाचा धावा करु लागली. अंग लपविले अंगी तो निर्गुण निराकार इथेच आहे. तो गेला कसा? का गेला? राधा वरमली तिच्या चूक लक्षात आली. आपणही अहंकार बाधित झाल्याची जाणीव झाली. माझी चूक झाली. मी मागं पाहिल्याचा अहंकार निर्माण झाला. देव जवळ असताना मागं पाहण्याने, राधेच्या मनात सूक्ष्म अलंकार निर्माण झाला. गोपी गोपिकासह राधेनेही श्री कृष्णाच्या नावाने मारलेल्या हाकाटीलाच गोपीगीत म्हणून स्थान मिळाले असल्याचे निदर्शनास आणून या वेळच्या निरुपणात श्रीकृष्ण जन्माष्टमीच्यानिमित्ताने करण्यात येणारा काला आणि श्रीकृष्ण गोकुळी आल्यानंतर त्यांच्या दर्शनाची त्यांना भेटण्याची आणि त्यानां भेटल्यानंतर करण्यात आलेल्या रासक्रीडेवर प्रापंचिक, अध्यात्मिक, पारमार्थिक लौकिक आणि अलौकिक अर्थाने महत्त्व आणि माहात्म्य त्यामागील तत्त्वज्ञान आदी मौलिक बाबींवर विविध कथा घटना घडामोडी संदर्भ उदाहरणासह पूर्ण विस्तार आणि विवेचन केल्यानंतर बोधले महाराजांनी नित्य निरुपणाची सांगता केली.


निरुपणकार डॉ. जयवंत बोधले महाराज

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. ८ सप्टेंबर २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - श्रावण
तिथी - कृ. द्वादशी
ऋतु - शरद (दक्षिणायन)
नक्षत्र- पुष्य (१६.३९)
योग - परिघ (२४.४०)
करण - गरज (२५.३५)
राहू काल : मंगळवार
दु. ०३.०० ते ०४.३०

दिनविशेष : * जागतिक साक्षरता दिन
१९३३: प्रसिद्ध भारतीय पार्श्वगायिका आशा भोसले यांचा जन्म.
१९२६: आसामचे प्रख्यात गायक, संगीतकार आणि गीतकार भूपेन हजारिका यांचा जन्म.
१९६०: भारतीय स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार आणि राजकारणी फिरोझ गांधी यांचा मृत्यू.




## छत्रपती संभाजी महाराज नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभासदांना ११ टक्के लांभाश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

छत्रपती संभाजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूरची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती. छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून सभेची सुरुवात करण्यात आली.

यावेळी आर्थिक पत्रकाचे वाचन करून आगामी आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले. मागील आर्थिक वर्षात सभासदांना १० टक्के लाभांश देण्यात आला होता यंदा संस्थेचा वाढलेला नफा पाहता ११ टक्के लाभांश देण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. कर्जाच्या हप्त्याची तारीख देखील न चुकविणाऱ्या नियमित परतफेड करणाऱ्या कर्जदाराचा यावेळी सन्मान देखील केला गेला. आर्थिक वर्षात सर्वाधिक खाते उघडणाऱ्या पिग्मी एजंटचा प्रोत्साहनपर सत्कार केला. प्रस्ताविकात संस्थेचे सल्लगार मंडळ सदस्य गुरुनाथ निंबाळे यांनी केले. संचालक तुकाराम जाधव, ॲड. महेश जगताप यांनी आपल्या मनोगतातून संस्थेने अल्पावधीत केलेल्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करून संस्था वाढीसाठी सर्व संचालक, सल्लगार आणि सभासदांनी योगदान देण्याचे आवाहन केले. संस्थेचे चेअरमन श्रीकांत डांगे यांनी आम्हाला प्राणाहून प्रिय असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने संस्था असल्यामुळे या संस्थेचा नावलौकिक वाढवत राहण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले. या सभेसाठी संस्थेचे सचिव प्रवीण मोरे, संचालक गजानन जमदाडे, शशिकांत शिंदे, अमोल बडवणे, तुकाराम जाधव, प्रमिला आखाडे, प्रा. मल्लिकार्जुन परळकर, सल्लगार मंडळ सदस्य चित्रकार नितीन खिलारे, ॲड. महेश जगताप, अजिंक्य पाटील, महेश घोडके यांची उपस्थिती होती.

# लेखन म्हणजे केवळ शब्द नव्हे; तो अनुभव असतो

## मिलिंद शिंत्रे; प्रिसिजन वाचन अभियानमध्ये रंगला लेखक-संवाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

लेखन म्हणजे केवळ शब्द नव्हे; तो एक अनुभव असतो. तो जगायचा, पाहायचा आणि पुन्हा नव्याने घडवायचा असतो, असे सांगत प्रसिद्ध लेखक, नाटककार व दिग्दर्शक मिलिंद शिंत्रे यांनी आपल्या प्रयोगशील लेखनप्रवासातील अनेक रंजक किस्से सोलापूरकरांसमोर उलगडले. मला एखादी गोष्ट जमत नाही, असे कोणी म्हटले की ती पूर्ण केल्याशिवाय मी स्वस्थ बसत नाही, अशी आपल्या स्वभावाची खासियतही त्यांनी यावेळी सांगितली.

प्रिसिजन फाउंडेशनच्या 'प्रिसिजन वाचन अभियान' अंतर्गत डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित विशेष संवाद कार्यक्रमात अभिनेत्री योगिनी पोफळे यांनी मिलिंद शिंत्रे यांची मुलाखत घेतली. साहित्य, रंगभूमी, मालिका, चित्रपट आणि विनोदी लेखन अशा विविध क्षेत्रांतील त्यांचा प्रवास या संवादातून उलगडला.

आपल्या लेखनाची सुरुवात शालेय जीवनात पाचवीत असतानाच झाल्याचे शिंत्रे यांनी सांगितले. एकांकिका, नाटक, मालिका आणि त्यानंतर सिनेमापर्यंत त्यांचा लेखनप्रवास विस्तारत गेला. आतापर्यंत पाच सिनेमांचे लेखन केल्याचे त्यांनी सांगितले. मूकनाट्य लेखनातून प्रेक्षकांना खळखळून हसविण्यापासून ते रंगभूमीवरील विविध प्रयोगांपर्यंतचा हा प्रवास त्यांनी अनेक आठवणींसह उलगडला.

सातवीत असताना आजीकडून पुस्तके भेट मिळाली आणि त्यातून वाचनाची गोडी अधिक वाढत गेली, अशी आठवण त्यांनी सांगितली. आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे आणि द. मा. मिरासदार यांचे साहित्य वाचत मोठा झालो. त्यांच्या लेखनाचा माझ्यावर मोठा प्रभाव पडला, असे शिंत्रे यांनी नमूद केले.

आपल्या विनोदी लेखनाविषयी बोलताना शिंत्रे यांनी 'फु बाई फु' या कार्यक्रमासाठी केलेल्या लेखनाची आठवण सांगितली. स्किट म्हणजे हास्यांक; स्किट म्हणजे प्रहसन नव्हे, असे स्पष्ट करत त्यांनी विनोदी लेखनातील बारकावे आणि त्यामागची लेखनप्रक्रियाही उलगडली. शब्दांशी अनोखे प्रयोग करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या शिंत्रे यांच्या 'पुष्पाचे प्राक्तन' या कथेचाही संवादात उल्लेख झाला. 'प' या अक्षराच्या बाराखडीपासून सुरू होणाऱ्या तब्बल १७५० शब्दांचा वापर करून साकारलेल्या या कथेतून त्यांनी मराठी भाषेतील शब्दसामर्थ्याचा अनोखा आविष्कार घडविला आहे. त्यांच्या या प्रयोगाची नोंद 'रेकॉर्ड होल्डर्स रिपब्लिक', लंडन यांनी विश्वविक्रम म्हणून केल्याचे कार्यक्रमात सांगण्यात आले. मराठीतील 'क ते ज्ञ' या व्यंजनांचा समावेश असलेले सर्वात लहान वाक्य तसेच मराठीतील सर्वात मोठे शब्दकोडे अशा विविध भाषिक प्रयोगांचाही त्यांच्या नावाशी संबंध आहे. मला एखादी गोष्ट जमत नाही, असे सांगितले की ती करून दाखविण्याची जिद्द निर्माण होते, असे सांगताना शिंत्रे यांनी आपल्या प्रयोगशील वृत्तीमागची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या अनुभवकथनाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते मिलिंद शिंत्रे आणि मुलाखतकार अभिनेत्री योगिनी पोफळे यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन माधव देशपांडे यांनी केले.

## दुकानासमोर गाडी लावू नका म्हणाल्याने चाकूने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

आपल्या दुकानासमोर गाडी लावू नका. असे म्हणाल्याच्या कारणावरून चाकू आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. ही घटना शिवाजीनगर (बाळे) येथील ताज सर्विसिंग सेंटर समोर काल रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. अझरुद्दीन सलीम शेख (वय ३० रा.गणेशनगर बाळे) असे जखमीचे नाव आहे.




रात्री ८ च्या सुमारास त्याच्या दुकानासमोर वाहन लावले होते. त्याने दुकानासमोर वाहन लावू नका. असे म्हणाला असता अरबाज युनुस शेख, त्याचा भाऊ आफ्रीद आणि त्याच्या साथिदाराने मिळून मारहाण केली.त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.



## गोकुळाष्टमीनिमित्त मेहता शाळेत दहीहंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत गोकुळाष्टमी निमित्त दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. शाळा समिती अध्यक्ष अनिल बरवे, सुरेश मंकणी नियामक मंडळ सदस्य यांनी शुभेच्छा दिल्या. प्रथम श्रुती कुलकर्णी यांनी श्री कृष्णाचे गीत सादर केले. मधुरा छत्रे यांनी गोकुळाष्टमी निमित्त माहिती सांगितली. इ. ३ री रायगड मधील विद्यार्थिनींनी जय जनार्दना या गीतावर समूह नृत्य सादर केले. त्यांना श्रुती कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. यानिमित्ताने इ. १ ली च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी राधाकृष्णाची वेशभूषा केली होती. गोविंदा आला रे आला म्हणत बाळगोपाळांनी पुस्तक रुपी दहीहंडी फोडली. सूत्रसंचालन स्वाती मोहरे आणि आभार शितल जालीमींचे यांनी मानले.




## रेवणसिध्देश्वर महाराजांचा पालखी, रथोत्सव भक्तीभवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

श्रावण महिन्यामध्ये निघणाऱ्या जगद्गुरु श्री रेवणसिद्धेश्वर महाराजांची पालखी व रथोत्सवाची शेवटच्या रविवारी मोठ्या भक्तीभावाने सांगता झाली. याप्रसंगी सकाळी राज्यसभाचे खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, प्राचार्य गजानन धरणे, नगरसेवक प्रियदर्शन साठे व सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष दशरथ वडतिले यांच्या हस्ते पालखीचे पूजन संपन्न झाले. त्यानंतर पारंपारिक वाद्य वाजवत मोठ्या भक्तीभावाने ही मिरवणूक जोडभावी पेठेतील चिद्रे वाडा येथून, कुंभारवेस, मंगळवार पेठ,मधला मारुती, आजोबा गणपती, विजापूर वेस, गुरु भेट, सात रस्ता मार्गे विजापूर रोड येथील रेवनसिद्धेश्वर मंदिरात दुपारी पोहोचली, त्यानंतर महाआरती होऊन महाप्रसादाचे वाटप झाले.

सायंकाळी श्री गुरुभेट मंदिर येथून रथाची मिरवणूक मोठ्या थाटामाटात निघाली मिरवणुकीत हत्तीवर जगद्गुरु रेवणसिद्धेश्वर महाराजांची जिवंत प्रतिकृती साकरण्यात आले होती. अथर्व ढोल पथकाने सर्वांचे लक्ष वेधले. उदय चाकोते, सुदीप चाकोते, राजशेखर हिरेहब्बू,नरेंद्र गंभीरे, निलेश ठोकडे सिद्धेश्वर मुनाळे, शिवराज म्हेत्रे, दिपक आर्वे, बसवराज, मनीष काळजे यांच्या हस्ते रथाचे पूजन झाले.

याप्रसंगी रेवणसिद्धेश्वर समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष गंगाधर यादवाड, गिरमलप्पा हिंगमिरे, सिद्धेश्वर दुलंगे, अशोक चाकोते, राजशेखर दुलंगे, शिवानंद ख्याडे उपस्थित होते.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन लेकरांसह पती-पत्नी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

पत्नी आणि मुलासोबत दुचाकीवरून प्रवास करीत असताना चारचाकी वाहनाच्या धडकेने चौघे जखमी झाले. हा अपघात अक्कलकोट मार्गावरील कर्जाळ येथे आज सोमवारी सकाळच्या सुमारास घडला.

प्रशांत विठ्ठल रणदिवे (वय ४०) त्यांची पत्नी वृषाली रणदिवे (वय ३२) दोन मुले शौर्य (वय ६ वर्ष ) आणि चिरायू (वय ३ वर्षे, सर्व रा.मोहोळ) अशी जखमींची नावे आहेत. ते सर्वजण आज सोमवारी दुचाकीवरून मोहोळ ते अक्कलकोट असा प्रवास करीत होते. कर्जाळ येथील पेट्रोल पंपाजवळ अनोळखी मोटारीच्या धडकेने ते जखमी झाले.त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# सोलापूरच्या प्रगतीसाठी नव्याने विचार करावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

सिंगापूरपासून बंगळूरपर्यंत अनेक शहरे 'ग्रीन सिटी' किंवा शाश्वत शहर अशी ओळख निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. सोलापूरकरांनीही शहराच्या प्रगतीसाठी नव्याने विचार करण्याची गरज असल्याचे मत ज्येष्ठ लेखिका व वास्तुरचनाकार सुलक्षणा महाजन यांनी व्यक्त केले.

हिराचंद नेमचंद वाचनालयात 'सोलापूर आजचे-नियोजन उद्याचे' या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर होते. यावेळी मंचावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर




विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, कार्यवाह दत्ता गायकवाड, उपस्थित होते. महाजन यांनी 'पीपीटी' सादरीकरणातून सोलापूरच्या विकासाचा आढावा मांडला.

सोलापूरच्या इतिहासातील कापडगिरण्यांचा काळ संपल्यानंतर ऊस व साखरेचे अर्थकारण पुढे आले. त्यानंतर सेवा क्षेत्राची वाढ झाली. या बदलाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शहर कसे असावे, याबाबतची भूमिका ठरवायला हवी. शहराच्या विकासात अनेक खाती व यंत्रणा परस्परविरोधी भूमिका घेत असल्याने निधीचा अपव्यय होतो.

हे टाळण्यासाठी सोलापूरकरांनी कोणती समस्या प्राधान्याने सोडवायची, हे ठरवावे आणि त्यानुसार महानगरपालिकेने उपाययोजना कराव्यात. यावेळी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी मनोगत व्यक्त केले. वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह डॉ. नभा काकडे यांनी प्रास्ताविक केले .उपाध्यक्षा मंजूषा गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

## शुभ लक्ष प्राप्त करा




'उद्यापासून पवित्र असा पर्युषण पर्व प्रारंभ होत आहे. या काळात प्रवचन, ध्यानधारणा, जप, तप, उपवास करून शुद्ध बनून शुभ लक्ष प्राप्त करण्याचा हा काळ आहे,'असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात त्या बोलत होत्या. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या,आपण प्रवचन ऐकतो परंतु लक्ष संसारातच असते.त्यामुळे उत्तम रीतीने प्रवचन आपण ग्रहण करू शकत नाही. संतांची वाणी आत्मसात करताना श्रद्धेने, विश्वासपूर्वक व समर्पण भावनेने श्रवण करा.आपण समर्पणात कमी पडतो. धर्मस्थानात येऊन जे ऐकता ते येथेच सोडून जाता,असे नको. जाताना येथून काहीतरी घेऊन जा.कोरडे राहू नका. संतांचे प्रवचन म्हणजे साक्षात ईश्वराचा संदेश, ईश्वराची वाणीच. ईश्वराच्या वाणीत भिजून जा. आपल्या कर्माची फळे आपल्यालाच भोगावी लागतात. मनुष्य कर्म करतो. कर्म करताना तो घाबरत नाही. परंतु फळ भोगताना मात्र तो रडतो. कर्म करताना भीती वाटत नाही मग फळ भोगायचे म्हटले की.. रडायचे का?विचार करून कर्म करा, कर्म विवेकपूर्ण हवे.भगवान महावीरांचे भक्त आहात, स्वतःचा उद्धार करून घ्या. कर्म बंध होऊ नये, याची काळजी घ्या. बुद्धीची धार तीव्र असेल तर हातून चुकीचे कर्म घडत नाहीत. शाश्वत आनंद आणि शाश्वत सुख प्राप्त करायचे असेल तर आत्म गुणांचा घात होणार नाही असे कर्म करा.

- मल्लेश पुरवंत



## ऑर्किड स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाला साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन आणि आरतीने झाली. या प्रसंगी शाळेचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेच्या मार्गदर्शीका मीना पारखे, प्राचार्या रश्मी कुंभार उपस्थित होते. याप्रसंगी प्री-प्रायमरी आणि प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाच्या सुंदर आणि आकर्षक पारंपरिक पोशाख परिधान केला होता. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे दहीहंडी उत्सव शाळेच्या मैदानावर सजवलेली दहीहंडी फोडण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. प्राचार्या रश्मी कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत गोविंदा रे गोपाळा' च्या गजरात आणि ढोल-ताशांच्या तालावर चिमुकल्या गोविंदांनी मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना पोह्यांच्या गोपाळकाल्याचा प्रसाद वाटण्यात आला.



## शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने मीना ठाकरेंना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

स्वर्गीय माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनी अक्कलकोट रोड येथे अभिवादन सभेचे आयोजन केले होते. यावेळी स्वर्गीय मीना ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. यावेळी सर्वप्रथम स्वर्गीय मासाहेब मीनाताई ठाकरे, व स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रज्वलन करण्यात आले. यावेळी शशिकला चिवड शेट्टी, प्रीती नायर, मीना सुरवसे, अनिता राठोड, जयश्री पाटील, चंदाराणी जाधव, पूजा शिंदे, सायरा मुलानी, सरस्वती कोरे, नमुबाई कारकले उपस्थित होते.



## साहित्यसेवा पुरस्काराने संध्या धर्माधिकारी सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ सप्टेंबर-**

'साहित्य सेवा संघ' या साहित्यिक संस्थेच्या वतीने रएन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, येथे पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला.

हा सोहळ्याला प्रा. डॉ. कर्नल प्रकाश महानवर, कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या हस्ते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीकांत मोरे, जेष्ठ साहित्यिक, तथा सर्वेसर्वा व प्रमुख, मनोरमा परिवार, सोलापूर यांनी भुषविले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रदीप पाटील, ज्येष्ठ कवी व लेखक, ईश्वरपूर, जि. सांगली हे उपस्थित होते. या सोहळ्यामध्ये डॉ. कार्ले, जडे, मा. योगिराज वाघमारे, डॉ. नसमा पठाण, डॉ. शंकर नवले आदी मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याला मा. डॉ. शिवाजीराव शिंदे सहायक कुलसचिव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, कार्यक्रमाचे संयोजक दत्तात्रय इंगळे (आलूरकर) अध्यक्ष, साहित्य सेवा संघ, सोलापूर तथा संस्थापक, ज्ञानदान प्रकाशन संस्था, मदन जवळगेकर, विजयकुमार सोनवणे, आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिंदे कारखान्यावर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा

## मंत्री विखे पाटील, गोरे, निंबाळकरांची प्रमुख उपस्थिती

## आमदार बबनराव शिंदेंच्या अमृत महोत्सवानिमित्त १० हजार जणांचे रक्तदानाचे उद्दिष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ७ सप्टेंबर-**

पिंपळनेर येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने येत्या १२ किंवा १६ ऑक्टोबर रोजी भव्य शेतकरी मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. मेळाव्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन आमदार बबनराव शिंदे यांनी दिली.

टेंभुर्णीत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. राज्यातील मोठे नेते येणार असल्याने या मेळाव्याकडे माढा तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. यावेळी बोलताना माजी आमदार बबनराव शिंदे यांनी सध्या साखरेला बाजारात चांगली मागणी झाल्याने कारखाना लवकर सुरू करण्याच्या हालचाली सुरू आहेत. १७ किंवा १९ सप्टेंबर रोजी रिजनल डायरेक्टर अग्निहोत्री यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता पिंपळनेर, तर दुपारी २ वाजता करकंब युनिट येथे बॉयलर पूजा होणार आहे. यंदा विविध कारणांनी उसाची कमतरता भासणार आहे. परिणामी यंदाचा गळीत हंगाम सुमारे तीन महिने चालण्याची अपेक्षा असल्याचे सांगितले.

आमदार शिंदे यांनी व्यक्त केली.

कारखान्याकडे सध्या १ लाख ७१ हजार क्विंटल साखर शिल्लक असून सरासरी ३९३९ रुपये दर मिळाला आहे, तर शेवटचे टेंडर ४४०० रुपयांनी सुटले आहे. दिवाळीनिमित्त शेतकऱ्यांना ३० रुपये किलो दराने ५० किलो साखर घरपोच देणर आहे. करकंब युनिटमार्फत ४ सप्टेंबरपासून, तर पिंपळनेर युनिटमार्फत ६ सप्टेंबरपासून गावोगावी साखर वाटप सुरू होणार आहे. १२ सप्टेंबरला कारखान्याची जनरल मीटिंग, तर २० सप्टेंबरला कै. विठ्ठलराव शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन बंडू ढवळे, संचालक रमेश पाटील, संचालक सचिन देशमुख, नागेश खटके आदी उपस्थित होते.

माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभर सामाजिक, धार्मिक, आरोग्य व क्रीडा क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

त्यामध्ये १० हजार रक्तदात्यांचे रक्तदान, गावोगावी मागणीनुसार कीर्तन-प्रवचन, आरोग्य शिबिरे, 'खेळ पैठणीचा', बैलगाडा शर्यत, विष्णुपुराण कथा, क्रिकेट सामने तसेच ७५ हजार वृक्षारोपणाचा संकल्प केला आहे.

दुष्काळी भागासाठी विशेष कामे करण्यावरही भर देणार असल्याचे माजी आमदार शिंदे यांनी सांगितले.

**अमृत महोत्सवी वर्षातील उपक्रम**

माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त १० हजार रक्तदात्यांचे रक्तदान, ७५ हजार वृक्षारोपण,आरोग्य शिबिरे, कीर्तन-प्रवचन, 'खेळ पैठणींचा',बैलगाडा शर्यत, विष्णुपुराण कथा, क्रिकेट सामने, दुष्काळी भागासाठी विशेष कामे आदी उपक्रम राबवणार आहेत. तसेच माढा तालुक्यात वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविणार आहे.

## महत्वाचे...



## सांगोला महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**सांगोला, दि. ७ सप्टेंबर-**

सांगोला महाविद्यालय येथील भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे मराठी विभागप्रमुख डॉ.संतोष लोंढे, कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. चित्रा जांभळे तसेच आयक्यूएसी प्रमुख डॉ.राम पवार उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी रोशन येलपले, वरुण गायकवाड, पठाण अल्फिया, लिगाडे सृष्टी यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे महत्त्व सांगितले. याावेळी डॉ.शितल घोंगडे, प्रा. राहुल गोडसे, प्रा.रोहित पवार, ज्ञानेश्वर कुलकर्णी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.प्रशांत बाबर, प्रास्ताविक डॉ.प्रवीण खराडे तर आभार भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. रमेश बुगड यांनी मानले. प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांचे सहकार्य लाभले.

## उत्कर्ष प्राथमिक विद्यालयात शिक्षक दिन साजरा

**सांगोला, दि.७ सप्टेंबर-**



उत्कर्ष प्राथमिक विद्यालय, सांगोला येथे शनिवार दि.५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन व श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. याप्रसंगी शिक्षिका शुभांगी कवठेकर यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी कृष्ण-राधेची नयनरम्य वेशभूषा साकारून विविध भक्तीगीतांवर बहारदार नृत्ये सादर केली. तिसरीच्या बालचमूंनी मानवी मनोरा रचून उत्साहात दहीहंडी फोडली. हा सोहळा मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. सूत्रसंचालन शिक्षिका स्नेहल रसाळ, उत्तम नियोजन सांस्कृतिक प्रमुख दिपाली माळी यांनी केले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून सांगता झाली.



## बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये शिक्षक दिन

**बार्शी, दि.७ सप्टेंबर-**

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये शिक्षक दिनाचा सोहळा उत्साहात पार पडला. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी. आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक कदम होते. कॉलेज ऑफ एज्युकेशनचे सहयोगी प्रा. महादेव मते प्रमुख पाहुणे होते. प्रारंभी डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन, प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. प्रास्ताविक प्राची मस्तूद यांनी तर साक्षी कदम यांनी परिचय करुन दिला. डॉ. महादेव मते यांनी यशस्वी जीवनासाठी शैक्षणिक ज्ञानाबरोबरच सकारात्मक दृष्टिकोनाची गरज असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. अशोक कदम यांनी शिस्त, संस्कार अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. बी. डी. लांडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. ए. ढगे, प्रा. के. एम. माळी, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. के. बी. चपटे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. ए. व्ही. पवार आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवानी पवार यांनी, तर सलीम तांबोळी यांनी आभार मानले.



## फॅबटेक कॉलेजमध्ये शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ सप्टेंबर-**

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथे शिक्षक दिन साजरा झाला. यावेळी संस्था उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.तानाजी बुरुंगले, फार्मसीचे प्राचार्य डॉ. संजय बैस यांच्यासह कॅम्पसमधील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. भाऊसाहेब रूपनर यांच्या हस्ते शिक्षकांना येथे राष्ट्र घडते हे पुस्तक भेट दिले. कार्यक्रमासाठी मोहन लिगाडे, स्वप्नील रूपनर, नेताजी मस्के आदींनी परिश्रम घेतले.

## 'केदारनाथ'मध्ये दरड कोसळून मंगल शिंदे यांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ७ सप्टेंबर-**

निमगाव टें येथील मंगल आप्पाराव शिंदे यांचे केदारनाथ यांत्रेदरम्यान अंगावर दरड कोसळून निधन झाले आहे .मत्यूसमयी त्या ५५ वर्षाच्या होत्या. सदरची घटना रविवार दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वा.घडली. बीडच्या तळेकर महाराजांच्या चालत असलेल्या टूर्स क़डून टूर घेतली होती.

दरड थेट मंगल शिंदे यांच्या अंगावरच कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. यामध्ये निमगाव टें येथील बरोबर असणा-या संगीता शिंदे व छाया



वीर या किरकोळ जखमी झाल्या आहेत. केदारनाथ येथून मंगल शिंदे यांचे पार्थीव आणण्यास अडचणी येत असल्याचे पाहता माजी आ.बबनराव शिंदे यांनी प्रयत्न करून विमानाने आनण्याचे नियोजन केले. त्यांच्या पश्चात पती आप्पाराव शिंदे, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## खेडभाळवणीत ऐतिहासिक महिला दहीहंडी उत्सव

**पंढरपूर, दि. ७ सप्टेंबर -**

खेडभाळवणी (ता. पंढरपूर) येथे श्रीकृष्ण गोकुळाष्टमी व गोपाळाकाल्याच्या पावन पर्वावर ५ सप्टेंबर रोजी महिला व बालकांच्या अभूतपूर्व भव्य पाळणा सोहळा आणि दहीहंडी उत्सव पार पडला.

पारंपारिक वेशभूषेत सजलेल्या महिला आणि बालगोपाळांच्या उपस्थितीने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. फुलांनी सजवलेली दहीहंडी, ढोल-ताशांच्या तालावर गाणी आणि महिलांनी रचलेले थर प्रमुख आकर्षण ठरले. कार्यक्रमासाठी एकता महिला मंचच्या मीनाक्षी साळुंखे,राणी घालमे, काजल साळुंखे, भारती बनसोडे, सुरेखा साळुंखे,वंदना राजगुरू, आशा साळुंखे, आदी महिलांनी हजेरी लावली होती. उपक्रमाचे आणि एकता महिला मंचचे कौतुक होत आहे.

## शरद पवार व डॉ. प्रभाकर कोरे यांच्या हस्ते बसलिंगप्पा खेडगी यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ७ सप्टेंबर**

- अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि के. एल. ई. सोसायटीचे चेअरमन प्रभाकर कोरे यांच्या हस्ते पुणे येथे विशेष पुरस्काराने गौरव करण्यात आला. बसलिंगप्पा खेडगी व त्यांच्या धर्मपत्नी पवित्रा खेडगी यांना स्मृतिचिन्ह, शाल आणि पुणेरी पगडी देऊन सन्मानित करण्यात आले.



सोहळ्यास ह.भ.प. गहिनीनाथ ज्ञानेश्वर महाराज औसेकर, माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, आमदार दिलीप सोपल, आमदार गणेश हुक्केरी, आशा कोरे, वीरशैव लिंगायत इंटरनॅशनल असोसिएशनचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयट, लिंगायत संघर्ष समितीचे अध्यक्ष सुनील रुकारी माजी नगराध्यक्षा शोभा खेडगी, ॲड. अनिल मंगरुळे, मंगेश चिवटे, सुधीर माळशेट्टी, धोंडप्पा नंदे, प्राचार्य डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, उपप्राचार्य वैदेही वैद्य आदी उपस्थित होते.

**सन्मान प्रेरणादायी**

ज्येष्ठ नेते शरद पवार आणि डॉ. प्रभाकर कोरे यांच्या हस्ते झालेला सन्मान प्रेरणादायी आहे.
**बसलिंगप्पा खेडगी,** चेअरमन.

## पिलीव परिसरात पैगंबर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि, ७ सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त भव्य मिरवणुक काढली. यावेळी मदिना स्थित प्रतिकृतीच्या चित्ररथाची भव्य मिरवणुक काढली. हातात झेंडे घेऊन कार्यकर्ते तालावर नाचत होते. यावेळी कुराणातील धार्मिक भजने गाण्यात आली.

जामा मशीद वक्फ संस्था यांच्या विद्यमाने महिलांना धार्मिक प्रवचनात इस्लाम धर्म व कुराणाचे मुस्लिम धर्मीयांमध्ये असलेले महत्त्वाचे स्थान आचार विचार राहणीमान आदीविषयी सांगितले. महिलांसाठी विशेष स्नेहभोजनाचा कार्यक्रम झाला. बाजारपेठेतुन फुलांची उधळण करण्यात आली. हिंदू समाज, सामाजिक संघटना संग्राम राजे प्रतिष्ठान यांच्यावतीने लाडू, सरबत, पाण्याच्या बाटल्या पेढे वाटण्यात आले. यावेळी रामचंद्र नाना कोळी ,विजयसिंग रजपूत ,नाना मदने, समशेरसिंग रजपूत ,मोहसिन शेख ,तानाजी लोखंडे ,सोहेल बागवान ,लक्ष्मण काळे यांनी पेढे, लाडुचे वाटप केले.

जामा मशीद आंधळकर चौक , अल हुसैनी मशीद सारवान गल्ली ,मदरसा मशीद एसटी स्टँड यांच्यावतीने , आंधळकर चौक चौकातील जामा मशीद वक्फ संस्थेचे सचिव नजीर मुलाणी ,आरिफखान पठाण मौलाना ,मुजमिल तांबोळी, अकबर मुजावर आदींनी परिश्रम घेतले. पोलीस उपअधीक्षक विशाल नवले, हवालदार शंकर मरळे, नितीन लोखंडे ,मन्सूर नदाफ यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

## अकलूजमध्ये पोषण सप्ताह साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ सप्टेंबर-**

श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृह विज्ञान महिला महाविद्यालयामध्ये अन्न व पोषण शास्त्र विभागातर्फे पोषण सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेचा विषय नाविन्यपूर्ण पाककला स्पर्धा ही होती. पाककला स्पर्धेमध्ये गृह विज्ञान महिला महाविद्यालयाच्या तसेच जनरल सायन्स च्या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला



होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमित घाडगे होते.


पाककला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक तहिरिम बागवान एफ. वाय.बी. एस्सी., द्वितीय ईश्वरी कोथमीरे एस.वाय.बी.एस्सी.व तृतीय क्रमांक रजिया शेख एफ. वाय.बी.एस्सी यांनी पटकावला. स्पर्धेचे परीक्षण जिजामाता कन्या प्रशालाच्या एम.डी.भांगे व डॉ.भारती भोसले यांनी केले.

प्राचार्य डॉ.अमित घाडगे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन अर्पिता कोळी हिने तसेच आभार प्रदर्शनसांची गायकवाड हिने केले. कार्यक्रमासाठी डॉ. जयशीला मनोहर, डॉ. भारती भोसले, रमजान शेख, दीपक शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## लालबागचा राजा, चिंतामणी मूर्तींना मागणी

**बाजारपेठेतील दुकाने सजावटीच्या साहित्य विक्रीसाठी सज्ज**







**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ सप्टेंबर-**

गणेशोत्सव अवघ्या सहा ते सात दिवसांवर आलेला आहे. या वर्षी तब्बल १२ दिवस गणेशोत्सवाची धुम असणार आहे. शहर तसेच उपनगरातून खास गणरायांच्या मुर्ती विक्रीचे खास स्टॉल लावले आहेत. शहराच्या बाजारपेठेतील दुकाने गणेशाच्या मुर्ती तसेच उत्सवातील सजावटीच्या साहित्यांनी सजलेल्या दिसत आहेत. यंदा लालबागचा राजा, चिंतामणी, दगडूशेठ आदी प्रकारच्या गणेश मूर्तींना चांगली मागणी आहे.

गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळांबरोबरच घराघरांत गणरायाची प्रतिष्ठापना करून आकर्षक सजावट करण्याची परंपरा आहे. त्यामुळे यंदाही बाजारपेठेत सजावटीच्या साहित्याला मोठी मागणी निर्माण झालेली आहे. विविध रंगांतील फुलांच्या माळा, कमळ, गुलाब, झेंडू यांसह विविध फुलांच्या आकर्षक प्रतिकृती बाजारात खास विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्याचबरोबर हिरवीगार दिसणारी प्लास्टिकची पाने, वेली, तोरणे आणि सजावटीच्या माळांनी दुकाने सजली आहेत.

गणरायाच्या आगमनापूर्वीच बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी दिवसांत गणेशमूर्ती आणि सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी गर्दी आणखी वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेला आतापासूनच उत्सवी स्वरूप प्राप्त झाले आहे. गणपतीमुर्तींची विक्री करणाऱ्या दुकानांमधून पेण, सांगली, पुणे, कोल्हापूर, अहिल्यानगर आदी भागातून विक्रीसाठी गणरायांच्या मुर्ती येथील विक्रेत्यांनी आणलेल्या आहेत. अगदी छोट्या आकारापासून मोठ्या आकारापर्यंत विविध आकर्षक रूपांतील गणरायाच्या मूर्ती बाजारपेठेत पाहायला मिळत आहेत. पारंपरिक रूपातील मूर्तीसह विविध कलाकुसर केलेल्या आणि आकर्षक रंगसंगती असलेल्या मूर्ती नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

**ग्राहकांकडून अगोदरच बुकींग**

गेल्या आठ ते दहावर्षांपासून आपण गणपतीमूर्ती विक्रीचा व्यवसाय करीत आहे. लालबागचा राजा, चिंतामणी आणि दगडूशेठ मूर्तींना सर्वात जास्त मागणी दिसत आहे. अगदी सणाच्या तोंडावर ऐनवेळी चांगल्या मुर्ती विकल्या जातात. त्यामुळे अनेक ग्राहकांनी अगोदरच आपल्याकडे येवून पैसे भरुन मुर्तीचे बुकींग केलेले आहे.

**अंबादास डांगे** (मूर्ती विक्रेता)

**प्लास्टिकच्या फुलांना मागणी**

गणेशमूर्तीसोबतच सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठीही नागरिकांची गर्दी वाढत आहे. कमी खर्चात आकर्षक सजावट करता यावी, यासाठी अनेकजण प्लास्टिकच्या फुलांना व माळांना पसंती देत आहेत. विविध प्रकारच्या साहित्यामुळे बाजारपेठेतील दुकाने रंगीबेरंगी झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## कविता धावणे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार

**जेऊर दि. ७ सप्टेंबर-**



राजुरी (ता.करमाळा) येथील श्री राजेश्वर विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक स्व. सुखदेव साखरे स्मृती पुरस्कार बार्शी येथील महाराष्ट्र विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कविता धावणे यांना घोषित झाला आहे.

स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि अकरा हजार रूपये रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संयोजन समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ. संजय चौधरी यांनी या पुरस्कारासाठी मुख्याध्यापिका कविता धावणे यांच्या नावाची घोषणा केली. यावेळी सोलापूरच्या स्टडी सर्कलचे संचालक सतिश मोरे, विठ्ठल देशमुख, विक्रीकर अधिकारी तुकाराम जाधव, कृषि पर्यवेक्षक नानासाहेब साखरे, कृषि अधिकारी देवीदास सारंगकर, उद्योजक प्रवीण साखरे, कुंडलिंक साखरे उपस्थित होते. बुधवार दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता साहित्यिक प्रा. राजेंद्र दास यांच्या हस्ते राजुरी (ता. करमाळा) येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे.


CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नागनाथ घाटुळे यांच्या 'फळ्यावरचे दिनविशेष'




### काव्यसंग्रहास उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार

**करकंब दि. ७ सप्टेंबर -**

करकंब ता.पंढरपूर येथील साहित्यिक नागनाथ घाटुळे यांच्या फळ्यावरचे दिनविशेष या शैक्षणिक बाल काव्यसंग्रहास शिक्षण संजीवनी मासिक पुणे यांच्यावतीने उत्कृष्ट शैक्षणिक काव्यसंग्रह ग्रंथ निर्मिती पुरस्कार जाहीर झाला आहे.

९ सप्टेंबर रोजी पत्रकार भवन पुणे येथे बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या सन्मानाबद्दल रतिकांत



हामणे, बिभीषण रणदिवे गट शिक्षणाधिकारी पंढरपूर, रोहन कांबळे, डॉ.बिभीषण रणदिवे, लिगाडे, करकंब बिट शिक्षण विस्ताराधिकारी दशरथ मोरे, केंद्रप्रमुख रविकरण वेळापूरकर आदींसह विविध क्षेत्रातून घाटुळे यांचे अभिनंदन होत आहे.

## महत्त्वाचे...



### पानगाव येथे श्री गोपाळकृष्ण जन्माष्टमी सप्ताह साजरा

**बार्शी, दि. ७ सप्टेंबर-**

येथील पेशवे कालीन ऐतिहासिक श्री गोपाळकृष्ण मंदिरात पानसे परिवारातर्फे श्री गोपाळकृष्ण जन्माष्टमी सप्ताह उत्साहात झाला. सप्ताहात अभिषेक, पूजा, हरिपाठ आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले. ह.भ.प. श्रेयस बडवे महाराज, मयुरेश केळकर महाराज, सुयोग केसरकर महाराज, प्रसादबुवा रामदासी महाराज आणि श्रीरामबुवा महाराज यांच्या कीर्तनसेवा झाल्या. भजनी मंडळांनी भजने सादर केली. जन्माष्टमीच्या दिवशी पहाटेपासून अभिषेक, पूजा, सजावट व धार्मिक कार्यक्रम सुरु होते. रात्री जन्मकाळाच्या अभिषेकानंतर कीर्तन, कृष्णजन्माचा जयघोष, पाळणा, आरती व प्रसादाचा कार्यक्रम झाला. यावेळी पानगाव तसेच परिसरातील सुमारे २०० ते २५० भाविक उपस्थित होते. यावेळी दीर्घकाळ भक्ती करणारे नंदूमहाराज रणशूर यांचा पानसे परिवाराच्यावतीने 'निसीम भक्तिमार्ग जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. विनायक पानसे व रेखा पानसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राघवेंद्र महाराज यांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान केले

### अन्नछत्र मंडळात दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा

**अक्कलकोट, दि. ७ सप्टेंबर -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट येथे वार्षिक दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

अक्कलकोटातील दहीहंडी फोडण्याचा मान येथील वडार समाजातील गोविंदा पथकाला दरवर्षी मिळत आहे. यंदाही ही परंपरा कायम ठेवत गोविंदा पथकाने उत्साहात दहीहंडी फोडली. 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आणि उत्सवाच्या आनंदात भर पडली. या प्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, सचिव शामराव मोरे, उपाध्यक्ष अभय खोबरे तसेच मंडळाचे विश्वस्त, पदाधिकारी, सेवेकरी व स्वामीभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### चिखलठाण शाळेत दहीहंडी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. ७ सप्टेंबर-**

चिखलठाण (ता. करमाळा) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील बाळगोपाळांनी दहीहांडी कार्यक्रम साजरा केला. सुरवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन नवनाथ सरडे यांच्या हस्ते केले. प्रास्ताविक नवनाथ मारकड यांनी केले. नवनिर्वाचित शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचा सन्मान केला. काार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त पोलिस निरीक्षक शामराव गव्हाणे होते. स्वागत सुनील गलांडे, राजू लोंढे, मुख्याध्यापक पूजा लोंढे यांनी केले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत लगस, सुनील पवार, अमोल मराळ, सुनील कुचेकर, सचिन क्षिरसागर, गजेद्र पोळ, शंकर पोळ, अमोल जाडकर, सुदर्शन पवार आदी उपस्थित होते.



### मुख्याध्यापक तुषार महाजन यांना लायन्स क्लबचा शिक्षक पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. ७ सप्टेंबर-**

माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून शिक्षक दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ बार्शी युनिक सोलापूर डिस्ट्रिक्ट प्रांत ३२३४- डी- रिजनल १ यांच्यावतीने दिला जाणारा राष्ट्र शिल्पकार गुणवंत शिक्षक पुरस्कार शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य विष्णु शिखरे तसेच बार्शी नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे तसेच लायन्स क्लबचे अध्यक्ष अल्ताफ शेख व इतर पदाधिकारी यांच्या हस्ते गुणगौरव करुन सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूल, बार्शीचे मुख्याध्यापक तुषार महाजन यांना सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल बार्शी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आनंद सुलाखे, सचिव अनंत कवठाळे यांनी अभिनंदन केले.







## धनगर समाजाच्या आरक्षणासाठी पंढरपुरात एल्गार

### न्यायालयात ८ सप्टेंबरपूर्वी ठाम भूमिका मांडा, अन्यथा आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ सप्टेंबर -**

धनगर समाजाच्या विविध हक्कांच्या मागण्यांसाठी सोमवारी राज्यव्यापी आंदोलनाची हाक देण्यात आली. या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे समस्त धनगर समाजाच्या वतीने सोमवारी (दि.७) तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करावे, हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर यांच्या नावाने मुंबई-बंगळुरू महामार्गावरील कनेक्टिंग लिंकचे नामकरण करावे, तसेच चर्चगेट रेल्वे स्थानकाला राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे, अशा प्रमुख मागण्या केल्या. प्राचार्य सुभाष माने, राजूबापू गावडे, प्रा सुभाष मस्के, माऊली हळनवर, संजय माने, द्रोणाचार्य हाके, सोमनाथ ढोणे, प्रशांत घोडके, विश्रांती भूषणार, बालाजी पाटील, संतोष शेळके, महेश शेडगे, विष्णू सुळे, मल्हारी बनसोडे, संतोष बंडगर, दत्ता कोळेकर, प्रवीण सलगर आदी उपस्थित होते. तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

**धनगर समाजाच्या प्रमुख मागण्या**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करावे, हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर यांच्या नावाने मुंबई-बंगळुरू महामार्गावरील कनेक्टिंग लिंकचे नामकरण करावे, तसेच चर्चगेट रेल्वे स्थानकाला राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे, श्री संत बाळूमामा देवस्थान ट्रस्टच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराची एसआयटी चौकशी तातडीने पूर्ण करून दोषींवर कारवाई करावी.

## अकलूज-टेंभूर्णी मार्गावर मराठा समाजाचा रास्ता रोको

### आज प्रांत कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ सप्टेंबर -**

अकलूज येथे मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी माळिशरस तालूका अखंड मराठा समाजातर्फे अकलाई मंदिराजवळील अकलूज -टेंभुर्णी पालखी महामार्ग येथे रास्ता रोको आंदोलन केले.

जरांगे-पाटील गेल्या दहा दिवसांपासून उपोषणावर आहेत. त्यांच्या समर्थनासाठी महाराष्ट्रातील विविध भागांतही आंदोलनाची तीव्रता वाढत आहे. जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करत सरकारने तातडीने हस्तक्षेप करून चर्चेद्वारे आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी मराठा समाजातर्फे केली. रास्ता रोको आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. माळशिरस तालुका अखंड मराठा समाजाने जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ ६ दिवसांचा एल्गार पुकारला आहे.

खांद्यावर भगवी उपरणी आणि हातात भगवे ध्वज घेऊन मोठ्या संख्येने आंदोलक सहभागी झाले होते. 'जय भवानी, जय शिवराय', एक मराठा, कोटी मराठा', अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी चोख पोलीस बंदोबस्त होता. अण्णा शिंदे, गोपाळ घाडगे बबन शेंडगे,रणजीत कदम माणिक मिसाळ, शिवाजी लोंढे, तानाजी इंगवले देशमुख आदींनी मंडलाधिकारी सिद्धू भोसले यांना निवेदन दिले. उद्या प्रांत कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे

## 'यमाई'ची जागा मंदिर समितीला देण्यास विरोध

### नगरसेवकांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, सात दिवसांचा अल्टीमेटम

### नगरपरिषदेची विशेष सभा न झाल्यास उच्च न्यायालयात जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ सप्टेंबर -**

शहरातील यमाई तलावालगतची ३.१२ हेक्टर मोक्याची जागा नगरपरिषदेला विश्वासात न घेता श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या गोशाळा विस्तारासाठी देण्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात पंढरपूरचे राजकारण तापले आहे. निर्णयाविरोधात विशेष सर्वसाधारण सभा आयोजित न केल्यास उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशारा देण्यात आला आहे.

उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, गटनेते वासुदेव बडवे, सुजितकुमार सर्वगोड व नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत पत्र दिले आहे. यमाई तलाव हा पंढरपूर शहराचा ऑक्सिजन पार्क असून नागरिकांच्या, भाविकांच्या आणि शहराच्या आरोग्याच्या दृष्टीने त्याचे अस्तित्व टिकणे गरजेचे आहे.



हा निर्णय रद्द करण्यासाठी उपनगराध्यक्षांसह २४ नगरसेवकांनी ३० जून २०२६ रोजी नगराध्यक्षांकडे विशेष सभेची मागणी केली होती. मात्र, १५ दिवसांत सभा बोलावणे बंधनकारक असतानाही २ महिने कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने विशेष सभा न भरवल्यास थेट न्यायालयात लढा उभारण्याचा निर्णय माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट, अॅड. सुनील वाळुजकर, अमोल डोके, सुजितकुमार सर्वगोड, विनायक संगीतराव आदींनी घेतला आहे.

**कायद्याचे उल्लंघन झाल्याचा आरोप**

कलम ८१(३) नुसार जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी करून १ महिना १२ दिवस उलटले तरी सभेचे आयोजन झाले नाही. परिणामी कायद्याचे उल्लंघन झाल्याचा आरोप उपनगराध्यक्षांसह इतर नगरसेवकांनी केला आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांना सात दिवसांचा अल्टीमेटम**

जिल्हाधिकाऱ्यांना सात दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. तातडीने विशेष सभा न भरवल्यास थेट न्यायालयात लढा उभारण्याचा निर्णय माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट, अॅड. सुनील वाळुजकर, अमोल डोके, सुजितकुमार सर्वगोड, विनायक संगीतराव व इतर सदस्यांनी घेतला आहे.



## बार्शीत गणेश उत्सवात डीजे डॉल्बीला परवानगी नाही

### शांतता समितीच्या बैठकीत विजय कबाडे यांची सूचना

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.७ सप्टेंबर :**

बार्शी शहर आणि तालुक्यात आगामी गणेशोत्सव काळात कोणत्याही परिस्थितीत डीजे आणि डॉल्बीला परवानगी दिली जाणार नाही, अशी परखड भूमिका जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांनी मांडली.

बार्शीच्या पोलीस उपअधीक्षक कार्यालयाच्यावतीने घेण्यात आलेल्या शांतता समितीच्या बैठकीत सभागृहात ते बोलत होते. व्यासपीठावर तहसीलदार एफ. आर.शेख, मुख्याधिकारी तैमुर मुलाणी, पोलीस उपाधीक्षक सुहास जगताप, पोलीस निरीक्षक गणेश कुंभार, वैरागचे पोलीस निरीक्षक अमोल कादबाने, बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे आदी उपस्थित होते.

मागील वर्षी सोलापूर जिल्ह्यात झालेला ऐतिहासिक डीजे बंदीचा निर्णय आज पुण्यालाही दिशा देत आहे, असे सांगितले. सचिन वायकुळे यांनी पुरस्कारासाठी गणेश मंडळासाठी नियमावली सांगितली. सूत्रसंचालन अपर्णा दळवी यांनी केले. नगरसेवक नागेश अक्कलकोटे, ज्योतिर्लिंग कसबे, अनिल पवार, सुनील अवघडे, संदीप आलाट, समर्थ तुपे आदी उपस्थित होते.

## श्रीपूरमध्ये बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर दुकाने सजली

### यंदा दुष्काळाच्या सावटाने साहित्य खरेदीत निरुत्साह

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.७ सप्टेंबर -**

बैल पोळा सणासाठी श्रीपूरमध्ये बैलांना सजवण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांनी दुकाने सजली आहेत. बैल पोळा तीन दिवसांवर आला आहे. सध्या खरेदीसाठी अद्याप म्हणावा तसा शेतकऱ्यांचा प्रतिसाद नसल्याने बाजारपेठेत अद्याप शुकशुकाट जाणवत आहे. मात्र पंच्याहत्तर वर्षांपासून अविरत सुरु असलेले शरद तिवाटणे यांच्या दुकानात विविधरंगी साहित्य आले आहे.

यंदा दुष्काळसदृष्य परिस्थिती आहे. मात्र तरीही पाळीव जनावरांना सजविण्यासाठी शेतकरी आवर्जुन अडचणी दूर सारून बैल पोळा सण साजरा करतात हा आज पर्यंतचा अनुभव आहे. सजावटीच्या सामानाच्या खरेदीसाठी बोरगाव, माळखांबी, मिरे, नेवरे, महाळुंग, उंबरे, पंढरपूर तालुक्यातील करोळे, पेहे, नांदोरे आदी भागातील शेतकऱ्यांना श्रीपुरची बाजारपेठ सोयीची आहे. सध्या यांत्रिक पद्धतीने शेती करण्याचा कल वाढला आहे . ट्रॅक्टर, यांत्रिक औजारे यांच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीत वाढला आहे . त्यामुळे बैलगाडी बैलजोड्यांची संख्या कमी होत आहे. याचा परिणाम खरेदीवर परिणाम जाणवतो असे तिवाटणे यांचे म्हणणे आहे. तिवाटणे यांचे दुकानाची मोठी विश्वासार्हता शेतकऱ्यांत आहे. याबरोबरच श्रीपूरमध्ये संतोष खंकाळ, दिलिप गुळुमकर, रमेश डांगे, पिंटू खंकाळ यांचीही दुकाने सजली आहेत. सामानाच्या वस्तूंमध्ये भाव वाढ झाली असली तरीही अशाही परिस्थितीत अनेक भागात बैलजोड्या, गायी, म्हशी यांच्या भव्य मिरवणुका पारंपरिक वाद्यांच्या गजरात काढल्या जातात.साखर कारखाने व उजनी व वीर धरणाचे पाणलोट क्षेत्र या परिसरात असल्याने ऊस पिकाचे क्षेत्र जास्त आहे. परिसरात सरासरी २० ते २२ इंच ( ५०० ते ५५० मिमी) पाऊस



पडतो परंतू आता अर्धा सप्टेंबर महिना होऊनही एकही समाधानकारक पाऊस पडला नाही. आजपर्यंत कसाबसा ४ इंच ( १०० मिमी.) पाऊस पडला आहे . तोही धड ओठाला ना पोटाला अशा म्हणीप्रमाणे पडला. याचा मोठा फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसला आहे.

बैलांच्या गळ्यात घुंगराच्या चंगाळी, गंडे, म्होरक्या, दावे, पायातील रंगीत गोंडे, आकर्षक रंगसंगतीच्या झुली, रिबीन या वस्तूंचे विविध प्रक़ार उपलब्ध आहेत. मात्र यंदा साहित्याच्या दरात पाच ते दहा टक्के प्रत्येक दरवाढ झाली आहे. तरीही शेतकऱ्यांचा उत्साह मोठा असणार आहे.

**शरद तिवाटणे, दुकानदार.**




## बार्शी शहरातून चारजण तडीपार

**बार्शी दि. ७ सप्टेंबर -**

बार्शी शहर पोलिसांनी चार सराईत गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली आहे. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही कारवाई केली आहे. त्यांना सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांच्या हद्दीतून निर्धारित कालावधीसाठी हद्दपार केले आहे.

बार्शी शहरचे पोलिस निरीक्षक गणेश कुंभार यांनी संबंधित इसमांविरुद्ध तडीपारीचे प्रस्ताव सादर केले होते. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यांच्या हद्दपारीचे आदेश पारित केले. तुषार राजेंद्र जंगम (रा. वाणी प्लॉट, बार्शी)- ६ महिने, विशाल दगडू मांगडे (रा. तुळजापूर रोड, मांगडे चाळ, बार्शी)- ६ महिने, वैभव कैलास काकडे (रा. अण्णाभाऊ साठे नगर, सुलाखे हायस्कूल रोड, बार्शी)- ६ महिने आणि बायडा अमर लखपती (रा. पतंगे प्लॉट, अलीपूर रोड, बार्शी)- ३ महिने यांचा त्यामध्ये समावेश आहे. सदर इसमांविरुद्ध मारामारी, बेकायदेशीर जमाव, दंगल, दुखापत करणे तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे यासारख्या गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यांची नोंद असल्याचे पोलिसांनी सांगितले.